# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक २०.१२.२००७ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

शुक्रवार दिनांक २०/१२/२००७ रोजी मा.महापौर सौ.विजया किशोर रहाटकर यांचे अध्यक्षतेखाली महापालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दूपारी १.२० वाजता वंदेमातरम् या गिताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त,नगर सचिव यांचेसह संबंधीत अधिकारी व खालीलप्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

०१. स.स.श्री.वाघ भाऊसाहेब बाबुराव
०२. स.स.श्री.संतोष सुधाकर जेजुरकर
०३. स.स.श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार
०४. स.स.श्री.बमणे पुनमचंद सोनाजी
०५. स.स.श्री.ताठे भाऊसाहेब पुंडलिक
०६. स.स.श्री.गवळी रविकांत काशिनाथ
०७. स.स.श्री.नाहदी नासेर महमंद याहीया
०८. स.स.श्री.पांडे विनायक प्रभाकर
०९. स.स.श्री.दाभाडे मिलींद यशवंत
१०. स.स.श्री.धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग
११. स.स.श्री.ठाकुर पुरूषोत्तम रघुविरसिंग
१२. स.स.श्री.खान सलिम खान यासीन
१३. स.स.श्रीमती आशन्ना लक्ष्मी शंकर
१४. स.स.श्री.जगताप संजय उत्तमराव
१५. स.स.श्री.गायकवाड दिलीप नारायण
१६. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१७. स.स.सौ.जोशी रजनी रमेश
१८. स.स.श्री.माळवतकर महेश शिवाजीराव
१९. स.स.श्री.अत्तरदे प्रकाश सुका
२०. स.स.श्री.जैस्वाल अनिल जुगललाल
२१. स.स.श्री.सोनवणे कचरू श्रीपती
२२. स.स.श्रीमती मिराताई रामराव शिंदे
२३. स.स.सौ.पाटील दिपाली सुनिल
२४. स.स.श्री.काशिनाथ हरीभाऊ कोकाटे
२५. स.स.श्रीमती खान अजरा जबीन मसुद खान
२६. स.स.श्रीमती खान मेहरून्नीसा खान हमीद
२७. स.स.सौ.मिटकर शोभा हरीश्चंद्र
२८. स.स.श्रीमती यास्मीन बेगम अ.कदीर
२९. स.स.श्री.सय्यद खुसरो सय्यद बुऱ्हानोद्दीन
३०. स.स.श्री.अ.रशिद खान (मामु) हमीद खान
३१. स.स.सौ.लता श्रीनिवास दलाल
३२. स.स.श्री.पाटील नरवडे वसंत पांडुरंग

३३. स.स.श्री.रिडलॉन संजु सुग्रीव
३४. स.स.सौ.सिध्द वीणा गजेंद्र
३५. स.स.श्रीमती कुरैशी नजमा बेगम युनुस
३६. स.स.श्री.खान मुजीब मीर आलमखान
३७. स.स.श्री.शेख इब्राहीम शेख इमाम
३८. स.स.श्रीमती मुमताज बेगम वाहेद खान
३९. स.स.सौ.छाया विलास राऊत
४०. स.स.श्री.दत्ताभाऊ अण्णासाहेब पाथ्रीकर
४१. स.स.श्री.बैनाडे कंवरसिंग किसनसिंग
४२. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
४३. स.स.श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
४४. स.स.श्रीमती शेख शमशाद बेगम शेख हफिज
४५. स.स.श्री.पटेल सलिम समशेर पटेल
४६. स.स.श्री.अशरफ युनुस मोतीवाला
४७. स.स.सौ.पोळ सरला सखाराम
४८. स.स.श्री.कटकटे सतिष विश्वनाथ
४९. स.स.सौ.बोरामणीकर कला सुरेश
५०. स.स.श्री.डॉ.कराड भागवत किसनराव
५१. स.स.सौ.मंगला प्रकाश गायकवाड
५२. स.स.श्री.रेणुकादास दत्तोपंत वैद्य
५३. स.स.श्री.सावंत मधुकर दामोधर
५४. स.स.सौ.रेखा कैलास काथार
५५. स.स.श्री.गांगे रविंद्र लक्ष्मण
५६. स.स.सौ.पाटणी हर्षमाला विजयकुमार
५७. स.स.श्री.खुडे विजय किसन
५८. स.स.श्री.संतोष खेंडके पाटील
५९. स.स.श्रीमती जयश्री सारंग किवळेकर
६०. स.स.श्री.शिंदे दामोधर माधवराव
६१. स.स.श्री.गांगवे बन्सीलाल तुळशीराम
६२. स.स.सौ.ससाणे सरीता अशोक
६३. स.स.श्री.भगवान (बापु) देविदासराव घडमोडे
६४. स.स.श्री.रवि साहेबराव कावडे
६५. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद
६६. स.स.सौ.शिंदे पुष्पा बाळु
६७. स.स.सौ.वाघमारे पार्वताबाई विजय
६८. स.स.सौ.जाधव संगीता विठ्ठलराव
६९. स.स.श्री.निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
७०. स.स.सौ.खंदारे वंदना प्रकाश
७१. स.स.सौ.कोंडेकर अंजली दिलीप
७२. स.स.श्री.जोशी संजय रामदास
७३. स.स.श्री.दाभाडे हिम्मतराव साळुबा
७४. स.स.श्री.मोरे कचरू विश्वनाथ
७५. स.स.श्री.संजय पांडुरंग शिरसाट

७६. स.स.सौ.अल्पा विकास जैन
७७. स.स.श्री.गजानन रामकिसन बारवाल
७८. स.स.श्रीमती मोमीन सोफिया फिरदोस अय्युबखान
७९. स.स.सौ.अनिता नंदकुमार घोडेले

**नामनिर्देशित पालिका सदस्य**

०१. स.स.श्री.संजय किसनराव केनेकर
०२. स.स.श्री.किशोर बाबुलाल तुलशीबागवाले
०३. स.स.श्री.राजेश (पप्पु) गुलाबचंद व्यास
०४. स.स.श्री.सुरजितसिंग सबरवाल
०५. स.स.श्री.सुरेंद्र माणिकराव कुलकर्णी

**संवाद :**

डॉ.भागवत कराड :संत गाडगे बाबा स्वच्छता अभियान चालू असून त्यांची आज पुण्यतिथी आहे अभिवादनाचा ठराव घ्यावा.

मा.महापौर :संत गाडगे बाबा याची आज ५१ वी पुण्यतिथी आहे त्या निमित्ताने या सभागृहाच्या वतीने त्याबाबतीत अभिवादनास मंजूरी देण्यात येते.

श्री.भाऊसाहेब वाघ : शिवसेना नेते स्व.प्रमोद नवलकर यांचे दुःखद निधन झाले आहे. त्यांना सभागृहातर्फे श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

श्री.संतोष जेजुरकर : यास माझे अनुमोदन आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : स.सदस्य तथा माजी महापौर श्री.रशिद मामु यांचे वडील श्री.हमीद खान साहेब यांचे दोन दिवसापुर्वी दुःखद निधन झाले त्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

श्री.कैलास गायकवाड :माजी उपनगराध्यक्ष कै.रतनलालजी सातदिवे यांचे निधन झाल्याने त्यांनाही श्रध्दांजली अर्पण करण्यात येते.

डॉ.भागवत कराड :कुत्रा चावल्यामुळे कु.योगेश निमदाने यांचा मृत्यू त्यास व स.सदस्यांनी श्रध्दांजली अर्पण करण्यासंदर्भात ज्या-ज्या सुचना मांडल्या त्या सर्वांना माझे अनुमोदन आहे.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : पर्वा अपघातात जे नागरीक व विद्यार्थी यांचे दुःखद निधन झाले त्या सर्वांना सभागृहातर्फे श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

श्री.रेणुकादास वैद्य : यास माझे अनुमोदन आहे.

मा.महापौर : शिवसेना नेते कै.प्रमोद नवलकर तसेच कु.योगेश निमदाने, पै.हमीद खान माजी उपनगराध्यक्ष कै.रतनलालजी सातदीवे व अपघातात मृत्यूमुखी पडलेले नागरीक व विद्यार्थी यांना सभागृहातर्फे दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी. यावेळी सभागृहात सर्व उपस्थितांनी २ मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.

श्री.भगवान घडमोडे : स.सदस्य श्री.सिताराम सुरे हे हर्सुल जेलमध्ये आहे. त्यांचेवर एका दुकानदाराने खोटी फौजदारी केस केलेली आहे. त्यास प्रशासन कारणीभुत आहे. त्यांनी अनधिकृत मटन दुकाने बंद करण्यासंदर्भात निवेदन दिले व उपोषणही केले. तरी दुकाने बंद झाली नाही. त्या ठिकाणी आपले कर्मचारी गेले सुरक्षा रक्षकांना घेऊन गेले. दुकाने बंद झाले नाही. त्यांचेवर खोटी केस होऊन सुमारे २० दिवस झाले. त्यांचे कुटूंब चिंतेत आहे. त्यांना मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. यास प्रशासन जबाबदार आहे. मी देखिल अनधिकृत दुकाने बंद करण्यासाठी सांगितले होते.स.सदस्य यांनी केलेली

मागणी रास्त होती यात प्रशासन जबाबदार आहे संबंधीतांवर कार्यवाही करावी.

श्री.संजय जोशी :जनतेने आम्हाला अनधिकृत कामे होऊ नये म्हणून निवडूण दिले. जे काम प्रशासनाकडून होत नाही म्हणून स.सदस्य सोबत तेथे गेले प्रशासनाने सगळे मिळून त्यांना अडकवले. प्रशासन जेंव्हा कुचकामी ठरते तेंव्हा दोष लपवण्यासाठी नगरसेवकांना अडकवले १५ दिवसापासून ते जेलममध्ये आहे असे होत असेल तर कुणी सदस्य अतिक्रमणाच्या बाबतीत बोलण्याची हिम्मत करणार नाही पर्यायाने हे शहर बकाल होईल वाटेल तेथे अतिक्रमण दिसून येईल. नगरसेवक एक प्रशासनाचीच एक बाजू आहे असे आपण गृहीत धरतो असे असतांना नगरसेवकांस प्रशासनाने एकटे बांधलेले आहे. जागेवर काय परीस्थिती झाली होती मा.न्यायालयाने प्रशासनाने काय बाजू मांडली तसेच नगरसेवकांच्या बाजूने काय मत मांडले सविस्तर खुलासा करण्यात यावा.

श्री.प्रशांत देसरडा :स.सदस्य श्री.सिताराम सुरे हे गेल्या सहा महिण्यापासून नागरीकांच्या वतीने दुकान हटविण्याकरीता निवेदन देत होते. उपोषणास बसेल असे पत्र वारंवार दिले. त्या बाबतीत प्रशासनाने कार्यवाही केली नाही असमर्थ राहिले. हा विषय गंभीरतेने घ्यावा. उद्या कोणत्याही नगरसेवकावर किंवा अधिकाऱ्यांवर ही वेळ येवू शकते. वेळावेळी लोकप्रतिनिधी हे प्रशासनाच्या बाजूने असतात. हा पक्षाचा विषय नसून या सभागृहातील ते एक नगरसेवक आहे. मी सुध्दा या दुकानाच्या संदर्भात पत्र दिले यापूर्वी श्री.गांगवे मामा तसेच श्री.नारायण कुचे यांनी अशाच प्रकारे कार्यवाही करण्यास गेले असता त्यांचेवर हमला करण्याचा प्रयत्न झाला होता. स.सदस्य श्री.सुरे यांनी कुणाचा बळी घेतला नाही चोरी केली नाही जनतेच्या मागणीसाठी त्यांना पोलीसानी जाणूनबूजून कट रचला व गून्हा दाखल केला व्यवसायीकांनी खंडनी जमा केली पोलीस स्टेशनला मॅनेज करून व महापालिकेच्या हलगर्जीपणामूळे त्या सदस्यांना आज जेलमध्ये जावे लागते ही खेदाची बाब आहे. नगरसेवक जेलमध्ये व सदर दुकाने आज चालू असून एकाच दुकानास एनओसी आहे जळगाव रस्ता हा व्ही.आय.पी रस्ता असून अशा दुकानाची परवानगी देता येत नाही सहा महिने अगोदर महापालिकेने त्यांचे निवेदनाची दखल घेतली असती तर ही वेळ आज आली नसती. जे कुणी यात दोषी असेल त्यांचेवर कार्यवाही करावी.

श्री.रविकांत गवळी :स.सदस्य श्री.सिताराम सुरे हे या दुकान हटविण्याबाबत गेल्या सहा महिण्यापासून निवेदन देत होते प्रशासनाने वेळीच कार्यवाही केली नाही म्हणून ही वेळ नगरसेवकावर येते खेदजनक बाब आहे. एका जागेच्या भुसंपादनाबद्दल एक सदस्य यांनी गेल्या सहा महिण्यापासून माहिती मागविली होती मा.सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय त्यात झालेला आहे अद्याप माहिती नाही. स.सदस्य श्री.सिताराम सुरे यांनी गेल्या सहा महिण्यापासून दिलेल्या निवेदनावर का कार्यवाही झालेली नव्हती.

श्री.मुजीब आलम खान : आजची सर्वसाधारण सभा ११.३० वाजता आयोजित केली होती ही बैठक दुपारी १.३० वाजता सुरू होते. हे बरोबर नाही. दालनात बसुन सभा घेण्याचे कारण नाही. उद्या सणाचा दिवस असून अनेक कामे आहेत. सभा स्थगित करून दोन चार दिवसानंतर घ्यावे. उद्याच्या सणासाठी एक तास जास्तीचे पाणी सोडण्याचे आदेशीत करावे. कोणत्याही स.सदस्यांना

दुकानावर जाऊन दादागिरी करण्याचा अधिकार आहे का. (यावेळी अनेक सदस्य बोलत असतात)

श्री.भगवान घडमोडे :यापूर्वी अनेक सदस्यांनी अतिक्रमणाच्या संदर्भात असे संकट आलेले होते त्यावेळी आम्ही सदस्यांना भेटण्यासाठी गेलो होतो.

श्री.सय्यद खुसरो :प्रथम विषय पत्रिका घेणार आहे की चर्चा घेणार याबद्दल खुलासा करा. यापुर्वी आपण सांगितले होते की आपण प्रथम विषय पत्रिका घेऊ एकतर विषय पत्रिका घ्या एकतर चर्चा करा.

मा.महापौर :पशुसंवर्धन अधिकारी यांचेकडे स.सदस्य श्री.सुरे यांनी किती व कोणकाणते पत्र दिलेले होते व गेल्या सहा महिण्यात काय कार्यवाही केली यांची सविस्तर माहिती देण्यात यावी.

श्री.अ.रशीद खान :स.सदस्य श्री.अमोदी अबूबकर हेही यापूर्वी जेलमध्ये गेले होते त्यावेळी त्याचे बाबतीत अन्याय होतो म्हणून चर्चा केली नाही.

श्री.संजय जगताप
श्री.अ.साजेद अ.सत्तार : सदर प्रकरण न्याय प्रवीष्ट आहे. खुलासा घ्यायचे कारण नाही खुलासा घ्यायची गरज नाही.

श्री.संजय जोशी : विरोधी पक्षनेता यांनी मागील स्थायी समिती मध्ये कोर्टाचे प्रकरण काढले होते. त्यावेळी कुठे गेला होता धर्म प्रशासनाने काय केले. पत्र काय आहे.----

श्री.अ.रशिद खान : स.सदस्य श्री.अबुबकर अमोदी हे जेल मध्ये गेले होते.

श्री.काशिनाथ कोकाटे : कोण काय काम करत आणि कोण काम करीत नाही. कोर्टाचे प्रकरण आहे चर्चा करता येत नाही. प्रामाणिक पणे पाहिले तर ज्या व्यक्तीवर ही परिस्थिती आलेली आहे. प्रत्यक्ष जायमोक्यावर न जाता संबंधीताशी चर्चा विनिमय न करता काय काम केले वाईट म्हणणे सोपे आहे. चांगले आहे चांगले कसे पटवून द्यावे लागते. याबाबतीत जायमोक्यावर कोणी गेले का वस्तुस्थिती जाणून घेतली का. स.सदस्याचा दोष नाही मा.न्यायालयाचा निकाल बंधनकारक आहे. मागील २ वर्षापासून या विषयावर सतत चर्चा होत आहे. २ वर्षापासून प्रलंबीत प्रकरण आहे. अनधिकृत दुकाने काढले असते तर ही परिस्थिती आली नसती. २ वर्ष काय कार्यवाही केली का काढले नाही.

श्री.रशिद खान : स.सदस्य श्री.अमोदी अबुबकरलाही असेच झाले त्यांचे सदस्यत्व गेले. आपण त्यांना मुदत वाढवून दिली परंतु त्याची दखल घेतली नाही. (यावेळी अनेक लोक बोलतात)

श्री.संतोष खेंडके : श्री.अबुबकर अमोदी यांच्या प्रकरणात महानगरपालिकेचा हस्तक्षेप नाही.

श्री.रशिद खान : इतर सदस्य बोलतानां आम्ही ऐकुन घेतो (यावेळी व्यासपीठासमोर अनेक सदस्य जमतात)

मा.महापौर : सर्व सदस्यांनी आपआपल्या जागेवर बसावे (यावेळी अनेक सदस्य एकाच वेळी जोराने मोठया आवाजात बोलत असतात)

श्री.सलीम खान : मा.महापौर हया महिला आहे हे विचारात घेवून स.सदस्यांनी आपआपल्या जागेवरून चर्चा करावी.

श्री.रशिद खान : आम्ही बोलतानां इतर लोक अडथळा निर्माण करतात. स.सदस्य यांचेवर संकट आले श्री.अबुबकर अमोदीवर यांच्यावरही संकट आले होते. आणखी कुणावरही संकट येईल. श्री.अबुबकर यांचे सदस्यत्व गेले. आज यांच्यावर पाळी आली उद्या दुसऱ्यावर येईल. अनधिकृत मांस विक्रेत्या संबंधात बंदी घालावी स.सदस्याच्या बचावासाठी मा.महापौर व सर्व नगरसेवक यांनी मिळून पोलीस स्टेशनला जाऊन त्यांच्या सुटकेसाठी प्रयत्न करावा.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर :सर्व सदस्यांना या सभागृहात बोलण्याचा अधिकार आहे. नगरसेवक जेल मध्ये जातात ते दुकान कोणत्या समाजाचे आहे हा भाग येत नाही त्यासंदर्भात धोरणात्मक निर्णय व्हावा २ वर्ष पत्रव्यवहार कार्यवाही करत नसाल कोणी खंडणी मागितली तर अडचणीत येऊ शकतात. दुकानासाठी जागा ठरवून द्या. जागा द्या अतिक्रमण काढण्याची बाब सर्वात कमजोर दिसते. अतिक्रमण करायला लावणारे महानगरपालिकेचे अधिकारी आहेत त्यांचेवर कार्यवाही करावी.१ आठवडा अतिक्रमण काढावे वार्ड अधिकारी यांना सक्षम करावे. दररोज रिपोर्ट घ्यावा. यासंदर्भात चर्चा करावी. हे न्यायप्रवीष्ठ प्रकरण आहे. कुठलाही जातीय तणाव न आणता कार्यवाही करावी. संबंधीत खाटीक मुस्लीम समाजाचा नव्हता.

पशुसंवर्धन अधिकारी :महानगरपालिकेत कत्तल विरोधी पथक कार्यरत असून त्यासाठी स्वच्छता निरीक्षक व १ वाहन दिलेले आहे. १६ अनधिकृत मांस विक्रेत्यावर पोलीस केस करून त्यांना अटक केली होती. दररोज सकाळी ५ ते १० वाजेपर्यंत सिल्लेखाना व १० नंतर जळगाव रोडवर दुपारी ११ ते संध्याकाळ पर्यंत १० गार्ड दिलेले आहे. मटन जप्त करून त्यांचेवर पोलीस केस केलेली आहे. वारंवार सिडको पोलीस स्टेशनला कळविण्यात आले व पोलीस मदत मागण्यात आली. पोलीस व महिला सुरक्षा रक्षक लावण्यात आले. रविवारी पत्र दिले होते. घटना घडली त्यावेळी ताबडतोब गेलो होतो. हे लोक उघडयावर मांस विक्री करतात महानगरपालिकेचे वाहन बघितल्यानंतर सर्व साहित्यासह पळून जातात.

डॉ.भागवत कराड : पोलीस प्रोटेक्शन दिले नाही तर वरीष्ठांना तक्रार दिली का.

पशुसंवर्धन अधिकारी : पोलीस निरीक्षकांना प्रत्यक्ष सांगितले आहे.

श्री.काशिनाथ कोकाटे : पोलीसांना पत्र देऊन देखिल पोलीस बंदोबस्त मिळत नाही. म्हणजे आपण पोलीस आयुक्त यांचेशी चर्चा केली असती तर मिळाले असते. पोलीस बंदोबस्त नाही म्हणूनच घटना घडली वर त्यांनी गुन्हा दाखल केला. यासंदर्भात काय कार्यवाही झाली.

सौ.लता दलाल : लाखो रूपये खर्चुन सुरक्षा रक्षक नेमले त्यांनी काय केले. कुठेतरी पाणी मुरते या प्रकरणात स.सदस्य श्री.सिताराम सुरे बळी पडले याबाबतीत चौकशी व्हावी. एका अधिकाऱ्याची चौकशी न करता कदाचित ही साखळी असावी. अनधिकृत व्यवसाय चालतो सुरक्षा रक्षक पशुसंवर्धन विभाग, अतिक्रमण विभाग काय करत होते. सुरक्षा व्यवस्था असतांना ही घटना घडली. एजन्सी का रद्द केली नाही. याचा खुलासा करावा.

श्री.संजय जोशी : स्थायी समिती सभेत स.सदस्य रशिद मामु यांनी पोलींसांचा विषय काढला मा.आयुक्त बोलले होते की पोलीस आयुक्तांशी बोलतो वारंवार आपलेकडील पोलीस घेऊन जातात एका उपायुक्तांना नियुक्त करायचे ठरले होते. एक ते दिड महिना झाला प्रशासन निष्क्रीय झाले आहे. जे पाहिजे तेच प्रशासन करते. मा.आयुक्तांनी स्वत: खुलासा करावा.

श्री.हिम्मतराव दाभाडे : अतिक्रमणाचा विषय आहे. काही नियम पाहिजे दुकानाचा परवाना आहे का. काढले जात नाही.

श्री.प्रशांत देसरडा :एकाच व्यक्तीवर १७ वेळेस गुन्हा दाखल होतो तर पुढील स्टेप काय जर तो व्यक्ती पुन्हा पुन्हा दुकान मांडत असेल तर त्याचे बाबतीत त्याला तडीपार करण्याच्या संदर्भात पोलीस आयुक्त यांचेकडे शिफारस का केली नाही. तो व्यक्ती महापालिकेला पोलीस स्टेशनला जुमानत नाही याचा अर्थ

तो मॅनेज आहे. या संदर्भात श्री.सिताराम सुरे व इतर लोकांच्या बाबतीत मा.न्यायालयात प्रकरण चालू आहे महापालिकेने संबधीत व्यक्ती व नगरसेवकांच्या व कर्मचा-यांच्या बाजूने काय मत मांडले माहिती घ्यावी.

श्री.सलीम खान :आताच खुलासा केला की संबधीत व्यक्तीवर१७ वेळेस पोलीस केस केली नगरसेवकांच्या निवेदना नुसार केली की प्रशासनाने स्वत:हून केली. जर नगरसेवकांच्या निवेदनानुसार कार्यवाही केली असती तर जेल मध्ये नगरसेवकांना जाण्याची वेळ आली नसती.

मा.महापौर : सर्व प्रश्नाचा खुलासा मा.आयुक्तांनी करावा.

श्री.देसरडा प्रशांत :ज्यावेळेस पोलीसात गुन्हा दाखल झाला त्यावेळी संबंधीत व्यक्तीचे मेडीकल केले होते काय?

मा.आयुक्त : घडलेली घटना न्याय प्रवीष्ठ आहे. काय घडणार ते दाखवता येणार नाही. फौजदारी स्वरूपाचे प्रकरण आहे. एक स.सदस्य व दोन सुरक्षा रक्षकावर फौजदारी स्वरूपाचे प्रकरण असल्याने, महानगरपालिका केस दाखल करू शकत नाही. सदरची घटना का घडली पुर्वी काय कार्यवाही झाली या संदर्भात स.सदस्य जळगांव रोडवर अनधिकृत मांस विक्रेत्यांवर कार्यवाही करण्याची मागणी करीत होते. कार्यवाही होत होती. परंतु पुन्हा सुरू व्हायचे १ महिन्यापुर्वी घटना घडली तेथे सुरक्षा रक्षक होते. २ सुरक्षा रक्षकांना अटक झाली कायमस्वरूपी सुरक्षा रक्षक तैनात केले. १ सोडून सर्व उघडयावर मांस विक्री बंद केली. एकाच दुकानात पोलीसांचे नाहरकत प्रमाणपत्र आहे. त्यामुळे या एका दुकानात देखरेखीखाली तात्पुरती १ महिन्याची परवानगी दिली. घटनेबद्दल विशिष्ठ वस्तुस्थिती काय याबद्दल न्यायालयात भाष्य करता येईल. बाहेर भाष्य करता येणार नाही. सदर प्रकरणात वकील लावण्यात आलेले आहे. घटनेबद्दल न्यायालयाबाहेर बोलणे योग्य नाही आपण सुरक्षा रक्षक लावले. सुरक्षा रक्षकांनाही घेऊन गेले. दोन्ही सुरक्षा रक्षक स.सदस्य यांची कायदेशीर बाजू पाहण्यात येईल. प्रतिवादी ३ आहेत सहकार्य करीत आहेत.

श्री.संजय जोशी :महानगरपालिकेने स्ट्राँग वकील लाऊन आपले म्हणणे दाखल केले.

मा.आयुक्त :दाव्यात आपण पार्टी असले तर लावतो.

श्री.संजय जोशी :महानगरपालिकेची फसवणूक होते. ती आपण मा.न्यायालयात दाखवले असते. सुरक्षा रक्षक आपले आहे.

मा.आयुक्त :स.सदस्य आपले आहेत. जी घटना घडली ती महानगरपालिकेच्या कामकाजाच्या निगडित आहे. ३ लोकांवर प्रकरण दाखल केले. तिघांचे वकील आपले आहेत. व आपण त्यांना पेमेंट करून शकतो.

श्री.काशिनाथ कोकाटे : मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमानुसार अनधिकृत मांस विक्री नष्ट करण्याचे अधिकार महानगरपालिकेस आहे. म्हणून सुरक्षा रक्षकांजवळ मांसावर टाकण्यासाठी औषध देण्यात आले. ते टाकतांना मांस विक्रेत्यांनी याचा दुरूपयोग केला. अनधिकृत मांस विक्री नष्ट करण्याचा अधिकार महानगरपालिकेचा आहे. महानगरपालिकाची बाजू मांडणे आपले कर्तव्य आहे. त्यांच्यावर जे कलम लावण्यात आले ते कोणते आहे. जिव घेण्याचा प्रयत्न तो कोठे येतो.

मा.आयुक्त : आपण न्यायालयात दोन्ही वकीलांच्या मार्फत बाजू मांडत आहोत.

डॉ.भागवत कराड : स.सदस्य श्री.सिताराम सुरे यांना पोलीस स्टेशन ते कोर्टापर्यंत कार्यवाहीच्या वेळेस आम्ही होतो. श्री.सिताराम सुरे,दोन सुरक्षा रक्षक, दोन

नागरीक असे पाच लोकांवर गुन्हा दाखल झाला. महानगरपालिकेतर्फे डॉ.रझवी व विधी सल्लागार सौ.थिटे आले होते. मी स्वत: होतो. ३ वकील लावण्यात आले. त्यांच्या वतीने दडले डॉ.रझवी यांनी १७ वेळा गुन्हा दाखल केला हे बोलले नाही. महानगरपालिकेने वकीलांशी चर्चा केली. जामीन मिळाला नाही. महानगरपालिकाचे कोणी वकील नव्हते. स.सदस्य श्री.सिताराम सुरे, सुरक्षा रक्षक व खाजगी व्यक्ती यांचे वकील होते महानगरपालिकाचे कोणी वकील नव्हते. परवानगी रद्द करण्याचा अधिकार महानगरपालिकेचा आहे. लोकांची तक्रार आहे. पोलीसांना का कळवले नाही. महानगरपालिकाने मध्यस्थितीने घेतले नाही.

श्री.भगवान घडमोडे : १० सुरक्षा रक्षक कशासाठी कोण दोषी आहे जबाबदार कोण आहे. दुकान अधिकृत आहे का बांधकाम परवानगी घेतलेली आहे का.

मा.आयुक्त : १ महिन्याच्या देखरेखीखाली दिलेली आहे. पोलीस आयुक्तांचे नाहरकत प्रमाणपत्र आहे. ते कसे दिलेले आहे त्याची तपासणी करून घेण्यात येईल.

श्री.भगवान घडमोडे : दुकानाला नाहरकत प्रमाणपत्र कसे दिले.

श्री.संजय जोशी : कत्तल करण्यासाठी नाहरकत प्रमाणपत्र नाही तेथे जनावरे कापली जातात.

मा.आयुक्त : विक्रीसाठी नाहरकत प्रमाणपत्र दिली आहेत. यात काही चूक झाली किंवा नाही ते तपासून घेऊ चूकीने दिले असेल तर रद्द करू.

श्री.भगवान घडमोडे : कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न असेल तर रद्द करता येत नाही का. १० सुरक्षा रक्षक असुन दुकाने बंद नाही जबाबदार कोण आहे.

मा.आयुक्त : सुरक्षा रक्षक होते त्यांनाही घेऊन गेले. जबाबदारी निश्चित करावी लागेल. सुरक्षा रक्षक असुन का घडले कोणाची जबाबदारी आहे. उपआयुक्तांकडे आताच चौकशी सोपवितो.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर :पोलीस आयुक्तांना पत्र द्यावे. सुरक्षा रक्षक आमचे आहे. नगरसेवकही आमचेच आहे. अनधिकृत काढण्याचा आमचा अधिकार आहे.

श्री.प्रशांत देसरडा : प्रशासन जबाबदार आहे. अधिकाऱ्यांवर केस झाली असती तर काय केले असते.

श्री.सतीष कटकटे : जे अधिकारी जबाबदार आहेत त्यांना निलंबीत करावे.

मा.महापौर : ज्या पध्दतीने कार्यवाही झाली त्याची संगोपान चर्चा झाली अनधिकृत मटन दुकाने बंद करण्याबाबत वारंवार मागणी झाली. अनेक निवेदने त्यांनी दिलेली होती. यात प्रशासनाने हलगर्जीपणा केलेला आहे. कुणी नगरसेवक जनतेच्या हितासाठी काम करीत असतात. ते करीत असतांना अशा प्रकारे नगरसेवकांवर वेळ येते अत्यंत दुर्दैवाची बाब आहे. पशुसंवर्धन अधिकारी यांनी वेळीच याबाबत कार्यवाही केली असती तर ही वेळ आज आली नसती. प्रशासनास आदेशीत करण्यात येते की शहरातील ज्या दुकानांना मांस विक्रीचा परवाना नाही असे सर्व अनधिकृत मांस विक्रीची दुकाने बंद करावी. त्याचा अहवाल माझ्याकडे सादर करावा. प्रशासनाने अतिक्रमण विभाग सक्षम करावा. १७ वेळेस एकाच व्यक्तीवर पोलीसात गुन्हा दाखल होतो तरी ही मांस विक्री त्यांनी बंद केली नाही याचा उल्लेख महापालिकेत नाही्. या प्रकरणात स.सदस्य श्री.सिताराम सुरे त्यांचे बरोबर असेलेले दोन नागरीक व दोन सुरक्ष रक्षक यांना न्याय मिळण्याच्या दृष्टीने जे काय प्रयत्न करता येतील ते करावे. १० गार्ड तेथे कार्यरत असतांना ही दुकाने बंद होवू शकली नाही. तरी असा प्रकार होतो याचा समाधानकारक खुलासा झालेला नाही. यात संपुर्णत: प्रशासन दोषी आहे असे वाटते. आजही त्या ठिकाणी एक

दुकान कशी चालू आहे त्यास एनओसी कशाच्या आधारे दिली याची चौकशी करून एनओसी रद्य केली पाहिजे. २४ मीटर रूंद रस्त्यावर अशी दुकाने न होण्यासाठी नियमात बदल करावयास पाहिजे. पशुसंवर्धन अधिकारी यांनी जबाबदारीने हे काम हाताळणे आवश्यक होते. ते त्यांनी हाताळले नाही. असे या सभागृहाचे मत आहे. त्यासाठी प्रशासनाला आदेश करण्यात येते की त्यांचेकडून त्या विभागाचा चार्ज काढून घेवून व एक वेतनवाढ थांबविण्यात यावी.

श्री.अ.रशिद खान : कोणत्या नियमाने करायचे हे सर्वस्वी चुकीचे आहे.

श्री.संजय जगताप : विना चौकशीने कसे करतात अधिकाऱ्यांचा अपमान करू नका.

श्री.सलीम खान : विना चौकशी वेतनवाढ थांबविण्याचा निर्णय घेता येतो का?

मा.महापौर :मा.आयुक्त यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करून जे दोषी असतील त्यांचेवर कार्यवाही करावी. पुढील बैठकीपर्यत अहवाल सादर करावा असे आदेशीत करण्यात येते.

सभा १५ मिनिटासाठी तहकुब करण्यात आली. सभा दुपारी-२.३५ वाजता तहकुब करण्यात आली व सभेची सुरूवात दुपारी ३.४० मिनिटांनी झाली.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : कुत्र्यांच्या संदर्भात असलेला विषय घेण्यात यावा.

डॉ.भागवत कराड : या विषयाच्या संदर्भात अंदाजपत्रकास देखिल मंजुरी घेण्यात यावी.

श्री.सतीष कटकटे : माझ्या प्रश्नाचे उत्तर अद्याप मिळालेले नाही.

मा.आयुक्त : उत्तर उद्या दुपार पर्यंत देण्यात येईल.

श्री.संतोष खेंडके : पानदरीबा रस्त्याच्या संदर्भात काय कार्यवाही झाली.

मा.आयुक्त : सदर प्रकरण मा.सर्वोच्च न्यायालयात आहे. मा.उच्च न्यायालयात अपील केले आहे.

श्री.प्रशांत देसरडा : मा.सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय आहे त्यांना कळवावे मा.उच्च न्यायालयात अपील करण्याचा प्रश्नच येत नाही.

मा.आयुक्त : ४ प्रकरणामध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाची स्थगिती आहे. आपण जे म्हणतात त्यासही स्थगिती आहे. आपण मा.उच्च न्यायालयात ट्रिब्युनलच्या विरोधात अपील केलेले आहे. आपण मा.उच्च न्यायालयात सर्व मुद्दे घेऊन गेलेलो आहोत.

श्री.प्रशांत देसरडा : मा.सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय व वक्फ ट्रिब्युनलने स्थगिती दिली. हे योग्य आहे वाटते का ?

मा.आयुक्त : कोणत्याही कोर्टाबद्दल आपण बोलू शकत नाही.

श्री.प्रशांत देसरडा : विकासाच्या कामासाठी काहीही झाले तरी हरकत नाही.

मा.आयुक्त : आता स्थगिती आली. मा.उच्च न्यायालयात जाऊन स्थगिती उठवावी लागेल. कायदेशिररित्या सक्षम न्यायालयाची स्थगिती आहे. वक्फ ट्रिब्युनल विरूध्द उच्च न्यायालयात अपील करता येते.

सौ.लता दलाल : वक्फ ट्रिब्युनल मोठे की मा.सर्वोच्च न्यायालय मोठे आहे.

मा.आयुक्त : याबद्दल मी बोलू शकत नाही. कायदेशिर अधिकार मिळेल ते करू. न्यायालयाचे आदेश आहेत. उर्वरीत ४ मिळकतीवर मा.सर्वोच्च न्यायालयाची स्थगिती आहे.

श्री.प्रशांत देसरडा : आज कोणत्याच प्रकारची स्थगिती नाही. असेल तर वाचून दाखवावे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : न्यायालयाची स्थगिती आहे तोपर्यंत कोणीही पाडू शकत नाही. (यावेळी व्यासपीठासमोर अनेक सदस्य जमतात व एकाच वेळी अनेक सदस्य मोठया आवाजात बोलतात)

श्री.सतीष कटकटे :हा रस्ता रूंद करण्यासाठी लोकांची घरे केव्हा पाडण्यात आली व मा.न्यायालयाचे स्थगिती केव्हा आलेली आहे.

डॉ.भागवत कराड : हा रस्ता गुलमंडी रस्त्याला समांतर रस्ता आहे. १३ वर्षापूर्वी पैसे भरलेले आहे रस्ता रूंदीकरण सुरू केले होते. एकाच ठिकाणी काम अडवले वक्फ ट्रिब्युनलची स्थगिती आहे. गुलमंडीला समांतर रस्ता होईल लवकरात लवकर व्हावे सर्वांची भावना आहे.

श्री.अ.रशीद खान : या रस्त्याच्या संदर्भात बोहरी समाजाची अडचण होती. पानदरीबा मस्जीदचा प्रश्न होता त्यावेळी सर्व मिळून गेलो होतो. त्यावेळी मा.सर्वोच्च न्यायालयाची ४ प्रकरणात स्थगिती होती. वक्फ ट्रिब्युनल हे जिल्हाधिकारी कार्यालयात आहे. त्यांनी स्थगिती दिली. मा.उच्च न्यायालयात याबद्दल माहिती सांगण्यात येईल.

सौ.लता दलाल : आपण सर्वांनी जाऊन सामंजस्याने सोडवले बोहरी व गवळी समाजाचा प्रश्न निकाली निघाले. दुकाने अतिक्रमीत आहेत. काही मंडळी वक्फ ट्रिब्युनल मध्ये गेली. मा.सर्वोच्च न्यायालयाचे आदेश पास झाले नाही. वक्फ ट्रिब्युनल आहे हे लक्षात आणून द्यायचे होते. स्थगिती येईल याची वाट का पाहायची.

श्री.सतीष कटकटे : मा.सर्वोच्च न्यायालयाची तारीख काय आहे व स्थगिती केव्हा आली.

डॉ.भागवत कराड : दोन तिन दुकाने असेल त्यास पर्याय दिला तर निघू शकेल. असा प्रयत्न केला का. केला असेल तर मान्य होईल.

मा.आयुक्त :सर्व संबंधीत स.नगरसेवक मा.महापौर मा.उपमहापौर तेथे गेलो त्यावर तोडगा काढला दुसऱ्या दिवशी तात्काळ पाठवले होते परंतु स्थगिती आली. १-२ वेळा वक्फ ट्रिब्युनल मध्येच प्रयत्न केला. त्यानंतर मा.उच्च न्यायालयात गेलो. जोपर्यंत मा.उच्च न्यायालयाची स्थगिती उठत नाही तोपर्यंत आपण कोणताही निर्णय घेवू शकत नाही.

श्री.सतीष कटकटे : १४ महिन्यापर्यंत काय केले. पुर्ण रस्त्यासाठी स्थगिती आहे का.

मा.आयुक्त : मस्जीदला लागुन ३ दुकाने आहे. ४ प्रकरणात मा.उच्च न्यायालयात जिंकलो होतो. त्यास मा.सर्वोच्च न्यायालयाची स्थगिती आली.

श्री.प्रशांत देसरडा : माझे असे मत आहे की, सर्व संचिका मागवून ज्येष्ठ विधीज्ञांना सल्ला घेतला तर वस्तुस्थितीची माहिती होईल. श्री.पगारे कोण आहेत माहित नाही.

श्री.सतीष कटकटे : अतिक्रमण काढण्यात यावे.

मा.आयुक्त : स्थगिती असतांना काढता येत नाही.

श्री.संतोष जेजुरकर : उर्वरीत काम चालू करावे.

श्री.संतोष खेंडके : पुढील अतिक्रमण काढावे.

श्री.भगवान घडमोडे : मा.आयुक्त सक्षम आहेत यात शंका नाही. परंतु तेथे आपले अधिकारी विलंब करून स्थगिती आणण्यासाठी वेळ देतात. कालावधी कशामुळे देण्यात आला. अधिकाऱ्यांची चूक आहे का संधी द्यायची, स्थगितीची तारीख बघावी चौकशी करण्यात यावी. जेथे मा.न्यायालयाची स्थगिती नाही तेथे उद्यापासून काम सुरू करण्यात यावे.

सौ.लता दलाल : कॅव्हेट दाखल करून ठेवावे.

मा.महापौर :पानदरीबा रस्ता रूंदीकरणाच्या संदर्भात प्रशासनाने कायदेशीर बाबी तपासून विधीज्ञांचा सल्ला घ्यावा. स्थगिती असलेल्या मिळकतींची जागा सोडून रस्त्याचे काम सुरू करावे. कॅव्हेट दाखल करावे.

श्री.संतोष जेजुरकर : गारखेडा भागात आदेश असुन देखिल काम चालू आहे. रद्द करावे. दत्त मंदीराची परवानगी रद्द करावी.

मा.आयुक्त : सर्वे नं ५५ वर तहसीलदार औरंगाबाद यांनी आदेश दिले आहे की मोजनी होत नाही तोपर्यंत बांधकाम थांबवण्यात यावे.

श्री.कैलास गायकवाड : स.सदस्यांनी दिलेले पत्र सर्वे नं.५५ च्या संदर्भात आहे. बांधकाम परवानगी सर्वे नं ६० च्या संदर्भात आहे. याचा संबंध येत नाही.

मा.आयुक्त : शासकीय मोजणी होत नाही तोपर्यंत बांधकाम थांबवून घेऊ.

श्री.वसंत नरवडे पाटील : कुत्रे चावा घेतात त्यापासून भिती निर्माण होते. त्यासाठी पर्यायी जागा शोधण्यात यावी.

श्री.संजय जगताप : बांधकाम परवानगी रद्द करण्यात यावी. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न आहे. मोठे बिल्डर आहे.

मा.आयुक्त : जो परवाना दिला त्या जागेची जोपर्यंत शासकीय मोजणी होत नाही तोपर्यंत कोणीही बांधकाम करू नये.

**<u>विषय क्र.१६ :</u>**

दिनांक १०.१०.२००७, ११.१०.२००७ आणि दि.२२.१०.२००७ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**<u>ठराव :</u>**

दिनांक १०.१०.२००७, ११.१०.२००७ आणि दि.२२.१०.२००७ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते,

**<u>विषय क्र.१७ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शहरातून विशेष आरोग्य सेवा व वैद्यकीय सेवा देण्यासाठी शहरातील खाजगी वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या तज्ञ डॉक्टरांची पदे मानद विशेष वैद्यकीय तज्ञ (ऑनररी) म्हणून प्रतिमाह रू.१५००/- (रूपये एक हजार पाचशे फक्त) मानधनावर पदनिर्मीती करणे जरूरी आहे सदरील पदे खालील प्रमाणे.

| अ.क्र. | तज्ञ | शै.पा. | पदसंख्या | मानधन (रू) प्रतिमाह |
|---|---|---|---|---|
| ०१. | मेडीसीन तज्ञ | एम.डी.मेडीसीन व १० वर्षाचा अनुभव तसेच ५ वर्षाचा शिकविण्याचा अनुभव | ०१ | रू.१५००/- |
| ०२. | बालरोग तज्ञ | एम.डी.व १० वर्षाचा अनुभव तसेच ५ वर्षाचा शिकविण्याचा अनुभव | ०१ | रू.१५००/- |
| ०३. | नेत्र रोग | एम.एस.व १० वर्षाचा अनुभव तसेच ५ वर्षाचा शिकविण्याचा अनुभव | ०१ | रू.१५००/- |
| ०४. | होमीओपॅथी तज्ञ | बी.एच.एम.एस. व २ वर्षाचा शिकविण्याचा अनुभव | ०१ | रू.१५००/- |

वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार शहरातून विशेष आरोग्य सेवा व वैद्यकीय सेवा देण्यासाठी शहरातील खाजगी वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या तज्ञ डॉक्टरांची पदे मानद विशेष वैद्यकीय तज्ञ (ऑनररी) म्हणून प्रतिमाह रक्कम रू.१५००/- (अक्षरी रूपये एक हजार पाचशे फक्त) मानधनावर पदनिर्मीती करणे जरूरी आहे,करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**<u>चर्चा :</u>**

डॉ.भागवत कराड :सोनोग्राफी व होमिओपॅथी एका ऐवजी पाच घेण्यात यावे.

श्री.संजय जोशी : रू.१५०० मानधन दाखवलेले आहे. खरच १५०० वर काम करणार आहेत का. सदर प्रस्तावात किती वेळ काम करणार आहेत. याचा कुठे उल्लेख आलेला नाही.

डॉ.भागवत कराड : महानगरपालिकेकडे तज्ज्ञ डॉक्टरांनी काम करावे. १० वर्षाचा अनुभव व रू.१५०० महिना मानधनावर काम करण्याची पध्दत आहे. मानधन फक्त रू.१५०० दिलें जाते शासनामध्ये देखील रू.१५०० देण्यात येतात. आणि हे जाण्या येण्यासाठी दिले जाते. वैद्यकीय सेवा ही सेवा आहे. खाजगी दवाखान्यात जाऊ शकत नाही.

श्री.संजय जोशी : हे डॉक्टर महिनाभर किंवा महिन्यातुन १ घंटा येणार, दररोज येणार का कामाचे तास कसे असणार मानधनावर असले तरी ते किती वेळ येणार व केव्हा येणार हे प्रस्तावात नमुद करणे आवश्यक आहे.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : त्यांना वार ठरवून द्यावे. त्याप्रमाणे उपलब्ध होतील.

श्री.संजय जोशी : मानद विशेष वैद्यकीय तज्ज्ञ आहेत. ते त्यांच्या वेळेप्रमाणे येतील. त्यांच्याशी चर्चा आवश्यक आहे. प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.

आरोग्य वैद्यकीय अधि. : जे मानद विशेष वैद्यकीय तज्ज्ञ देणार आहेत. ते आठवडयातुन एकदा त्यांच्या सोयीनुसार येतील.

श्री.संजय जोशी : संयुक्त पत्रकार परिषद घ्यावी व घोषीत करण्यात यावे की, मानद विशेष वैद्यकीय तज्ज्ञ दवाखान्यावर हजर राहतील.

श्री.प्रशांत देसरडा : पदाधिकारी यांनी पत्रकार परिषद घ्यावी.

मा.महापौर : सोनोग्राफी स्त्री रोग तज्ज्ञ ३ पदे,फिजीओ थेरोपीस्ट ३ पदे आणि कुत्रा चावा घेतल्यानंतर त्यांच्यावर उपचारासाठी देखिल तज्ज्ञ नेमावे.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहरातून विशेष आरोग्य सेवा व वैद्यकीय सेवा देण्यासाठी शहरातील खाजगी वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या तज्ज्ञ डॉक्टरांची पदे मानद विशेष वैद्यकीय तज्ज्ञ (ऑनररी) म्हणून प्रतिमाह रू.१५००/- (रूपये एक हजार पाचशे फक्त) मानधनावर खालीलप्रमाणे पदनिर्मीती करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

| **अ.क्र.** | **तज्ज्ञ** | **शै.पा.** | **पदसंख्या** | **मानधन (रू) प्रतिमाह** |
|---|---|---|---|---|
| ०१. | मेडीसीन तज्ज्ञ | एम.डी.मेडीसीन व १० वर्षाचा अनुभव तसेच ५ वर्षाचा शिकविण्याचा अनुभव | ०१ | रू.१५००/- |
| ०२. | बालरोग तज्ज्ञ | एम.डी.व १० वर्षाचा अनुभव तसेच ५ वर्षाचा शिकविण्याचा अनुभव | ०१ | रू.१५००/- |
| ०३. | नेत्र रोग | एम.एस.व १० वर्षाचा अनुभव तसेच ५ वर्षाचा शिकविण्याचा अनुभव | ०१ | रू.१५००/- |
| ०४. | होमीओपॅथी तज्ज्ञ | बी.एच.एम.एस. व २ वर्षाचा शिकविण्याचा अनुभव | ०१ | रू.१५००/- |

तसेच सोनोग्राफीसाठी स्त्री रोग तज्ज्ञ ३ पदे,फिजीओ थेरोपीस्ट ३ पदे आणि कुत्रा चावल्यानंतर त्याच्या औषधोपचारासाठी देखिल मानद विशेष वैद्यकीय तज्ज्ञ यांची मानधनावर पदनिर्मिती करणेस मंजुरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सिडको प्रशासनाने महानगरपालिकेस दिनांक २.८.२००५ रोजी पत्राव्दारे कळविले आहे की, सिडकोच्या सर्व्हे नं.२३,२४ मौजे गारखेडा लगत असलेल्या जयभवानीनगर व हनुमाननगर या वसाहतीतील काही नागरिकांनी नैसर्गिक नाल्यावर घरांची पक्की बांधकामे केल्यामुळे सिडकोच्या अधिकृत एन-३, एन-४ या वसाहती मधुन वाहत येणारे पाणी तुंबून नागरिकांच्या घरात शिरते. त्यामुळे नाल्याचे बांधकाम करण्यात यावे आणि सदरील वसाहतीस सिडको अधिसुचित क्षेत्रातुन वगळण्यात आलेले असल्यामुळे सिडकोस नाल्याचे काम करणे शक्य नाही आणि सदर भाग महानगरपालिकेच्या हद्दीत मोडत असल्यामूळे महानगरपालिकेने ते करावे.

आता सिडकोचे हस्तांतरण महानगरपालिकेकडे झालेले आहे. जयभवानी नगर मध्ये सिडकोतील नाल्याचे पाणी येत असल्याबाबत प्रभाग क्र.८१ च्या स.नगरसेविका सौ.पुष्पाताई बाळूनाना शिंदे यांनी दिनांक ०६.०८.२००५ रोजी पत्रान्वये कळविले आहे आणि तद्नंतर वेळोवेळी नाल्याचे बांधकाम करणेसाठी त्या पाठपुरावा करीत आहेत. त्यांची ही विनंती योग्य आहे, कारण अधिकृत भागातील पाणी त्यांच्या भागात येते. त्यामुळे त्याची योग्य तऱ्हेने विल्हेवाट लावणे आपणास आवश्यक व क्रमप्राप्त आहे.

सदर नाल्यास ट्रेन करून बांधकाम करणेचे झाल्यास चालू दरसूची सन २००६-०७ नुसार अंदाजीत रक्कम रूपये १.०० कोटी खर्च अपेक्षीत आहे. नाल्याचे बांधकाम करतांना काही अतिक्रमणे देखील काढणे गरजेचे आहे. तसेच काही ठिकाणची मालकीहक्क असलेली बांधकामे पाडुन ती जागा संपादीत देखील करावी लागणार आहे.

सदर नाल्याची सद्यस्थितीची पाहणी संबंधित स.नगरसेविका व सभापती, प्रभाग समिती इ यांच्या समवेत करण्यात आली आहे. वास्तविक स्थितीचे अवलोकन करता पावसाळयात पावसाचे पाणी त्या परिसरातील नागरिकांच्या घरात शिरत असल्यामूळे नाला ट्रेनिंग/बांधकाम करणे लोकहिताच्या दृष्टीने आवश्यक वाटते. सदरील कामासाठी सन २००६-०७ च्या अर्थसंकल्पात तरतुद उपलब्ध नाही. तरी प्रस्तावाबाबत विचारविनिमय होऊन आर्थिक तरतूद उपलब्धतेसाठी आणि चालु दरसूचीनुसार तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक रक्कम रूपये १.०० कोटी बाबत योग्य त्या निर्णयास्तव सादर.

**चर्चा :**

श्री.सलीम खान : १ कोटीचे कामासाठी पैसे कुठुन येतात नगरसेवकांनी सांगितलेले कामे होत नाही.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : हा प्रश्न प्रशासनाचा आहे.

श्री.काशिनाथ कोकाटे : सदरचे काम करणे अत्यंत आवश्यक आहे. शासनाकडून १.७५ कोटी येणार आहे. त्यातील २५ लक्ष यावर्षी खर्च करावे. पुढील वर्षी ७५ लाख खर्च करावे यास मान्यता द्यावी.

श्री.सय्यद खुसरो :धार्मिक मिळकतीमध्ये पाणी घुसणार आहे. ते काम करण्यासाठी पैसे नाही. याकामासाठी कसे आले.

मा.आयुक्त :त्याचे अंदाजपत्रक तयार करीत आहोत पुढच्या सर्वसाधारण सभेमध्ये घेऊ.

श्री.प्रशांत देसरडा : सदर भागात काही जागा संपादीत करावी लागेल. अतिक्रमण आहे का हेही पाहावे लागेल. मालकी हक्काचे कागदपत्र निट पाहावे लागतील. शासकीय जागा असेल तर शासकीय जागेचे व मालकीहक्काचे कागदपत्रे तपासावे.

श्री.वसंत नरवडे पाटील : अनेक भागात कामे असतात धार्मिक भावना दुखावल्या जाऊ नये जातीवाद चा प्रश्न नाही. परंतु पाणी जात असेल तर काम करावे.

श्री.सलीम खान : माझ्या वार्डातील तीन चार वेळेस प्रत्यक्ष नाल्याची पाहणी करून काम करण्यास मागणी केली त्या भागात बाजूला ब्राम्हण समाजाची घरे आहे

नाल्याची मोठया प्रमाणात दुर्गंधी येते तेथे चार पाच लक्ष खर्च करण्यास तयार नाही या कामासाठी लाखो रूपये कोठून खर्च करणार आहे.

मा.महापौर :अशाच प्रकारची कुठे अडचण असेल तर त्या ठिकाणी प्रशासनाने पाहणी करून त्या कामाचे संबंधीत विभागाने अंदाजपत्रक तयार करावे. काम होईल याची दखल घ्यावी. सदर प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिडकोच्या सर्व्हे नं.२३,२४ मौजे गारखेडा लगत असलेल्या जयभवानीनगर व हनुमाननगर या वसाहतीतील काही नागरिकांनी नैसर्गिक नाल्यावर घरांची पक्की बांधकामे केल्यामुळे तसेच जयभवानी नगर मध्ये सिडकोतील नाल्याचे पाणी येत असल्याबाबत प्रभाग क्र.८१ च्या स.नगरसेविका सौ.पुष्पाताई बाळूनाना शिंदे यांनी दिनांक ०६.०८.२००५ रोजी पत्रान्वये कळविले असल्यामूळे, सदर नाल्यास ट्रेन करून बांधकाम करणेचे रक्कम रूपये १.०० कोटीच्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.३५ अंतर्गत बारापुल्ला, गरमपाणी व कोहीनुर कॉलनी भागातील रस्त्यांचे डांबरीकरण करणे. या कामाचे सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन २००६-२००७ च्या दरसुचीनुसार रक्कम रू. २७,४८,६१०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च २००७-०८ या आर्थिक वर्षात पुर्न:डांबरीकरण या लेखाशिर्षातुन करण्यात येत आहे. प्रस्तुत कामातील रस्त्यांची एकुण लांबी १६६५ मीटर व रूंदी सर्वसाधारण ७ मीटर आहे.

तरी रक्कम रू. २७,४८,६१०/- चे अंदाजपत्रकाचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मंजूरीस्तव व विचारार्थ सादर.

मा.महापौर : मंजुर करण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.३५ अंतर्गत बारापुल्ला, गरमपाणी व कोहीनुर कॉलनी भागातील रस्त्यांचे डांबरीकरण करण्याचे रक्कम रू. २७,४८,६१०/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २० :**

मा.आयुक्त यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद, महानगरपालिका आणि छावणी परिषद, या प्रांधिकरणामधील जकात कराच्या हिस्या संदर्भातील दि.१.०४.२००२ ते ३१.०३.२००७ या कालावधीचा करारनामा संपूष्टात आलेला आहे. त्यामुळे दि.१.०४.२००७ पासून पुढील पाच वर्षासाठी जकात कराच्या हिस्याची वाढीव स्वरूपाची मागणी दि.११.०४.२००७ व दि.१०.१०.२००७ रोजीच्या पत्रानुसार छावणी परिषदेच्या वतीने जकात कराचा हिस्सा इतर महानगरपालिकेतर्फे इतर छावणी परिषदेस लोकसंख्येच्या प्रमाणात देण्यात येतो त्यानुसार द्यावा किंवा केंद्र शासनाच्या दि.१७.८.२००७ रोजीच्या पत्राप्रमाणे जकात कराचा हिस्सा औरंगाबाद महानगरपालिकेने सुध्दा द्यावा अशी मागणी केली असता याबाबत औरंगाबाद महानगरपालिकेच्या वतीने स्पष्ट करण्यात आले की, शहरातील छावणी परिषदेची भौगोलिक परिस्थिती हि इतर महानगरपालिकेतील छावणी परिषदे सारखी नसून याठिकाणी लहान मोठी २५-३० दुकाने असल्याने ती इतर छावणी परिषदेपेक्षा वेगळी आहे.

छावणी परिषदेच्या हद्दीमध्ये नव्याने तयार करण्यात आलेल्या नगररोड (गोलवाडी) जकात नाक्याचे चालू आर्थिक वर्षातील जकातीचे निव्वळ सरासरी उत्पन्न १८.२५ कोटी लक्षात घेऊन आणि राज्य शासनाच्या दि.३१.१०.१९९८ रोजीच्या आदेशानुसार ९.६९% च्या प्रमाणात वार्षिक जकात कराच्या हिस्याची रक्कम रू.१,७६,८४,०००/- (एक कोटी शहात्तर लाख चौऱ्यांशी हजार फक्त) एवढी रक्कम छावणी परिषदेस अदा करणे आवश्यक आहे.

सद्यस्थितीत जकातीचे खाजगीकरण झाल्यामुळे प्रत्येक नाक्याचे खरे उत्पन्न काढता येत नसल्यामुळे दिनांक १.४.२००७ ते ३१.३.२००८ या आर्थिक वर्षाकरीता जकात कराचा हिस्सा रक्कम

रू.१,७६,८४,०००/-(एक कोटी शहात्तर लाख चौऱ्यांशी हजार फक्त) एवढी रक्कम अदा करावी लागेल किंवा शासनातर्फे जकात कराचे निर्मुलन होईपर्यंत प्रत्येक वर्षी जकातीच्या एकुण उत्पन्नावर १.६% प्रमाणे जी रक्कम येईल त्या प्रमाणात प्रत्येक वर्षी छावणी परिषदेस जकात कराचा हिस्सा अदा करावा लागेल.

वरिल प्रमाणे जकात कराचा हिस्सा छावणी परिषदेस देण्यासाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम - १९४९ चे कलम -३२ (४) मधील तरतूदीप्रमाणे करारनामा करण्यासाठी प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

<u>चर्चा :</u>

श्री.वसंत नरवडे पाटील : महापालिकेचे जकात खाजगीकरणाचे निविदा झालेले आहे जोपर्यंत त्यांचा कार्यकाळ आहे तोपर्यंत निविदा धारकांनी भरावे महापालिकेने का भरायचे.

मा.आयुक्त : नगर नाका येथे ज्या मालावर जकात आकारणी होते. त्याचा काही भाग छावणीचा येतो. छावणी व महानगरपालिकेने वेगवेगळे जकात वसुली करण्याऐवजी महानगरपालिका वसुली करते. सन २००१ मध्ये मा.श्री.नंदलाल यांना यासंदर्भात अरबीट्रेटर म्हणून नेमण्यात आले होते. फक्त नगर नाका येथे छावणीचा भाग येतो. येथील जकातीचा वाटा २ टक्के न देता कमी देण्याचा निर्णय २००१ मध्ये घेण्यात आला होता. अरबीट्रेटरने जे प्रस्तापीत केले तेच प्रस्तापीत करण्यात येते. त्यावेळी त्यांनी जे सांगितले होते ते प्रस्तावीत करण्यात येते. छावणीची मागणी २ टक्के होती फक्त एकच नाका १.६ टक्के प्रस्तावीत केला होता.

श्री.संतोष जेजुरकर : आपण जकातीचा हिस्सा देणार तोल नाके रद्द करणार का.

मा.आयुक्त : ते त्यांनी त्यांच्या कायद्याप्रमाणे लावतात आपण आकारणी करीत नाही.

श्री.वसंत नरवडे पाटील: ठेकेदाराच्या अटीत का घालता येणार नाही. शासनाला कळविले का २००७ चा करार करावयाचा आहे हे पैसे ठेकेदाराने भरावे. १२१ कोटी महापालिका तिजोरीत यायला पाहिजे अशी अट टेंडरमध्ये टाकण्यात यावी.

मा.आयुक्त : प्रत्येक आठवडयाला आम्हाला चेक द्या असे छावणीचे म्हणणे आहे.

श्री.भगवान घडमोडे : १.६ टक्के ठेकेदाराने जादा द्यावे असे म्हणणे आहे. इतर महानगरपालिकेत काय आहे. त्यांचेकडे काय पध्दत आहे.

मा.आयुक्त :छावणीची लोकसंख्या२टक्के आहे त्याचा विचारकरून प्रस्तावीत केलेले आहे

श्री.वसंत नरवडे पाटील: काही मंडळी ३-३ दिवस गाडया सोडत नाहीत. व आपले अधिकारी ऐकत नाहीत. ठेकेदाराची बाजु घेतात.

मा.महापौर : स.सदस्यांच्या भावनांचा विचार करता विषयाची आधी सविस्तर माहिती घ्यावी. या माहिती सोबतच पुन्हा छावनीचे अधिकाऱ्यां सोबत बैठक घेवून या विषयाचा निर्णय पुढील बैठकीत घेण्यात घेण्यात यावा. यासंदर्भातील सर्व माहिती सभागृहाला द्यावी.

मा.आयुक्त : ऑलरेडी चर्चा झालेली आहे वाटाघाटी झालेल्या आहेत.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर :हा विषय मंजूर करण्यास हरकत नाही माहिती सादर करावी.

श्री.संजय जोशी : मान्यता द्यावी.

मा.महापौर : हा विषय मंजूर करण्यात येतो. जी माहिती सभागृहात मागविलेली आहे ती प्रशासनाने ठेवावी.

<u>ठराव :</u>

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, राज्य शासनाच्या दि.३१.१०.१९९८ रोजीच्या आदेशानुसार ९.६९% च्या प्रमाणात वार्षिक जकात कराच्या हिस्याची रक्कम रू.१,७६,८४,०००/- एवढी किंवा जकातीचे निर्मूलन होईपर्यंत जकातीच्या एकूण उत्पन्नावर १.६% प्रमाणे येणारी रक्कम प्रतिवर्षी छावणी परिषदेस अदा करणेस व नियमान्वये करारनामा करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.४७ मधील एन-६ सेक्टर एफ व ई-१ येथील अंतर्गत रस्त्यावर पेव्हर ब्लॉक बसविण्याच्या कामाचे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २००६-०७ जिल्हा दर सुचिनुसार रक्कम रू.२०७००००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन त्यास प्रशासकीय मान्यता झालेली आहे. कामाचा खर्च हा शहरी भागात नविन कॉंक्रीट रस्ते या लेखाशिर्षा अंतर्गत पान क्र. २२०,१८५ अ.क्र.२६,३७ व ३८ तसेच मा.सर्वसाधारण सभा दिनांक १८.०७.०७ विषय क्र.९३४ अ.क्र.२ अंतर्गत तरतुदी मधुन करण्यात येणार आहे.

करीता कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.२०७००००/- चे विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर : मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.४७ मधील एन-६ सेक्टर एफ व ई-१ येथील अंतर्गत रस्त्यावर पेव्हर ब्लॉक बसविण्याच्या कामाचे रक्कम रू.२०७००००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते, तसेच प्रस्तावात नमुद केलेल्या तरतुदीमधुन सदर काम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते,वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय/रूग्णालय, औरंगाबाद येथे औरंगाबाद जिल्हा तसेच मराठवाडा विभागातील रूग्ण उपचारासाठी येतात. त्यामुळे रूग्णालयाच्या परिसरात रूग्ण, रूग्णांचे नातेवाईक, विद्यार्थी इत्यादींची नेहमी वर्दळ असते. तसेच रात्रीच्या वेळी सुध्दा तातडीने रूग्ण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय/रूग्णालय येथे येत असतात. करीता ओ.पी.डी.ला लागुन अपघात विभाग समोर हायमास्ट बसविणेसाठी मा.अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय/रूग्णालय,औरंगाबाद मागणी केलेली असून, हायमस्टसाठी विजपुरवठा तसेच भविष्यातील देखभाल दुरूस्तीचे कामे शासकीय महाविद्यालय/रूग्णालयातर्फे करण्यात येईल अशी हमी मा.अधिष्ठाता यांनी दिलेली आहे. त्यानुषंगाने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय/रूग्णालयाच्या परिसरात ओ.पी.डी.ला लागुन अपघात विभाग समोर २४ मीटर उंचीचा हायमास्ट उभारणेसाठी रक्कम रूपये ४,६१,२१३/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, सदर कामाचा खर्च सन २००७-०८ चे अर्थसंकल्पातील नविन पथदिवे या लेखाशिर्षातुन भागविण्यात येईल.

करीता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय/रूग्णालय परिसरात ओ.पी.डी.ला लागुन अपघात विभाग समोर २४ मीटर उंचीचा हायमास्ट उभारण्याचे अंदाजपत्रक रक्कम रूपये ४,६१,२१३/- चा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**चर्चा :**

श्री.विनायक पांडे :घाटीचे डिन यांनी विनंती केली म्हणून हा प्रस्ताव ठेवलेला आहे त्यांनी रोडबाबतही विनंती केलेली आहे. रस्त्याची देखभाल दुरूस्ती सार्वजनिक बांधकाम करते हायमस्ट ऐवजी पथदिवे जास्त उपयोगी आहे.

मा.आयुक्त : ४.६१ लाख मध्ये जी कामे करावयाची आहे ती त्यांना विचारू व ते म्हणतील ते काम करण्यात येईल.

मा.महापौर : मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय/रूग्णालय येथे ओ.पी.डी.ला लागुन अपघात विभागासमोर हायमास्ट बसविणेसाठी मा.अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय/रूग्णालय,औरंगाबाद मागणी केल्याप्रमाणे विजपुरवठा व भविष्यातील देखभाल दुरूस्तीचे कामे शासकीय महाविद्यालय/रूग्णालयातर्फे करण्यात येईल अशी हमी मा.अधिष्ठाता यांनी दिलेली आहे. त्यानुषंगाने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय/रूग्णालयाच्या परिसरात ओ.पी.डी.ला

लागुन अपघात विभाग समोर २४ मीटर उंचीचा हायमास्ट उभारणेसाठी रक्कम रूपये ४,६१,२१३/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते,वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २३ :**

आयुक्त महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, मा.मुंबई उच्च न्यायालय खंडपिठ सिव्हील याचिका क्र.१४३२/२००४ व तसेच रिट याचिका क्र.१५९६/१९९९ या प्रकरणामध्ये महाराष्ट्र शासनाचे पत्र क्र.संकिर्ण १०२००४/प्रक्र-४२/नवि-२०. दि.२४.०८.२००७ व्दारे ॲनिमल बर्थ कंट्रोल (डॉगरूल-२००१) याची अंमलबजावणी करणे हे महानगरपालिकेस बंधनकारक असल्याबाबत वरील शासन पत्राव्दारे कळविले असून त्यानुसार शहराबाहेर भटक्या श्वानासाठी कोंडवाडा (डॉग शेल्डर हाऊस) बांधावे व त्यानंतर शहरातील भटकी कुत्री तेथे हलवून टप्प्याटप्प्याने त्यांचे निर्बिजीकरण करावे. अशा रितीने हळूहळू भटक्या कुत्र्यांच्या संख्येवर मर्यादा आणून त्याचा उपद्रव काही कालावधीत कमी होईल.

वरील शासनाच्या पत्रानुसार शहराबाहेर भटक्या कुत्र्यांसाठी कोंडवाडा (डॉग शेल्डर हाऊस) बांधण्याकरीता उपलब्ध योग्य जागेत कोंडवाडा बांधण्याचे प्रस्ताव आहेत. सदर कोंडवाडयामध्ये शहरातील मोकाट कुत्रे ॲनिमल बर्थ कंट्रोल (डॉगरूल-२००१) नुसार पकडून निर्बिजीकरण करून या कोंडवाडयात ठेवण्यात येतील. सदर श्वानांना त्याचे आयुष्यापर्यंत कोंडवाडयात ठेवण्यात येणार असल्याने त्याची जोपासना महानगरपालिकेतर्फे करावी लागेल व त्यासाठी अंदाजपत्रकात तरतूद करावी लागेल. जेणे करून शहरातील भटक्या कुत्र्यांची संख्या व उपद्रव कमी होईल.

वरील प्रमाणे प्रस्ताव सर्वसाधारण सभेस मान्यतेस्तव सादर.

**चर्चा :**

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : मा.सर्वोच्च न्यायालयाचे आदेश असेल तर १५ दिवस १ महिन्यात करतो. कुत्रे काय करतात यापेक्षा माणसाने काय करावे हे पाहावे. कुत्रे गरीबांना चावतात. त्यांना अडचण होते त्यांना आर्थिक अडचण निर्माण होते. औषध मिळत नाही खाजगीमध्ये व घाटीमध्ये देखील मिळत नाही आपल्या सर्व आरोग्य केंद्रावर औषध ठेवावे फिरते वाहन ठेवावे. योग्य ती दखल वेळीच घेण्यात यावी वर्षभर नियंत्रण ठेवावे. माणस कमी आणि हॉटेलसमोर कुत्रे जास्त दिसतात. बंदोबस्त करायचा असेल तर त्यांना पकडून लांब सोडून देण्यात यावे. त्यांना समुह झाला तर अग्रेसर होते.

श्री.वसंत नरवडे पाटील: जागा मिळेपर्यंत पर्याय शोधायला हवे. शहराच्या वेगवेगळया भागात ज्या-ज्या प्रभागात खुली जागा आहे. त्याला तार कुंपन करून बाहेर जाता येणार नाही अशी व्यवस्था व्हावी. सदर प्रस्तावात तरतुद किती ठेवली याचा उल्लेख केलेला नाही.

मा.आयुक्त : अंदाजपत्रक तयार आहे.

मा.महापौर :या शहरातील नागरीकांच्या आरोग्याचा प्रश्न आहे सविस्तर माहिती प्रशासनाने या विषयी द्यावी.

श्री.प्रशांत देसरडा : गेल्या १० दिवसात सर्वात जास्त कुत्र्यांवर चर्चा होते. नवीन कायद्याप्रमाणे त्यांना मारता येत नाही. आपण त्यांची शस्त्रक्रिया करतो दिवसातुन फारतर १०-५ शस्त्रक्रिया होत असतील. नियंत्रणात आणण्यास कालावधी लागेल. २ महिन्यात शहरातून १५-२० ठिकाणी १०००-५०० शस्त्रक्रिया व्हावी. दिवसातून ५-६ शस्त्रक्रिया झाल्या तर १०० जन्माला येतात. मुंबई महानगरपालिकेत आपल्या अधिकाऱ्यांना पाठवून ते कोणती यंत्रणा राबवतात त्याचा अभ्यास करावा. कुत्रे धरण्याची यंत्रणा नाही. बी.ओ.टी वर करावे.

श्री.विनायक पांडे : जेथे आरोग्य केंद्र आहे तेथे लस उपलब्ध करून द्यावी. यासाठी फिरते वाहन ठेवण्यात यावे.

श्री.संजय जोशी : यासंदर्भात अवलोकनार्थ याचिका दाखल करावी. किती लोकांना कुत्रे चावले किती अस्वस्थ आहे किती लोकांचे प्राण गेले हे त्यात दाखवण्यात यावे. सध्या शहरात एकाच ठिकाणी नसबंदीची शस्त्रक्रिया होते. एकच डॉक्टर आहे. व एकच वाहन आहे. त्यासाठी २ महिने व्यापक मोहिम चालवावी. गाजर गवत निर्मुलनाप्रमाणे रौप्य महोत्सवी वर्षाप्रित्यर्थ मुकाट कुत्र्यांना आळा घालण्याची मोहिम घ्यावी. खर्च होणार आहे. जी काही कुत्रे असतील त्यांची काळजी घ्यावी लागेल. त्यांच्या उपजिवीका संबंधीत उपाय योजना करावी लागेल. मा.न्यायालयाचे आदेश आहेत. यासंदर्भात नियोजन करावे. जनतेच्या समोर सर्व बाबी आणावे कोंडवाडा कसा असेल. नियंत्रीत करू शकु जागा तरी अंतीम करण्यात यावी. २ महिने मोहिम राबवावी कुत्रा पिसाळला तर डॉ.रझवी साहेबांना फोन करावा. प्रत्येक झोन मध्ये डॉग मॅन ठेवावे.

श्री.गजानन बारवाल हा कोंडवाडा कुठे असणार किती बजेट लागणार आहे. जागा किती लागेल याचा उल्लेख यात नाही. आजची परीस्थिती काय आहे किती कुत्रे पकडले किती कुत्र्याचे ऑपरेशन झालेले आहे. जर जागा निश्चित केली नसेल तर पडेगांव येथे करण्यात यावे.

मा.आयुक्त : कुत्रा चावल्यानंतर ताबडतोब उपचार मिळावयास पाहिजे स्थायी समितीने मान्यता दिली आहे की एक मोफत लस उपलब्ध करून द्यावी. प्रती शस्त्रक्रियेसाठी ६५० रूपये लागतात ज्या भागातून कुत्रे पकडतो नंतर त्याच भागात नेऊन सोडतो ही पध्दत आहे. कुत्र्याच्या कोंडवाडयासाठी अंदाजपत्रक तयार केलेले आहे त्यात पाण्याची व्यवस्था इत्यादी सर्व कामांचा समावेश केलेला आहे. ५०-५० कुत्रे/कुत्री वेगवेगळे ठेवण्यासाठी व्यवस्था करण्यात आली आहे. जागा उपलब्ध झाल्यावर त्यांना स्थलांतरीत करणे गरजेचे आहे २-५ लाखाचा खर्च वाया जाईल. त्रास होऊ नये म्हणून ताबडतोब व्यवस्था करणे गरजेचे आहे. भांडवली खर्च आहे. खाजगीकरण करणे शस्त्रक्रिया करणे शस्त्रक्रियेनंतर उपचार करणे देखभाल करणे डॉक्टरच्या चंमुला प्रशिक्षित करावे लागते.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : जागा शेंद्रा येथे मागणी करावी.

मा.आयुक्त : जागा अंतीम होईपर्यंत त्याचा प्रस्ताव तयार करून शासनाकडे पाठवा कोंडवाडा तात्काळ बांधण्यात येईल. १ ते दिड महिन्यामध्ये काम पूर्ण होऊ शकते अल्प मुदतीच्या निविदा काढण्यात येतील. कुत्रे पकडणे त्यांची शस्त्रक्रिया करणे खाजगी तत्वावर घेऊ कुत्र्यांचे शस्त्रक्रिया केल्यानंतर जेथुन आणले तेथे नेऊन सोडणे यावर नियंत्रण करावे लागेल. कायद्याप्रमाणे आपण दुसरे नष्ट करू शकतो. कुत्र्यांना नष्ट करू शकत नाही.

मा.महापौर : सदर प्रस्ताव अत्यंत भावनात्मक आहे. यावर अत्यंत महत्वाची चर्चा झाली असून हा प्रस्ताव मंजुर करण्यात येत आहे. तसेच या कामाचे ४७ लाखाचे अंदाजपत्रक व १०.०० लाख रूपये शॅान दंश प्रतीबंध लसीसह मंजुर करण्यात येते. प्रशासनास ज्या-ज्या गोष्टी करणे शक्य आहे त्या करण्यात याव्या.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार शहराबाहेर भटक्या कुत्र्यांसाठी कोंडवाडा (डॉग शेल्डर हाऊस) उपलब्ध योग्य जागेत कोंडवाडा बांधणे व प्रस्ताव आहेत. सदर कोंडवाडयामध्ये शहरातील मोकाट कुत्रे ॲनिमल बर्थ कंट्रोल (डॉगरूल-२००१) नुसार पकडून

निर्बिजीकरण करून या कोंडवाडयात ठेवण्यात येतील. सदर श्वानांना त्यांचे आयुष्यापर्यंत कोंडवाडयात ठेवण्यास येणार असल्याने त्यांची जोपासना महानगरपालिकेतर्फे करावी लागेल व त्यासाठी अंदाजपत्रकात तरतूद करणेस आणि सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे या कामासाठी ४७.०० लाख रूपयाच्या अंदाजपत्रकास व १०.०० लाखाचे श्वान प्रतिबंधक लस घेण्यासह सर्वानुमते मंजुरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**स.सदस्यांचे प्रस्ताव**

**विषय क्र. २४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकेचे आर्थिक उत्पन्नाचे प्रमुख्य स्त्रोत हे मालमत्ता असुन मनपाच्या सर्व प्रभाग अधिकाऱ्याकडुन दि.०२.०८.२००७ पत्र देवुन मालमत्ता कर आकारणी व मालमत्ता कर वसुली बाबत वार्ड निहाय अवलोकन केले असता वार्ड अधिकारी यांच्याकडे आकारणी दिल्यापासुन कर आकारणी दिल्यापासुन कर आकारणी वार्ड माहिती खालील प्रमाणे आहे.

| वार्ड | सन | एकुण कर आकारणी |
|---|---|---|
| अ | २००५-०६ | १८७ |
| | २००६-०७ | १८२ |
| ब | २००५-०६ | २०९ |
| | २००६-०७ | १९९ |
| क | २००५-०६ | १०२ |
| | २००६-०७ | ३५ |
| ड | २००५-०६ | ३०० |
| | २००६-०७ | ३२० |
| इ | २००५-०६ | १८८ |
| | २००६-०७ | ३७९ |
| फ | २००५-०६ | ६३५ |
| | २००६-०७ | ८७२ |

कर आकारणी विभाग बंद झाल्यापासून आज पावेतो एकुण ३६०८ मिळकतीत कर आकारणी झाली आहे. म्हणजे सरासरी एकुण वर्षात ३० घराला मालमत्ता कर आकारणी वार्ड अधिकाऱ्यामार्फत करण्यात आले आहे.

कर आकारणी विभाग असतांना सरासरी दरवर्षी ७००० मिळकतीस कर आकारणी करण्यात येत होती. वास्तविकतः प्रतीवर्ष १०००० मिळकती तयार होत असून मालमत्ता कर आकारणी फक्त ३० सरासरी कर आकारणी करण्यात येते, म्हणजे कर आकारणी विभाग बंद झाल्यापासून मनपाचे आर्थिक नुकसान होत आहे.

तसेच कर निरीक्षक हे कर वसूलीचे काम व्यवस्थित न करता कर आकारणी करण्यासाठीच जास्त वेळ देत आहे. यामुळे मालमत्ता कर वसुलीवर याचा विपरीत परिणाम होत आहे. ज्याप्रमाणे प्रशासकीय विभागाचे विभाजन करून वार्ड अधिकाऱ्यास अतिक्रमणे, अनधिकृत बांधकामे रोखण्यात वार्ड अधिकारी अपयशी ठरले आहे. त्याचप्रमाणे कर आकारणी विभाग बंद झाल्यापासून मालमत्ता कर आकारणी वार्ड अधिकारी अपयशी ठरले आहे.

करीता महानगरपालिकेचे होणारे नुकसान भरण्यासाठी व मालमत्तेचे एकघरी रेकॉर्ड ठेवण्यासाठी कर आकारणी विभाग पूर्ववत सुरू करण्यात यावा.

सुचक : श्री.संजय जगताप अनुमोदक : श्री.शेख इब्राहीम शेख इमाम

**चर्चा :**

श्री.संतोष जेजुरकर : सदर प्रस्ताव रद्द करण्यात यावा.

मा.महापौर : सदर प्रस्ताव नामंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव नामंजूर करण्यांत आला.

**विषय क्र. २५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र. ८४ मधील कल्पतरू हौसींग सोसायटी येथील उद्यानास संत गाडगे बाबा नाव देण्यासाठी २०.११.०७ रोजी होणाऱ्या सर्वसाधारण सभेत ठराव ठेवण्यात यावा.

सुचक : श्री.शशांक दामोधर विसपुते अनुमोदक : श्री.सिताराम सुरे, श्री.संजय रिडलॉन

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र. ८४ मधील कल्पतरू हौसींग सोसायटी येथील उद्यानास संत गाडगे बाबा नाव देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते,वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दि.१२.०८.२००७ रोजी वार्ड क्र.९० एकनाथ नगर या वार्डातील चिंतामणी कॉलनी येथील म.न.पा.च्या विहीरीच्या बाजूला विहीरीस जोडून समांतर गड्डा आहे. जो जमीनीच्या केव्हाळला असल्यामुळे तो गड्डा बुजवावा अथवा जमीनीच्यावर कडा बांधावा म्हणून स्थानिक नागरीकांनी मागणी केली परंतु आजपर्यंत बांधला गेला नाही किंवा बुजविला गेला नसल्यामुळे दि.१२.०८.२००७ रोजी मुले क्रिकेट खेळत असतांना विहीरीच्या बाजूचा गड्डा (खोलगट भाग) त्यांच्या लक्षात न आल्यामुळे गौतम बिन्हारे त्याचा दुर्देवी खड्डयातील लगत विहीरीत (बारवात) खोल पाण्यात बुडून मृत्यू झाला. म.न.पा.च्या अग्नीशमकदल त्यास काढू शकले नाही. मृत्यू झालेला मुलगा गौतम कडूबा बिन्हारे तिसऱ्या दिवसावर आला हा मुलगा गरीब कुटूंबातील झोपडपट्टीमध्ये राहणारा होता. केवळ वरील म.न.पा.च्या चुकीमुळे मुलाचा मृत्यु झाला म्हणून त्याच्या पालकास/वारसास रू.१.०० लाख नुकसान भरपाई मदतीस सर्वसाधारण सभेने मंजुरी द्यावी व प्रस्ताव मंजूर करावा.

सुचक : श्री.हिम्मतराव साळुबा दाभाडे

अनुमोदक : श्री.अ.साजेद अ.सत्तार, श्री.के.व्ही.मोरे, श्री.कैलास गायकवाड

**चर्चा :**

| | |
|---|---|
| श्री.गजानन बारवाल | : रू.११,००० मंजुर करावे. |
| श्री.भगवान घडमोडे | : नामंजुर करावा. |
| श्री.सतीष कटकटे | : महानगरपालिकेच्या संबंधीत असेल तर पैसे द्यावे. |
| श्री.हिम्मतराव दाभाडे | :-यास मान्यता द्यावी. गरीब घरातील मुलगा आहे महापालिकेची चूक आहे खडडा बुजविला गेला असता तर ही घटना घडली नसती. |
| मा.महापौर | : मा.पदाधिकारी व मा.आयुक्त यांचेशी चर्चा करून धोरण ठरविण्यात यावे. आपणास विमा काढावयाचे होते. जळगांवने ८ दिवसात केले. |
| मा.आयुक्त | : ज्यांनी १०० टक्के मालमत्ता कर भरलेला आहे त्यांचा २५००० चा विमा काढलेला आहे. ज्यांनी १०० टक्क् टॅक्स भरला आहे किंवा नाही ते पाहावे लागेल. अपघाती मृत्यू विजा होणे, त्यांचेसाठी २५००० रू. विमा आहे १०० टक्के मालमत्ता कर भरणारांना विषय क्र.२६,२७ मध्ये लाभ मिळेल. अपघात कुठेही असो तो मालमत्ता करदाता असावा. यात पूर्ण् कुटूंबाचा समावेश होतो. त्याचा अर्ज भरावा लागेल. |
| श्री.संजय जोशी | : शाळेच्या विद्यार्थ्यांसाठी दोनही मिळेल का पॉलीसीला आपण नाव देऊ. |
| मा.आयुक्त | :ही पॉलीसी फक्त विद्यार्थ्यांसाठी योजना आहे. त्याचे सर्व पैसे राज्य शासनाने महाराष्ट्र राज्यासाठी दिलेले आहे. |
| श्री.हिम्मतराव दाभाडे | :पॉलीसी योजना आता आली असेल परंतू हा मुलगा १२-८-२००७ रोजी पाण्यात बुडून मृत्यू झालेला आहे गरीब घरातील मुलगा आहे . |

मा.महापौर : याबाबत धोरणात्मक निर्णय घेणेसाठी मा.आयुक्तांनी पुढच्या सभेत प्रस्ताव आणावा याबाबतीत सहानुभूती आहे.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे, याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी प्रशासनाने पुढील सभेत प्रस्ताव सादर करावा असे ठरविण्यात आले. त्यास मान्यता देण्यात येते.

**विषय क्र. २७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.उत्तम मनीरामजी अंबादे रा.केदारे निवास, फातेमागर्ल्स उर्दू हायस्कुल समोर, जयसिंगपुरा, औरंगाबाद यांचा मुलगा नामे मयुर उर्फ बंटी उत्तम अंबादे हा खेळता-खेळता मस्जीदीच्या हौदात पडुन दि.२०.१०.२००७ रोजी मृत्यू झाला आहे. श्री.अंबादे यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत खराब असून यांना महानगरपालिकेकडून आर्थिक मदत मिळावी. करीता ठराव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.सलीम खान यासीन खान अनुमोदक : श्री.संजय जगताप, श्री.सतीष कटकटे

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे, याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी प्रशासनाने पुढील सभेत प्रस्ताव सादर करावा असे ठरविण्यात आले. त्यास मान्यता देण्यात येते.

**विषय क्र. २८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मौजे हर्सुल येथील सर्व्हे नं.१८, १५४ चा भाग,१५५ चा भाग व १५६ मध्ये १००% लोकवस्ती झालेली असून विकास योजनेत या भागातील ४ हेक्टर ३० आर जमिन ही कृषी उत्पन्न बाजार समितीसाठी दाखविलेली आहे. त्यामुळे या भागातील गुंठेवारी नियमितीकरण संबंधीत विभागाकडून केली जात नाही. या ४ हेक्टर ३० आर जमिनीबाबत कोणत्याही न्यायालयात कोणताही वाद प्रलंबीत नाही.

मात्र इतर काही सर्व्हे नं. बाबत न्यायालयात वाद असल्यामुळे त्याचा संदर्भ देऊन हया भागातील गुंठेवारी होत नाही. तरी वस्तुस्थिती लक्षात घेवून या भागातील गुंठेवारी नियमितीकरण करण्यासाठी संबंधीतास आदेशीत करण्यात यावे.

करीता मा.सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.सिताराम इसराम सुरे, श्री.संतोष खेंडके पाटील, श्री.मधुकर सावंत,
श्री.पुनमचंद बमणे, श्री.मोहन मेघावाले

अनुमोदक : श्री.भाऊसाहेब ताठे, श्री.महेश माळवतकर, श्री.भागवत कराड, श्री.काशिनाथ कोकाटे
सौ.रजनीताई जोशी, सौ.कला बोरामणीकर

मा.महापौर : मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मौजे हर्सुल येथील सर्व्हे नं.१८,१५४ चा भाग,१५५ चा भाग व १५६ मध्ये १००% लोकवस्ती झालेली असून विकास योजनेत या भागातील ४ हेक्टर ३० आर जमिन ही कृषी उत्पन्न बाजार समितीसाठी दाखविलेली आहे. त्यामुळे या भागातील गुंठेवारी नियमितीकरण संबंधीत विभागाकडून केली जात नाही. या ४ हेक्टर ३० आर जमिनीबाबत कोणत्याही न्यायालयात कोणताही वाद प्रलंबीत नाही.

मात्र इतर काही सर्व्हे नं. बाबत न्यायालयात वाद असल्यामुळे त्याचा संदर्भ देऊन हया भागातील गुंठेवारी होत नाही. तरी वस्तुस्थिती लक्षात घेवून या भागातील गुंठेवारी नियमितीकरण करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील मोहल्ला रोशन गेट येथील रहिवासी तथा औरंगाबाद टाईम्स (उर्दु) न्यूज पेपर या दैनिकांचे संपादक तथा उर्दुचे विख्यात शायर स्व.अल्लमा खमर एकबाल यांच्या नावाचे माझे वार्ड क्र.४२, येथील रस्ता

१. पीरगैब साहाब दर्गा ते कटकट गेट पर्यंत.
२. कटकट गेट ते रोशन गेट पर्यंत या दोन्ही पैकी एका रस्त्याला स्व.अल्लमा खमर एकबाल यांचे नाव देण्यासाठी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.मुजीब आलम शाह खान
अनुमोदक : श्रीमती नजमा बेगम युनूस कुरैशी, श्री.हाजी शेरखान अ.रहेमान, श्रीमती शमशाद बेगम शेख हफीज, श्री.कैसर खान, श्री.शेख इब्राहीम शेख इमाम, श्रीमती खान मेहरून्नीसा हमीद खान, श्रीमती अजरा जबीन मसूद खान
मा.महापौर : मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.४२ मोहल्ला रोशन गेट येथील पीरगैब साहाब दर्गा ते कटकट गेट पर्यंत रस्त्यास औरंगाबाद टाईम्स (उर्दु) न्यूज पेपर या दैनिकांचे संपादक तथा उर्दुचे विख्यात शायर स्व.खमर एकबाल यांचे नांव देणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगपुरा येथे महात्मा ज्योतिबा फुले यांचा पुतळा आहे. त्या पुतळयाच्या बाजूला सावित्रीबाई फुले यांचा पुतळा उभारण्यात यावा. महिला व दिनदलित यांच्या जीवनात शिक्षणाची ज्योत पेटवण्याचे महान कार्य सावित्रीबाई यांनी केलेले आहे. त्या अनुषंगाने महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळयाच्या बाजूला सावित्रीबाई फुलेंचा पुतळा उभारणे यथोचित राहील. तसेच सध्या असलेल्या महात्मा ज्योतिबा फुलेंच्या पुतळयाची उंचीही वाढविण्यात यावी. करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्रीमती मिराताई रामराव शिंदे, श्री.भगवान घडमोडे अनुमोदक : श्री.संजय केनेकर
मा.महापौर : मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगपुरा येथे महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळयाच्या बाजूला सावित्रीबाई फुलेंचा पुतळा उभारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.६९ जवाहर कॉलनी मधील कामासाठी अर्थसंकल्पातील तरतुदीत खालील दर्शविल्याप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यात यावे करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

| अर्थसंकल्प पान नं. | कामाचे नांव | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|
| W-१७९ Sr No.१८ | वार्ड क्र.६९ जवाहर कॉलनी रस्त्यालगत साईड ड्रेन बांधणे - १५.०० लक्ष | वार्ड क्र.६९ जवाहर कॉलनी मनपा शाळा इमारतीस नवीन स्लॅब टाकणे व इतर दुरूस्ती करणे - १५.०० लक्ष |

सुचक : डॉ.आशा बिनवडे अनुमोदक : श्री.काशिनाथ कोकाटे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.६९ जवाहर कॉलनी मधील कामासाठी अर्थसंकल्पातील तरतुदीत खालील दर्शविल्याप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

| अर्थसंकल्प पा नं. | कामाचे नांव | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|
| W-१७९ Sr No.१८ | वार्ड क्र.६९ जवाहर कॉलनी रस्त्यालगत साईड ड्रेन बांधणे - १५.०० लक्ष | वार्ड क्र.६९ जवाहर कॉलनी मनपा शाळा इमारतीस नवीन स्लॅबटाकणे व इतर दुरूस्तीकरणे-१५.०० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.३० येथील लेखाशिर्षक बदलण्याचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत ठेवणे बाबत.

| अ.क्र. | जुने लेखाशिर्षक | नविन लेखाशिर्षक |
|---|---|---|
| ०१ | प्रभाग क्र.३० अंतर्गत ४५० मि.मी.व्यासाची अर्धगोलाकार गटार बांधणे पृ.क्र.डब्ल्यु ६९ अ.क्र.०८ तरतुद रक्कम १.५० लक्ष | प्रभाग क्र.३० येथे विविध ठिकाणी ड्रेनेज व कॉंक्रीटचे फुटकळ कामे करणे. |
| ०२ | प्रभाग क्र.३० हर्षनगर अंतर्गत विविध ठिकाणी खुल्या गटारी बांधणे पृ.क्र.डब्ल्यु ७३ अ.क्र.७ तरतुद रक्कम १.५० लक्ष | प्रभाग क्र.३० अंतर्गत विविध ठिकाणी ड्रेनेजचे तसेच गटारचे फुटकळ काम करणे. |

सुचक : सौ.शोभा मिटकर अनुमोदक : श्री.संतोष जेजुरकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.३० करीता अर्थसंकल्पात असलेल्या कामाचे खालीलप्रमाणे लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

| अ.क्र. | जुने लेखाशिर्षक | नविन लेखाशिर्षक |
|---|---|---|
| ०१ | प्रभाग क्र.३० अंतर्गत ४५० मि.मी.व्यासाची अर्धगोलाकार गटार बांधणे पृ.क्र.डब्ल्यु ६९ अ.क्र.०८ तरतुद रक्कम १.५० लक्ष | प्रभाग क्र.३० येथे विविध ठिकाणी ड्रेनेज व कॉंक्रीटचे फुटकळ कामे करणे. |
| ०२ | प्रभाग क्र.३० हर्षनगर अंतर्गत विविध ठिकाणी खुल्या गटारी बांधणे पृ.क्र.डब्ल्यु ७३ अ.क्र.७ तरतुद रक्कम १.५० लक्ष | प्रभाग क्र.३० अंतर्गत विविध ठिकाणी ड्रेनेजचे तसेच गटारचे फुटकळ काम करणे. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.३९ येथील लेखाशिर्षक बदलण्याचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव ठेवण्यात यावा.

| अ.क्र. | जुने लेखाशिर्षक | नविन लेखाशिर्षक |
|---|---|---|
| ०१ | वार्ड क्र.३९ मनपाच्या खुल्याजागेचा विकास करणेसाठी अर्थसंकल्पातील पृ.क्र.डब्ल्यु २०० अ.क्र.१९ तरतुद रक्कम रू.५ लक्षची | वार्ड क्र.३९ मधील खाराकुंवा, देवडी (जुन्या भुविकास बँकेजवळ) येथील शिट क्र.५४ वरील टोच नकाशा क्र. ८१६६ असुन सदरील जागेचा विकास करणे. |

सुचक : सौ.सिध्द विणा अनुमोदक : श्री.संतोष जेजुरकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.३९ करीता अर्थसंकल्पात असलेल्या तरतूदीचे खालीलप्रमाणे लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

| अ.क्र. | जुने लेखाशिर्षक | नविन लेखाशिर्षक |
|---|---|---|
| ०१ | वार्ड क्र.३९ मनपाच्या खुल्याजागेचा विकास करणेसाठी अर्थसंकल्पातील पृ.क्र.डब्ल्यु २०० अ.क्र.१९ तरतुद रक्कम रू.५ लक्षची | वार्ड क्र.३९ मधील खाराकुंवा, देवडी (जुन्या भुविकास बँकेजवळ) येथील शिट क्र.५४ वरील टोच नकाशा क्र. ८१६६ असुन सदरील जागेचा विकास करणे. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीच्या विविध दुकान केंद्रात अनेक कारणांनी विविध गाळे रिक्त ठेवलेली आहेत. सदरील रिक्त गाळे सर्वसाधारणपणे जाहिरातीव्दारे अर्ज मागवून खुल्या स्पर्धेने वाटप करण्यात येतात. प्रत्येक दुकान केंद्राचा भाडेचा दर निश्चित करण्यात आलेला असतो. त्यामुळे दराबाबत नव्याने धोरण ठरवण्याची आवश्यकता नाही. तथापी रिक्त दुकानाच्या बाबत महानगरपालिकेच्या रस्ता रूंदीकरण प्रस्तावात जे दुकानदार, मालक अथवा भाडेकरू रस्ता रूंदी करणाने पूर्णतः विस्तापीत झाले आहेत. त्या दुकानदारांना प्राधान्याने महानगरपालिकेच्या मालकीचे दुकाने देण्यात यावीत ही योजना विस्तापीत दुकानदारांचे पूनर्वसन योजना म्हणून केवळ एक महिन्याच्या कालावधीसाठी राबविण्यात यावी या योजने अंतर्गत शहरातील विविध भागातील रस्ता रूंदीकरणात विस्तापीत झालेले दुकानदार, मालक, अथवा भाडेकरू महानगरपालिकेचे रिक्त दुकाने भाडे तत्वावर देण्यासाठी अर्ज करू शकतील व त्यांना इतर दुकानदारांना (भाडेकरूंना) लागू केलेल्या सर्व अटी व शर्ती लागू राहतील केवळ महानगरपालिकेच्या विकास योजना प्रस्तावाने (रस्ता रूंदीकरणाने) विस्तापीत झालेले दुकानदार म्हणून प्राधान्याने दुकाने देण्यात येईल वरील निश्चित केलेल्या एक महिन्याच्या कालावधीत संबंधीत अर्ज करणाऱ्या दुकानाचे महानगरपालिकेची भाडे अमानत रक्कम इत्यादी नियमानुसार निश्चित केलेल्या रकमेचा भरणा करून वाटप केलेल्या दुकानाचा ताबा घेणे बंधनकारक राहील. या एक महिन्याच्या कालावधीत दुकानाची मागणी लेखी अर्जाव्दारे न करणाऱ्या व वाटपाअंती दुकानाचा प्रस्ताव नाकारणाऱ्या व्यक्तींना भविष्यात विकास योजना प्रस्तावातील विस्तापीत दुकानदार म्हणून अशा प्रकारच्या कोणत्याही योजनेसाठी मागणी करण्याचा हक्क राहणार नाही. याबाबत स्थानिक वृत्तपत्रात जाहीर प्रगटन देवून जनतेला अवगत करण्यात यावेत करीता मान्यतेसाठी प्रस्ताव सादर.

सुचक : श्री.मधुकर सावंत

अनुमोदक : श्री.महेश माळवतकर, श्री.रवि कावडे, श्री.भगवान घडमोडे, श्री.त्र्यंबक तुपे,
श्री.पुनम बमणे, श्री.प्रकाश अत्तरदे, श्री.सिताराम सुरे, डॉ.भागवत कराड

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीच्या विविध दुकान केंद्रात अनेक कारणांनी विविध गाळे रिक्त ठेवलेली आहेत. रिक्त दुकानाबाबत महानगरपालिकेच्या रस्ता रूंदीकरण प्रस्तावात जे दुकानदार, मालक अथवा भाडेकरू रस्ता रूंदी करणाने पूर्णतः विस्तापीत झाले आहेत,त्या दुकानदारांना प्राधान्याने महानगरपालिकेच्या मालकीचे दुकाने देण्यात यावीत ही योजना विस्तापीत दुकानदारांचे पूनर्वसन योजना म्हणून केवळ एक महिन्याच्या कालावधीसाठी राबविण्यास व या योजने अंतर्गत शहरातील विविध भागातील रस्ता रूंदीकरणात विस्तापीत झालेले दुकानदार, मालक, अथवा भाडेकरू महानगरपालिकेचे रिक्त दुकाने भाडे तत्वावर देण्यासाठी अर्ज करू शकतील व त्यांना इतर दुकानदारांना (भाडेकरूंना) लागू केलेल्या सर्व अटी व शर्ती लागू राहतील. केवळ महानगरपालिकेच्या विकास योजना प्रस्तावाने (रस्ता रूंदीकरणाने) विस्तापीत झालेले दुकानदार म्हणून प्राधान्याने दुकाने देण्यात येईल वरील निश्चित केलेल्या एक महिन्याच्या कालावधीत संबंधीत अर्ज करणाऱ्या दुकानाचे महानगरपालिकेची भाडे अमानत रक्कम इत्यादी नियमानुसार निश्चित केलेल्या रकमेचा भरणा करून वाटप केलेल्या दुकानाचा ताबा घेणे बंधनकारक राहील. या एक महिन्याच्या कालावधीत दुकानाची मागणी लेखी अर्जाद्वारे न करणाऱ्या व वाटपाअंती दुकानाचा प्रस्ताव नाकारणाऱ्या व्यक्तींना भविष्यात विकास योजना प्रस्तावातील विस्तापीत दुकानदार म्हणून अशा प्रकारच्या कोणत्याही योजनेसाठी मागणी करण्याचा हक्क राहणार नाही. याबाबत स्थानिक वृत्तपत्रात जाहीर प्रगटन देवून जनतेला अवगत करण्यात यावेत यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मोहल्ला सौजन्यनगर, महुनगर व न्यु बालाजी नगर येथे जलवाहिनी टाकणे बाबत दि.१५.१२.०६ रोजी विषय क्र.६१६ अन्वये रक्कम रूपये १०,४५,७००/- मा.सर्वसाधारण सभेत मान्यता मिळाली होती.

तसेच सदरील भाग हा व्याप्तीत मोठा असून विविध ठिकाणी जलवाहिणी टाकणे असल्यामुळे व सद्यस्थितीत पाईपचे बाजारभाव वाढल्यामुळे सदरील कामासाठी अंदाजित रक्कम रूपये ३०,००,०००/- (रूपये तीस लाख मात्र) खर्च अपेक्षीत आहे.

करीता मा.सर्वसाधारण सभेने कामाकरीता सुधारीत रक्कम रूपये तीस लाख रूपये यास मान्यता द्यावी ही विनंती.

सुचक : श्री.मधुकर सावंत

अनुमोदक : श्री.त्र्यंबक तुपे, श्री.भगवान घडमोडे, डॉ.भागवत कराड, श्री.पुनम बमणे, श्री.प्रकाश अत्तरदे, श्री.सिताराम सुरे

मा.महापौर : सदरील काम पूढील वर्षीच्या दलित वस्ती सुधार योजनेतून करावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मोहल्ला सौजन्यनगर, महुनगर व न्यु बालाजी नगर येथे जलवाहिनी टाकणेच्या सुधारीत रक्कम रूपये ३०,००,०००/- (रूपये तीस लाख मात्र) खर्चास मान्यता देण्यांत येते. तसेच सदरील काम पूढील वर्षीच्या दलित वस्ती सुधार योजनेतून करणेस मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

## पुरवणी विषय

**विषय क्र. ३६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.७३ सर्वे क्रं.६८,६९,७० एन दोन संत तुकोबा नगर मधील म.न.पा.चे सभागृहाला प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे असे नावाची येत्या सर्वसाधारण सभेत प्रस्ताव ठेवण्यात यावा, प्रस्ताव सर्वसाधारण मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.दामोधर माधवराव शिंदे अनुमोदक : श्री.बाबासाहेब डांगे, श्री.नारायण कुचे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.७३ सर्वे क्रं.६८,६९,७० एन दोन संत तुकोबा नगर मधील म.न.पा.चे सभागृहाला प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे असे नाव देणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, खालील दर्शविलेल्या कामाचे लेखाशिर्षक बदलुन मिळणे बाबत.

| पान क्रमांक | अ.क्र. | तरतुद |
|---|---|---|
| W-२१७ | ०१ | ८.०० |
| W-२२४ | ०४ | ५.०० |
| W-२३० | ०३ | ५.०० |
| | | १८.०० लक्ष. |

उपरोक्त १८.०० लक्ष तरतुद वार्ड क्रमांक १२ जयभिमनगर येथील दैनंदिन ड्रेनेज लाईन, गटार, कॉंक्रीट व रस्ते दुरूस्तीचे काम करणेस्तव वापरण्यात परवानगी देण्यात यावी ही नम्र विनंती.

सुचक : श्री.संजय जगताप अनुमोदक : श्री.सय्यद खुसरो

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१२ करीता अर्थसंकल्पात असलेल्या खालीलप्रमाणे कामाचे लेखाशिर्षक बदलणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

| पान क्रमांक | अ.क्र. | तरतुद |
|---|---|---|
| W-२१७ | ०१ | ८.०० |
| W-२२४ | ०४ | ५.०० |
| W-२३० | ०३ | ५.०० |
| | | १८.०० लक्ष. |

उपरोक्त १८.०० लक्ष तरतुद वार्ड क्रमांक १२ जयभिमनगर येथील दैनंदिन ड्रेनेज लाईन, गटार, कॉंक्रीट व रस्ते दुरूस्तीचे काम करणे. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिका मुख्य सभागृहास यापुर्वी कै.केशव सिताराम ठाकरे सभागृह असे नाव देण्यात आलेले आहे. या सभागृहामध्ये प्रबोधनकार कै.केशव सिताराम ठाकरे यांच्या प्रतिमेचे अनावरण देखील करण्यात आलेले आहे. कै.केशव सिताराम ठाकरे यांचे जयंती/पुण्यतिथी दिनी त्यांना महानगरपालिकेच्या वतीने अभिवादन करण्यात येत नाही. तरी महानगरपालिकेच्या वतीने यानंतर प्रबोधनकार कै.केशव सिताराम ठाकरे यांना त्यांचे जयंती/पुण्यतिथीच्या दिवशी अभिवादन करण्यात यावे. प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

सुचक : श्री.संतोष सुधाकर जेजुरकर

अनुमोदक : श्री.भाऊसाहेब वाघ, श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिका मुख्य सभागृहास यापुर्वी कै.केशव सिताराम ठाकरे सभागृह असे नाव देण्यात आलेले असल्यामूळे व या सभागृहामध्ये प्रबोधनकार कै.केशव सिताराम ठाकरे यांच्या प्रतिमेचे अनावरण करण्यात आलेले असून कै.केशव सिताराम ठाकरे यांचे जयंती/पुण्यतिथी दिनी त्यांना महानगरपालिकेच्या वतीने अभिवादन करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.७८ चिकलठाणा येथील कामाचे शिर्षक बदलने बाबत.

| अ.क्र. | कामाचे शिर्षक | कामाचे शिर्षक |
|---|---|---|
| ०१ | सुलभ शौचालय<br>वार्ड क्र.७८ चिकलठाणा केंद्रीय म.न.पा प्राथमिक शाळेच्या इमारती मधील शौचालय काढून मोकळया जागेच्या पूर्वेस शौचालय बांधणे रू.२.५० लक्ष | शाळा इमारती देखभाल<br>०१. वार्ड क्र.७८ चिकलठाणा येथील म.न.पा. प्राथमिक शाळेतील कंपाउन्ड वालची उंची वाढवून इतर विकासाची कामे करणे. रू.२.५० लक्ष |

वरील प्रमाणे मंजुरी देण्यात यावी.

सुचक : श्री.रवि साहेबराव कावडे अनुमोदक : श्री.भाऊसाहेब वाघ

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.७८ चिकलठाणा येथील कामाचे खालीलप्रमाणे लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

| अ.क्र. | कामाचे शिर्षक | कामाचे शिर्षक |
|---|---|---|
| ०१ | सुलभ शौचालय<br>वार्ड क्र.७८ चिकलठाणा केंद्रीय म.न.पा प्राथमिक शाळेच्या इमारती मधील शौचालय काढून मोकळया जागेच्या पूर्वेस शौचालय बांधणे रू.२.५० लक्ष | शाळा इमारती देखभाल<br>०१. वार्ड क्र.७८ चिकलठाणा येथील म.न.पा. प्राथमिक शाळेतील कंपाउन्ड वालची उंची वाढवून इतर विकासाची कामे करणे. रू.२.५० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ४० :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरात भटक्या कुत्र्यांचा सुळसुळाट झालेला आहे. मोकाट कुत्रे पकडणे, कुत्रा चावल्यानंतरचा उपचार, लसीकरण करणे हे महानगरपालिकेचे कर्तव्य आहे. परंतु वार्ड क्रमांक ८० अंतर्गत अंबिकानगर या ठिकाणी दिनांक १२.१०.२००७ रोजी कुत्रा चावल्यामुळे योगेश अशोक मुनीमाने या मुलाचा मृत्यू दि.७.१२.२००७ रोजी झालेला आहे. त्यांच्या घरची आर्थिक परिस्थिती ही अत्यंत बिकट असल्यामुळे त्यांच्या आई व लहान भावाला महानगरपालिकेतर्फे र.रू.१,००,०००/- (अक्षरी रक्कम रूपये एक लाख फक्त) ची आर्थिक मदत करण्यात यावी.

करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री.नारायण कुचे, श्री.भगवान (बापू) घडमोडे, श्री.दामोधर शिंदे, सौ.पुष्पाताई शिंदे

अनुमोदक : श्री.त्र्यंबक तुपे, श्री.भाऊसाहेब वाघ, श्री.अ.साजेद अ.सत्तार

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्रमांक ८० अंतर्गत अंबिकानगर या ठिकाणी दिनांक १२.१०.२००७ रोजी कुत्रा चावल्यामुळे योगेश अशोक मुनीमाने या मुलाचा मृत्यू दि.७.१२.२००७ रोजी झालेला असल्यामूळे व त्यांच्या घरची आर्थिक परिस्थिती ही अत्यंत बिकट असल्यामुळे त्यांच्या आई व लहान भावाला महानगरपालिकेतर्फे र.रू.१,००,०००/- (अक्षरी रक्कम रूपये एक लाख फक्त) ची आर्थिक मदत करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.४१ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, प्रभाग क्र.२३ मसनतपुर मधील बजेट बुक वार्ड -इ अ.क्र.२५ पान क्र.W-१५० वार्ड क्र.२३ मसनतपुर अंतर्गत ड्रेनेज दैनंदिन देखभाल व दुरूस्तीचे कामा ऐवजी वार्ड क्र.२३ मसनतपुर येथे वेअर हाऊस जवळील शौचालय दुरूस्त करणे रूपये २,५०,०००/- तरी सदरील काम लवकरात लवकर व्हावे, अशी विनंती.

सुचक : श्रीमती मिराताई रामराव शिंदे		अनुमोदक : श्री.नारायण कुचे

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.२३ मसनतपुर मधील बजेट बुक वार्ड -इ अ.क्र.२५ पान क्र.W-१५० वार्ड क्र.२३ मसनतपुर अंतर्गत ड्रेनेज दैनंदिन देखभाल व दुरूस्तीचे **कामा ऐवजी** वार्ड क्र.२३ मसनतपुर येथे वेअर हाऊस जवळील शौचालय दुरूस्त करणे रूपये २,५०,०००/- असे लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

## <u>ऐनवेळचे विषय</u>

**<u>विषय क्र.४२ :</u>**

आयुक्त,महानगरपालिका प्रस्ताव सादर करीत आहेत की, सन २००७-०८ च्या अर्थसंकल्पामध्ये रोग प्रतिबंधक विभाग-लस खरेदी सांकेतांक क्र.आर.ई.-२८२ या लेखाशिर्षामध्ये लस खरेदी करीता रूपये ७ लक्षाची आर्थिक तरतूद करण्यांत आली होती.

मुळ अंदाज पत्रकात तरतूद केली होती. दि.२३.१०.२००७ च्या स्थायी समितीमध्ये ४ लक्ष वाढीव अनुदान मंजूर करण्यांत आले. डिसेबंर २००७ पर्यंत एकूण ४,५३८ लसी प्राप्त झालेल्या आहेत. ३१ मार्च २००८ पर्यंत अजून इंजेक्शन ए.आर.व्ही. २००० लस लागण्याची शक्यता आहे. ह्यासाठी वाढीव अनुदान १० लक्ष रूपयाची आवश्यकता आहे.

करिता सौरऊर्जा उपकरणे-सांकेतांक क्र.सी.इ.-६९२ या लेखाशिर्षामधील उपलब्ध तरतूद रू.२४ लक्ष मधील रू.१० लक्ष इंजेक्शन ए.आर.व्ही. व इंजेक्शन ए.आर.एस. लस खरेदी करीता वळती करण्याच्या मान्यतेस्तव प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सौरऊर्जा उपकरणे-सांकेतांक क्र.सी.इ.-६९२ या लेखाशिर्षामधील उपलब्ध तरतूद रू.२४ लक्ष मधील रू.१० लक्ष इंजेक्शन ए.आर.व्ही. व इंजेक्शन ए.आर.एस. लस खरेदी करीता वळती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४३ :**

मा.आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, शिक्षण विभागांतर्गत प्राथमिक शाळांना पुरेशी विद्यार्थी संख्या उपलब्ध व्हावी म्हणून महानगरपालिकेने प्रत्येक शाळेला जोडून मराठी/उर्दू माध्यमाचे बालवाडीचे वर्ग सुरू केलेले आहेत. मुलांना शिकविणाऱ्या बालवाडी शिक्षिकेस दरमहा मानधन रू.१२००/- दिले जाते. शासनाच्या एकात्मिक बाल विकास सेवा योजनेतंर्गत (आय.सी.डी.एस.) ज्या बालवाड्या चालविल्या जातात त्यांच्या बालवाडी शिक्षिकांना रू.१८००/- व सेविकांना ९००/- रू. मानधन स्वरूपात अदा केले जाते. त्याच अनुषंगाने प्रस्तावित करण्यांत येते की, मनपाच्या बालवाडीमध्ये विद्यार्थ्यांची सरासरी उपस्थिती ४० असेल तर अशा बालवाडी शिक्षिकांना १२००/- रू. ऐवजी रू.१८००/- मानधन प्रतिमाह व ज्या बालवाडीमध्ये विद्यार्थ्यांची सरासरी उपस्थिती ४० पेक्षा कमी असेल अशा बालवाडी शिक्षिकांना १२००/- रू. मानधन प्रतिमहा तसेच सेविकेला ८००/- रू. ऐवजी ९००/- रू. मानधन प्रतिमाह देणे बाबत प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शिक्षण विभागांतर्गत प्राथमिक शाळांना पुरेशी विद्यार्थी संख्या उपलब्ध व्हावी म्हणून महानगरपालिकेने प्रत्येक शाळेला जोडून मराठी/उर्दू माध्यमाचे बालवाडीचे वर्ग सुरू केलेले आहेत. मुलांना शिकविणाऱ्या बालवाडी शिक्षिकेस दरमहा मानधन रू.१२००/- दिले जाते. शासनाच्या एकात्मिक बाल विकास सेवा योजनेतंर्गत (आय.सी.डी.एस.) ज्या बालवाड्या चालविल्या जातात त्यांच्या बालवाडी शिक्षिकांना रू.१८००/- व सेविकांना ९००/- रू. मानधन स्वरूपात अदा केले जाते. त्याच अनुषंगाने मनपाच्या बालवाडीमध्ये विद्यार्थ्यांची सरासरी उपस्थिती ४० असेल तर अशा बालवाडी शिक्षिकांना १२००/- रू. ऐवजी रू.१८००/- मानधन प्रतिमाह व ज्या बालवाडीमध्ये विद्यार्थ्यांची सरासरी उपस्थिती ४० पेक्षा कमी असेल अशा बालवाडी शिक्षिकांना १२००/- रू. मानधन प्रतिमहा तसेच सेविकेला ८००/- रू. ऐवजी ९००/- रू. मानधन प्रतिमाह देणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४४ :**

मा.आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिकेच्या विद्यमाने बी.ओ.टी.तत्वावर स.नं.१२ शहानुरवाडी येथील आठवडी बाजार संकुल विकसित करण्याचे काम हाती घेतले आहे. सदरहू आठवडी बाजार संकुल विकसित करण्याचे प्रकल्पातील मनपा हिश्यातील आठवडी बाजार पेवमेंट बांधणीचे काम प्रगतीपथावर आहे. सदरहू आठवडी बाजार पेवमेंट बांधणीचे कामास दर आठवड्याला भरणाऱ्या आठवडी बाजारचे स्टॉल (दुकानदार) धारक यांचेमूळे अडसर येत असल्याने माहे डिसेबंर २००७ पावेतो उपरोक्त आठवडी बाजार बंध ठेवणेकरीता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम-३२९ अन्वये दिनांक ०२.०८.०७ रोजीच्या मा.सर्वसाधारण सभेने मंजूरी दिलेली आहे.

तथापी सदरहू आठवडी बाजार पेवमेंट बांधणीचे काम पूर्ण करण्यास आणि आठवडी बाजार वापरासाठीच्या पूढील निविदा कार्यवाहीस लागणारा कालावधी पाहता स.नं.१२ शहानुरवाडी येथील आठवडी बाजार माहे फेब्रुवारी २००८ पावेतो बंद ठेवणेकरीता मुदतवाढ मिळणेसाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या विद्यमाने बी.ओ.टी.तत्वावर स.नं.१२ शहानुरवाडी येथील आठवडी बाजार संकुल विकसित करण्याचे काम हाती घेतले असल्यामूळे,

सदरहू आठवडी बाजार संकुल विकसित करण्याचे प्रकल्पातील मनपा हिश्यातील आठवडी बाजार पेवमेंट बांधणीचे काम प्रगतीपथावर आहे. सदरहू आठवडी बाजार पेवमेंट बांधणीचे कामास दर आठवड्याला भरणाऱ्या आठवडी बाजारचे स्टॉल (दुकानदार) धारक यांचेमूळे अडसर येत असल्याने माहे डिसेंबर २००७ पावेतो उपरोक्त आठवडी बाजार बंध ठेवणेकरीता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम-३२९ अन्वये दिनांक ०२.०८.०७ रोजीच्या मा.सर्वसाधारण सभेने मंजूरी दिलेली आहे. तथापी सदरहू आठवडी बाजार पेवमेंट बांधणीचे काम पूर्ण करण्यास आणि आठवडी बाजार वापरासाठीच्या पूढील निविदा कार्यवाहीस लागणारा कालावधी पाहता स.नं.१२ शहानुरवाडी येथील आठवडी बाजार माहे फेब्रुवारी २००८ पावेतो बंद ठेवणेकरीता मुदतवाढ देणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ४५ :</u>**

मा.आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, शासनाचे दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत महानगरपालिका कार्यक्षेत्रातील वसाहतीमध्ये कामे हाती घेण्यासाठी वर्ष २००७-२००८ साठी रूपये ८३.८० लक्ष इतके अनुदान शासनाकडून उपलब्ध होत आहे. सदर अनुदानातून हाती घ्यावयाच्या प्रस्तावित सुविधा कामाची ढोबळ अंदाजपत्रक रकमेसह मंजूरीसाठी खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करण्यांत येत आहे.

**(आकडे लाखात)**

| अ.क्र. | कामाचे नांव | ढोबळ अ.प.रक्कम |
|---|---|---|
| ०१ | प्र.क्र.७ भावसिंगपुरा अंतर्गत साठेनगर, नवयुग कॉलनी, प्रभात नगर (गीतानगर,पंडीतनगर) येथील अरूंद गल्ल्यात पेव्हर ब्लॉक बसविणे. | १५.०० |
| ०२ | प्र.क्र.१२,घाटी अरूंद गल्ल्यात पेव्हर ब्लॉक बसविणे बाबत. | ७.०० |
| ०३ | प्र.क्र.२१, मिसारवाडी-नारेगांव अंतर्गत खडी रस्ता बांधणे | १२.०० |
| ०४ | प्र.क्र.३८,गांधीनगर व लगतच्या परिसरातील अरूंद गल्ल्यात पेव्हर ब्लॉक बसविणे | ५.०० |
| ०५ | प्र.क्र.५७ भवानीनगर अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणे | ५.०० |
| ०६ | प्र.क्र.६७ बौध्दनगर,उत्तमनगर अंतर्गत अरूंद गल्ल्यात डांबरीकरण करणे | ६.०० |
| ०७ | प्र.क्र.७१ न्यायनगर अंतर्गत खडी रस्ता बांधणी व जलनिस:रण वाहीनी टाकणे | ११.०० |
| ०८ | प्र.क्र.७४प्रकाशनगर,मुकूंदवाडीअंतर्गत अरूंदगल्ल्यात पेव्हर ब्लॉक बसविणे | ६.०० |
| ०९ | प्र.क्र.७५ संजयनगर,मुकूंदवाडी अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणे. | ६.०० |
| १० | प्र.क्र.८६ बजरंगनगर येथे खडीरस्ते तयार करणे व जलनिस:रण वाहीनी टाकणे बाबत | ५.०० |
| ११ | प्र.क्र.९३ कबीरनगर अंतर्गत अरूंद गल्ल्यात पेव्हर ब्लॉक बसविणे | ५.०० |
| | **एकूण -** | **८३.००** |

तरी वर प्रस्तावित नुसार शासनाचे दलित वस्ती सुधार योजनांचे अनुदानातून हाती घ्यावयाचे अकरा कामासाठीचे एकत्रित रक्कम रूपये ८३.०० लक्ष खर्चाचे ढोबळ अंदाजपत्रक रकमेचे कामे हाती घेण्यासाठीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभागृहाचे विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शासनाचे दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत शासनाकडून उपलब्ध होणाऱ्या र.रू.८३.८० लक्ष मधून प्रस्तुत प्रस्तावातील अ.क्र.०१ ते ११ च्या महानगरपालिका कार्यक्षेत्रातील वसाहतीमध्ये हाती घ्यावयाच्या कामाचे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.८७ उल्कानगरी येथील मनपाच्या मोकळया जागा विकसित करणे या कामाकरीता सा.बां. विभागाचे जिल्हा दरसुची सन २००६-०७ नुसार रक्कम रूपये २०,९७,४५४/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.

सदरील कामाचा खर्च सन २००७-०८ या आर्थिक वर्षाअंतर्गत विकास योजनेअंतर्गत भुखंडाचे संरक्षण या लेखा शिर्षकाअंतर्गत करण्यात येणार आहे.

करीता उपरोक्त कामाचे रक्कम रूपये २०,९७,४५४/- चे अंदाजपत्रक मा.सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव तथापी विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.८७ उल्कानगरी येथील मनपाच्या मोकळया जागा विकसित करणे या कामाकरीता तयार करण्यांत आलेले रक्कम रूपये २०,९७,४५४/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीअंतर्गत असलेल्या मोकाट कुत्र्यांच्या चावण्याने शहरातील नागरीकांना तसेच लहान मुलांना गंभीर इजा होत आहे. त्यामुळे मोकाट कुत्र्यांना पकडून त्यांचे निर्बीजीकरण करून मा.न्यायालयाच्या आदेशानुसार तसेच Animal birth control (dogs) rule २००१ अन्वये कुत्र्यांना ठार मारण्यास मनाई असल्याने कुत्रा जिवंत असेपर्यंत त्यास डॉग शेल्डर होम मध्ये ठेवणे क्रमप्राप्त आहे.

त्यास्तव झाल्टा येथील मलनि:सारण प्रक्रिया जवळील नदीच्या बाजुची जागा पुराच्या पाण्याखाली जाण्याची शक्यता असल्याने सदरील प्रकल्पा अंतर्गत असलेल्या ४ पॉण्डस पैकी एका पॉण्डमध्ये पिंजरे उभे करून डॉग शेल्डर होम स्थापित करण्याबाबतचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन २००६-०७ चे जिल्हादरसुचीनुसार रक्कम रूपये ४७.०० लक्षचे तयार करण्यात आलेले आहे सदरील अंदाजपत्रकात कुत्र्यांसाठी लोखंडी जाळीचे पिंजरे,शेड,फुडप्लॅटफार्म, गटारीची व्यवस्था,पिण्याचे पाणी व विद्युत व्यवस्था करणे या बाबींचा समावेश आहे. सदरील कामासाठीचा खर्च सन २००७-०८ मध्ये महानगरपालिकेस प्राप्त होणाऱ्या शासकीय अनुदान रक्कम रूपये १७५.०० लक्षच्या तरतुदीमधुन करण्यात येणार आहे.

करीता झाल्टा येथील मलनिस:रण प्रक्रिया प्रकल्पा अंतर्गत असलेल्या ४ पॉण्डस पैकी एक पॉण्डमध्ये पिंजरे उभे करून डॉग शेल्डर होम स्थापित करण्याबाबतचे रक्कम रूपये ४७.०० लक्षचे अंदाजपत्रक मा.सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ तथापि मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीअंतर्गत असलेल्या मोकाट कुत्र्यांच्या चावण्याने शहरातील नागरीकांना तसेच लहान मुलांना गंभीर इजा होत आहे. त्यामुळे मोकाट कुत्र्यांना पकडून त्यांचे निर्बीजीकरण करून मा.न्यायालयाच्या आदेशानुसार तसेच Animal birth control (dogs) rule २००१ अन्वये कुत्र्यांना ठार मारण्यास मनाई असल्याने कुत्रा जिवंत असेपर्यंत त्यास डॉग शेल्डर होम मध्ये ठेवणे क्रमप्राप्त असल्यामूळे, झाल्टा येथील मलनिस:रण प्रक्रिया प्रकल्पा अंतर्गत असलेल्या ४ पॉण्डस पैकी एक पॉण्डमध्ये पिंजरे उभे करून डॉग शेल्डर होम स्थापित करण्याबाबतचे रक्कम रूपये ४७.०० लक्षचे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या २५ व्या वर्धापन दिनानिमित्त महानगरपालिकेच्या वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले होते. त्यात जाणता राजा,झाशीची राणी,एहसान भारती या सारख्या प्रयोगाचे आयोजन केलेले होते, तथापी औरंगाबाद शहरातील दलीत जनतेची संख्या विचारात घेता त्यांच्या जिव्हाळयाच्या विषयास

अनुसरून कोणत्याही कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले नाही. करीता शहरात जाणता राजा या महानाटयासारखेच तथागत या महानाटयाचे तीन दिवस आयोजन तसेच या करीता येणारा खर्चास तरतुद उपलब्ध करून देण्याकरीता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री.मिलींद दाभाडे,श्री.सलीम खान यासीन खान,श्री.वसंत नरवडे पाटील,
श्री.काशिनाथ कोकाटे,श्रीमती खान मेहरून्नीसा,श्री.रशिद खान,श्री.कैलास गायकवाड,
डॉ.भागवत कराड,श्री.किशोर तुलसीबागवाले,श्रीमती मंगला गायकवाड,श्री.संजय जोशी

अनुमोदक : श्री.अ.साजेद अ.सत्तार,श्रीमती लक्ष्मी शंकर आशन्ना,श्री.दिलीप गायकवाड
श्री.हिम्मतराव दाभाडे,श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर,श्री.के.व्ही.मोरे,श्री.मधुकर सावंत
श्री.कचरू सोनवणे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेच्या २५ व्या वर्धापन दिनानिमित्त महानगरपालिकेच्या वतीने तथागत या महानाटयाचे तीन दिवस आयोजन करणेस तसेच या करीता येणारा खर्चास तरतुद उपलब्ध करून देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद जिल्हयातील उंडणगाव येथे मराठवाडा साहित्य परिषदतर्फे मराठी साहित्य संम्मेलन संपन्न होत आहे. सदील साहित्य संम्मेलनासाठी मराठवाडा साहित्य परिषदेस औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे रू.दोन लक्ष आर्थिक मदत देण्यात यावी करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.नारायण कुचे, डॉ.भागवत कराड

अनुमोदक : श्री.संतोष जेजुरकर,श्री.प्रशांत देसरडा,श्री.भगवान घडमोडे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद जिल्हयातील उंडणगाव येथे मराठवाडा साहित्य परिषद यांचे वतीने मराठी साहित्य संम्मेलन संपन्न होत असल्यामूळे,मराठवाडा साहित्य परिषदेस या सम्मेलनासाठी औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे रू.दोन लक्ष मदत देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.११ मधील कामासाठी अर्थसंकल्पातील तरतुदीत खालील दर्शविल्याप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यात यावे करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

| अर्थसंकल्प पान | कामाचे नांव | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|
| W ६०/३ | वार्ड क्र.११ व्हीआयपी रोडवरील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा वाहतुक बेटाची देखभाल व फुटपाथ दुरूस्ती करणे- २.२५ लक्ष. | महापौर परिषदेनिमित्त प्रशासकीय इमारत येथे रंगरंगोटी करणे, विद्युतीकरण करणे, ॲल्युमिनीयम डोअर बसविणे व देखभाल दुरूस्तीची कामे करणे. - २.०० लक्ष. |

सुचक : सौ.लक्ष्मी शंकर आशन्ना अनुमोदक : श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, वार्ड क्र.११ मधील कामासाठी अर्थसंकल्पातील तरतुदीत खालील दर्शविल्याप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| अर्थसंकल्प पान | कामाचे नांव | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|
| W ६०/३ | वार्ड क्र.११ व्हीआयपी रोडवरील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा वाहतुक बेटाची देखभाल व फुटपाथ दुरूस्ती करणे- २.२५ लक्ष. | महापौर परिषदेनिमित्त प्रशासकीय इमारत येथे रंगरंगोटी करणे, विद्युतीकरण करणे, ॲल्युमिनीयम डोअर बसविणे व देखभाल दुरूस्तीची कामे करणे. - २.०० लक्ष. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ५१ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, सन २००७-०८ च्या अर्थसंकल्प पुस्तिका नमूद (०१) प्रभाग क्र.३१ लोटाकारंजा हर्षनगर स्लम भागात अर्धगोलाकार गटार बांधणे एकूण र.४ लाख पान क्र. डब्ल्यु -६४ वर (०२) लोटाकारंजा मुलमची बाजार येथे १०० मी.मी. व्यासाची डी.आय.के.-९ जलवाहीनी टाकणे रक्कम २.२० पान क्र.डब्ल्यु-५१ वर

उपरोक्त दोन्ही कामाऐवजी

प्रभाग क्र.३१ अंतर्गत ड्रेनेज लाईन दुरूस्ती करणे, गटार दुरूस्ती पेव्हर ब्लॉक बसविणे/दुरूस्ती करणे, फर्शी बसविणे दुरूस्ती करणे, कॉक्रेटींग करणे, खडी रस्ते, माती उचलणे, खडी/मुरूम टाकणे इत्यादी आवश्यकतानुसार फुटकळ कामे एकूण रक्कम ६.२० लाख वार्ड कार्यालय अ कडे वळती करण्यात यावे.

सदर काम वार्ड अ अंतर्गत असून (पान क्र.६३ व अ.क्र.६ रू.१००) उपरोक्त काम रद्द करून लोटाकारंजा भागात पाणीपुरवठा जलवाहिनीची लांबी वाढवून घेण्यासाठी सदर बजेट वळती करण्यात यावे. तसेच सदर काम हे वॉर्ड अ मधून असून ती रक्कम पाणीपुरवठा विभागाकडे वळती करण्यात यावे, म्हणजे काम पाणी पुरवठा विभाग लवकर करील.

सुचक : श्रीमती यास्मीन बेगम अ.कदीर अनुमोदक : श्री.सुरेंद्रसिंग सबरवाल

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २००७-०८ च्या अर्थसंकल्प पुस्तिका नमूद (०१) प्रभाग क्र.३१ लोटाकारंजा हर्षनगर स्लम भागात अर्धगोलाकार गटार बांधणे एकूण र.४ लाख, पान क्र. डब्ल्यु -६४ वर (०२) लोटाकारंजा मुलमची बाजार येथे १०० मी.मी. व्यासाची डी.आय.के.-९ जलवाहीनी टाकणे रक्कम २.२० पान क्र.डब्ल्यु-५१ वरील तरतूद खालील कामासाठी वळती करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

उपरोक्त दोन्ही कामाऐवजी

प्रभाग क्र.३१ अंतर्गत ड्रेनेज लाईन दुरूस्ती करणे, गटार दुरूस्ती पेव्हर ब्लॉक बसविणे/दुरूस्ती करणे, फर्शी बसविणे दुरूस्ती करणे, कॉक्रेटींग करणे, खडी रस्ते, माती उचलणे, खडी/मुरूम टाकणे इत्यादी आवश्यकतानुसार फुटकळ कामे एकूण रक्कम ६.२० लाख वार्ड कार्यालय अ कडे वळती करणे. तसेच सदर काम वार्ड अ अंतर्गत असून (पान क्र.६३ व अ.क्र.६ रू.१००) उपरोक्त काम रद्द करून लोटाकारंजा भागात पाणीपुरवठा जलवाहिनीची लांबी वाढवून घेण्यासाठी सदर बजेट वळती करणे. तसेच सदर काम हे वॉर्ड अ मधून असून ती रक्कम पाणीपुरवठा विभागाकडे वळती करणे. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ५२ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वॉर्ड क्र.२६ गणेशनगर मधील कामासाठी अर्थसंकल्पातील तरतूदीत खालील दर्शविल्याप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यात यावे करीता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

| पान नं. | कामाचे नांव | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|
| W १८४/१२ | गणेशनगर वॉर्डातील विविध रस्त्यांचे खडीकरण करणे-५.०० लक्ष | गणेशनगर वॉर्डातील एन-८ भागात श्रीकृष्ण सो.,श्रीदत्त सोसा.,सौभाग्य सोसा.त कॉंक्रीट रस्ते तयार करणे-५.०० लक्ष |
| W१७४/१२ | वॉर्ड क्र.२६ मधील विविध उद्यान विकसीत करणे व संरक्षित भिंत बांधणे-१५.०० लक्ष | या कामासाठी ठेवण्यांत आलेल्या १५ लाखापैकी ५.०० लाख रूपयांचा निधी पान क्र.W २१२ अ.क्र.१० च्या कामाकडे वळविण्यात यावा.-५.०० लक्ष |
| W१५/२९ | वॉर्ड क्र.२६ येथील विविध सोसायट्यांच्या अंतर्गत रस्त्याचे खडीकरण करणे-८.०० लक्ष | एन-८ भागात श्रीकृष्ण सोसायटी मधील रस्त्यांचे पुनर्डाबरीकरण करणे-८.०० लक्ष |

सुचक : श्री.काशिनाथ कोकाटे अनुमोदक : श्री.विजय खुडे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.२६ गणेशनगर मधील कामासाठी अर्थसंकल्पातील तरतूदीत खालील दर्शविल्याप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

| पान नं. | कामाचे नांव | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|
| W १८४/१२ | गणेशनगर वॉर्डातील विविध रस्त्यांचे खडीकरण करणे-५.०० लक्ष | गणेशनगर वॉर्डातील एन-८ भागात श्रीकृष्ण सो.,श्रीदत्त सोसा.,सौभाग्य सोसा.त कॉंक्रीट रस्ते तयार करणे-५.०० लक्ष |
| W१७४/१२ | वॉर्ड क्र.२६ मधील विविध उद्यान विकसीत करणे व संरक्षित भिंत बांधणे-१५.०० लक्ष | या कामासाठी ठेवण्यांत आलेल्या १५ लाखापैकी ५.०० लाख रूपयांचा निधी पान क्र.W २१२ अ.क्र.१० च्या कामाकडे वळविण्यात यावा.-५.०० लक्ष |
| W१५/२९ | वॉर्ड क्र.२६ येथील विविध सोसायट्यांच्या अंतर्गत रस्त्याचे खडीकरण करणे-८.०० लक्ष | एन-८ भागात श्रीकृष्ण सोसायटी मधील रस्त्यांचे पुनर्डांबरीकरण करणे-८.०० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५३ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.९२, कबीर नगर या वार्डातील मिलिंद नगर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर उद्यान विकसित कामासाठी अर्थसंकल्पातील तरतुद खालील दर्शविल्याप्रमाणे लेखाशिर्षक बदलण्यात यावे. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर

| अ.क्र. | जुना लेखाशिर्षक | नविन लेखाशिर्षक |
|---|---|---|
| ०१ | प्र.क्र.९२, कबीरनगर अंतर्गत गल्यात पिण्याची पाईपलाईन टाकणे पा.क्र. डब्ल्यू २३५ रक्कम रू.५.०० लक्ष. | ०१. **नविन उद्याने** - वार्ड ९२, मिलिंदनगर येथील खुल्या जागेत उद्यान विकसीत करण्याकरीता रक्कम रू.१४.०० लक्ष वळती करणे.<br>०२. **वृक्ष संवर्धन -** वार्ड क्र.९२ मिलिंदनगर उद्यानात वृक्ष संवर्धन करण्याकरीता रक्कम रूपये १.०० लक्ष वळती करणे. |
| ०२ | वार्ड क्र.९२ मधील मिलिंदनगर,छोटा मुरलीधनगर येथे महिलांसाठी सुलभ शौच्छालय बांधणे,पा.क्र.डब्ल्यू-२०५ रक्कम रूपये ५.०० लक्ष. | |
| ०३ | वार्ड क्र.९२ मधील मिलिंदनगर पूर्व व पश्चिमेकडील शौच्छालयाची दुरूस्ती करणे बांधणे, पा.क्र.डब्ल्यू-२०५ रक्कम रूपये ५.०० लक्ष. | |

सुचक : श्री.के.व्ही.मोरे अनुमोदक : श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.९२, कबीर नगर या वार्डातील मिलिंद नगर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर उद्यान विकसित कामासाठी अर्थसंकल्पातील तरतुद खालील दर्शविल्याप्रमाणे लेखाशिर्षक बदलण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

| अ.क्र. | जुना लेखाशिर्षक | नविन लेखाशिर्षक |
|---|---|---|
| ०१ | प्र.क्र.९२, कबीरनगर अंतर्गत गल्यात पिण्याची पाईप लाईन टाकणे पा.क्र.डब्ल्यू २३५ रक्कम रू.५.०० लक्ष. | ०१. **नविन उद्याने** - वार्ड ९२, मिलिंदनगर येथील खुल्या जागेत उद्यान विकसीत करण्याकरीता रक्कम रू.१४.०० लक्ष वळती करणे.<br>०२. **वृक्ष संवर्धन -** वार्ड क्र.९२ मिलिंदनगर उद्यानात वृक्ष संवर्धन करण्याकरीता रक्कम रूपये १.०० लक्ष वळती करणे. |
| ०२ | वार्ड क्र.९२ मधील मिलिंदनगर,छोटा मुरलीधनगर येथे महिलांसाठी सुलभ शौच्छालय बांधणे,पा.क्र.डब्ल्यू-२०५ रक्कम रूपये ५.०० लक्ष. | |
| ०३ | वार्ड क्र.९२ मधील मिलिंदनगर पूर्व व पश्चिमेकडील शौच्छालयाची दुरूस्ती करणे बांधणे, पा.क्र.डब्ल्यू-२०५ रक्कम रूपये ५.०० लक्ष. | |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५४ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, प्रभाग क्र.८४ मधील कल्पतरू हौ.सो.मधील महानगरपालिकेच्या मोकळयाजागेस संत गाडगेबाबा उद्यान असे नाव देण्याचा ठराव करण्यात यावा.

सुचक:श्री.शशांक दामोधर विसपुते

अनुमोदक:श्री.विजय किसनराव खुडे,श्री.कैलास लक्ष्मण गायकवाड

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.८४ मधील कल्पतरू हौ.सो.मधील महानगरपालिकेच्या मोकळ्या जागेस संत गाडगेबाबा उद्यान असे नांव देणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५५ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगपुरा या भागातील पोलीस चौकी समोर असलेल्या चौकास भगवान परशुरामाचे नाव असावे अशी या परिसरातील नागरीकांची फार वर्षापासून मागणी आहे. नागरीकांच्या मागणीचा विचार करता औरंगपुरा पोलीस चौकी समोरील चौकास भगवान परशुराम चौक असे नाव देण्यात यावे करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.संजय जोशी

अनुमोदक : श्री.रविंद्र गांगे, श्री.प्रशांत देसरडा, श्री.सतिष कटकटे, श्री.संतोष खेंडके

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगपुरा पोलीस चौकी समोरील चौकास भगवान परशुराम चौक असे नाव देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५६ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, प्रभाग क्र.-८९ येथील अर्थसंकल्पातील कामाचे लेखाशिर्षात खालीलप्रमाणे बदल करण्यांत यावा.

| अ.क | अर्थसंकल्पातील प्रस्ताव | रक्कम | फेरबदल करावयाचा प्रस्ताव | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | पृष्ठ क्रमांक W-३४, नवीन पथदिवे व्यवस्था (फक्त नव्याने मंजूर रेखाकंनात) | रू.२० लाख | वॉर्ड क्रमांक -८९ ज्योतीनगर अंतर्गत म्हाडा कॉलनी येथे पथदिवे व्यवस्था करणे. | ०५.६०लाख |
| ०२ | पृष्ठ क्रमांक W-३४, नवीन पथदिवे व्यवस्था (फक्त नव्याने मंजूर रेखाकंनात) | | वॉर्ड क्रमांक -८९ ज्योतीनगर येथे विविध ठिकाणी उर्जा बचत दिवे लावणे | ३.३० लाख |
| ०३ | पृष्ठ क्रमांक W-३४, नवीन पथदिवे व्यवस्था (फक्त नव्याने मंजूर रेखाकंनात) | | वॉर्ड क्रमांक -८९ ज्योतीनगर येथे विविध ठिकाणातील पथदिव्यांची व्यवस्था करणे | ०३ लाख |

सुचक : श्री.महेश माळवतकर     अनुमोदक : सौ.अंजली कोंडेकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.-८९ येथील अर्थसंकल्पातील कामाचे लेखाशिर्षात खालीलप्रमाणे बदल करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

| अ.क | अर्थसंकल्पातील प्रस्ताव | रक्कम | फेरबदल करावयाचा प्रस्ताव | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | पृष्ठ क्रमांक W-३४, नवीन पथदिवे व्यवस्था (फक्त नव्याने मंजूर रेखाकंनात) | रू.२० लाख | वॉर्ड क्रमांक -८९ ज्योतीनगर अंतर्गत म्हाडा कॉलनी येथे पथदिवे व्यवस्था करणे. | ०५.६०लाख |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०२ | पृष्ठ क्रमांक W-३४, नवीन पथदिवे व्यवस्था (फक्त नव्याने मंजूर रेखाकंनात) | | वॉर्ड क्रमांक -८९ ज्योतीनगर येथे विविध ठिकाणी उर्जा बचत दिवे लावणे | ३.३० लाख |
| ०३ | पृष्ठ क्रमांक W-३४, नवीन पथदिवे व्यवस्था (फक्त नव्याने मंजूर रेखाकंनात) | | वॉर्ड क्रमांक -८९ ज्योतीनगर येथे विविध ठिकाणातील पथदिव्यांची व्यवस्था करणे | ०३ लाख |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५७ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, अर्थसंकल्प सन ०७-०८ मधील पृष्ठ क्रमांक W-२२७ अ.क्र.२० वर प्रभाग क्र.६१ समर्थनगर अंतर्गत सन्मित्र कॉलनी ते मनपाच्या खूल्या जागेत ज्येष्ठ नागरीकांसाठी पार्क विकसित करून विद्युत कारंजे बसविणे करीता र.रू.०५.०० लक्ष तरतूद करण्यांत आलेली आहे. सदरील रक्कम समर्थनगर बजरंग व्यायामशाळेस संरक्षित भिंत बांधण्याच्या कामासाठी वापरण्यात यावी. करीता उपरोक्त प्रमाणे लेखाशिर्ष बदलाचा प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

सुचक : सौ.कला सुरेश बोरामणीकर अनुमोदक : श्री.भाऊसाहेब वाघ

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अर्थसंकल्प सन ०७-०८ मधील पृष्ठ क्रमांक W-२२७ अ.क्र.२० वर प्रभाग क्र.६१ समर्थनगर अंतर्गत सन्मित्र कॉलनी ते मनपाच्या खूल्या जागेत ज्येष्ठ नागरीकांसाठी पार्क विकसित करून विद्युत कारंजे बसविणे करीता असलेली र.रू.०५.०० लक्ष तरतूद समर्थनगर बजरंग व्यायामशाळेस संरक्षित भिंत बांधण्याच्या कामासाठी लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५८ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, सन २००७-०८ च्या अर्थसंकल्पातील पान क्र.डब्ल्यु-१२५ वरील अ.क्र.५३ वर औरंगपुरा येथील तुलशी झेरॉक्स समोर फुटपाथ बांधणेकरीता र.रू.०३.०० लक्ष तरतूद करण्यांत आलेली आहे. सदरील रक्कम दलालवाडी येथील नाला साफसफाई व गटार दुरूस्तीचे काम करण्याकरीता वापरण्यात यावी करीता लेखाशिर्ष बदलण्यासाठी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.वसंत नरवडे पाटील अनुमोदक : श्री.सतिष विश्वनाथ कटकटे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २००७-०८ च्या अर्थसंकल्पातील पान क्र.डब्ल्यु-१२५ वरील अ.क्र.५३ वर औरंगपुरा येथील तुलशी झेरॉक्स समोर फुटपाथ बांधणेकरीता असलेली र.रू.३.०० लक्ष तरतूद दलालवाडी येथील नाला साफसफाई व गटार दुरूस्तीचे काम करण्याकरीता लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५९ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.७८ चिकलठाणा मध्ये ड्रेनेज लाईन टाकणे तरतूद रू.८.०० लक्ष पैकी रू.४.०० लक्ष पेव्हर ब्लॉक साठी वळती करणे अ.क्र.३२ पान क्र.डब्ल्यु-२०९

| **जुन्या कामाचे शिर्षक** | **नविन कामाचे शिर्षक** |
|---|---|
| वार्ड क्र.७८ चिकलठाण येथे ड्रेनेज लाईन टाकणे तरतूद ८.०० लक्ष पैकी ४ लाख रू. वार्ड क्र.७८ चिकलठाणा पेव्हर ब्लॉक बसविणेकरीता वापरणे. | वार्ड क्र.७८ चिकलठाणा येथे पेव्हर ब्लॉक बसविणे रू.४.०० लक्ष. |

वरीलप्रमाणे मंजूरी देण्यांत यावी, ही विनंती.

सुचक : श्री.रवि साहेबराव कावडे अनुमोदक : श्री.भाऊसाहेब वाघ

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.७८ चिकलठाणा मध्ये ड्रेनेज लाईन टाकणे करीता अ.क्र.३२ पान क्र.डब्ल्यु-२०९ वर असलेली तरतूद रू.८.०० लक्ष पैकी रू.४.०० लक्ष पेव्हर ब्लॉक साठी वळती करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

| जुन्या कामाचे शिर्षक | नविन कामाचे शिर्षक |
|---|---|
| वार्ड क्र.७८ चिकलठाण येथे ड्रेनेज लाईन टाकणे तरतूद ८.०० लक्ष पैकी ४ लाख रू. वार्ड क्र.७८ चिकलठाणा पेव्हर ब्लॉक बसविणेकरीता वापरणे. | वार्ड क्र.७८ चिकलठाणा येथे पेव्हर ब्लॉक बसविणे रू.४.०० लक्ष. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६० :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, माझ्या प्रभागात अशोक स्तंभ चौकात व चौधरी कॉलनी शिवाजी पुतळ्याजवळ मिनी हायमास्ट लाईट बसविण्याचे काम करावयाचे आहे. करीता W-१४५ वर नविन पोल लावणे या अर्थसंकल्पीय बजट मधून करण्यात यावे. करीता सर्वसाधारण सभेत ठेवण्यास मंजूरी द्यावी ही विनंती.

सुचक : श्रीमती मिराताई रामराव शिंदे अनुमोदक :श्री.भगवान घडमोडे, सौ.सरला पोळ

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.२३ मध्ये अशोक स्तंभ चौकात व चौधरी कॉलनी शिवाजी पुतळ्याजवळ मिनी हायमास्ट लाईट बसविण्याचे काम करणे करीता पान क्र. W-१४५ वर नविन पोल लावणे या अर्थसंकल्पीय तरतूदीमधून करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६१ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, प्रभाग क्र.७६ मधील विविध रस्ते,उद्यान,ड्रेनेज,विद्युतची किरकोळ कामे करण्याकरीता वॉर्डात तरतूद उपलब्ध नसल्याने प्रभागातील किरकोळ कामे करण्यास अडचणी निर्माण होत आहे. त्याकरीता अर्थसंकल्प सन २००७-०८ मधील पा.क्र.W १४८ भांडवली कामे जलनि:सारण अ.क्र.२१ च्या रू.२.५० लक्षच्या तरतूदीमधून वरील कामासाठी रू.१.३५ लक्ष तरतूद वळती करण्याचा प्रस्ताव मंजूरीस्तव ठेवण्याकरीता सादर.

सुचक : श्री.भगवान (बापु) घडमोडे अनुमोदक : श्री.महेश माळवतकर, श्री.रवि कावडे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.७६ मधील विविध रस्ते,उद्यान,ड्रेनेज,विद्युतची किरकोळ कामे करण्याकरीता वॉर्डात तरतूद उपलब्ध नसल्याने अर्थसंकल्प सन २००७-०८ मधील पा.क्र.W १४८ भांडवली कामे जलनि:सारण अ.क्र.२१ च्या रू.२.५० लक्षच्या तरतूदीमधून वरील कामासाठी रू.१.३५ लक्ष तरतूद वळती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६२ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, प्रभाग क्र.२७ शताब्दीनगर करीता अर्थसंकल्पातील खालीलप्रमाणे कामाचे लेखाशिर्ष बदलणे.

०१. प्रभाग क्र.२७ शताब्दीनगर येथे पाणी पुरवठा जलवाहीनी टाकणे (५,००,०००) पान क्र.२१८ अ.क्र.२

०२. प्रभाग क्र.२७ के.के.वाटर सप्लाय समोरील गल्ल्यात जलवाहीनी टाकणे (३,००,०००) पान क्र.२१५ अ.क्र.१८

०३. प्रभाग क्र.२७ जिवेश्वर सोसायटी नविन जलवाहीनी टाकणे (३,००,०००) पान क्र.२१५ अ.क्र.१९

**या ऐवजी**

१. प्रभाग क्र.२७ च्या विविध ठिकाणी ड्रेनेजचे,जलवाहीनीचे,खडी मुरूमचे व फुटकळ कामे वार्डात आवश्यकतेनुसार कामे करणे (८,००,०००)

२. प्रभाग क्र.२७ शताब्दीनगर येथे आवश्यकतेनुसार विद्युतचे विविध ठिकाणी फुटकळ कामे करणे (३,००,०००)

सुचक : श्रीमती अजरा जबीन मसुद खान अनुमोदक : श्री.स.खुसरो स.बुऱ्हानोद्दीन

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.२७ शताब्दीनगर करीता अर्थसंकल्पातील खालीलप्रमाणे कामाचे लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

०१. प्रभाग क्र.२७ शताब्दीनगर येथे पाणी पुरवठा जलवाहीनी टाकणे (५,००,०००) पान क्र.२१८ अ.क्र.२

०२. प्रभाग क्र.२७ के.के.वाटर सप्लाय समोरील गल्ल्यात जलवाहीनी टाकणे (३,००,०००) पान क्र.२१५ अ.क्र.१८

०३. प्रभाग क्र.२७ जिवेश्वर सोसायटी नविन जलवाहीनी टाकणे (३,००,०००) पान क्र.२१५ अ.क्र.१९

**या ऐवजी**

१. प्रभाग क्र.२७ च्या विविध ठिकाणी ड्रेनेजचे,जलवाहीनीचे,खडी मुरूमचे व फुटकळ कामे वार्डात आवश्यकतेनुसार कामे करणे (८,००,०००)

२. प्रभाग क्र.२७ शताब्दीनगर येथे आवश्यकतेनुसार विद्युतचे विविध ठिकाणी फुटकळ कामे करणे (३,००,०००)

वैधानिक कार्यवाही व्हावी.

यानंतर राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

निष्काम जन सेवायें समर्पिता

## सर्वसाधारण सभा

## कार्यक्रम पत्रिका क्रमांक - (०३)

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची "ड" चे प्रकरण -२ मधील नियम क्र.१(एच) आणि (आय) अन्वये

**दिनांक :- १२/१२/२००७**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची "ड" चे प्रकरण -२ मधील नियम क्र.१ (क) अन्वये **मा.महापौर सौ.विजया किशोर रहाटकर यांनी गुरूवार दिनांक २०/१२/२००७ रोजी सकाळी ११.३० वाजता** औरंगाबाद महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महापालिका प्रशासकीय इमारतीतील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे आयोजीत केली आहे.

प्रायोजित सभेत निम्ननिर्दीष्ट विषय पत्रिका निर्णयाधिन आहे.

करिता विनंती की, प्रस्तावित सभेस निर्धारित वेळी उपनिर्दीष्ट ठिकाणी उपस्थित राहून सहकार्य करावे.

**नगर सचिव,**
महानगरपालिका औरंगाबाद

**<u>वृत्तांत कायम करणे</u>**

**विषय क्र.१६ :**

दिनांक १०.१०.२००७, ११.१०.२००७ आणि दि.२२.१०.२००७ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**प्रशोत्तरे**

(प्रश्नांची यादी सोबत जोडण्यांत आलेली आहे.)

**प्रशासकीय प्रस्ताव**

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## कार्यक्रम पत्रिका - (०३)

दिनांक २०/१२/२००७ रोजी आयोजीत सर्वसाधारण सभेत विचारण्यासाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४४ व सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र.९६ अन्वये

## प्रश्नांची यादी

**सौ.कला सुरेश बोरामणीकर, स.पालिका सदस्या**

**प्रश्न क्र.५ :**

प्रभाग क्र.६१ गेल्या वर्षातील अर्थसंकल्पातील प्रशासनातर्फे ८० लक्ष रू.चे काम निराला बाजार, सावरकर पुतळा सौंदर्यीकरण हे काम हाती घेण्यात आले होते. परंतु सदरील काम हे तिन महिन्यापासून बंद आहे त्याबाबत खालील माहिती देण्यात यावी.

१. सदरील काम कोणत्या ठेकेदारास देण्यात आले ?
२. अद्याप पर्यंत सदर कामावर किती खर्च झाला आहे ?
३. सदरील काम अत्यंत निकृष्ठ होत असताना प्रशासनाने कुठलीही कार्यवाही का केली नाही
४. सदरील काम तिन महिन्यापासून बंद का आहे ?
५. सदरील कामासाठी जी ८० लक्षची तरतुद ठेवण्यात आली आहे त्यात कोणते कोणते काम हाती घेण्यात येणार आहेत ?

**श्री.प्रशांत देसरडा, स.पालिका सदस्य**

**प्रश्न क्र.६ :**

०१. स्पेक कंपनीचे सर्वेक्षण करावयाचे काम कोणत्या स्वरूपाचे होते? त्याची तपशिलवार माहिती व सदरील काम किती दिवसाच्या आत करायचे होते? तपशिलवार माहिती देतांना कामाची आज रोजी पर्यंतचा कामाचा उल्लेख करावा.
०२. स्पेक कंपनीला वर्क ऑर्डर (करारनामा) कोणत्या तारखेस केला होता?
०३. स्पेक कंपनीस लागणारे मनपाचे रजिष्टर, जागा,कर्मचारी व इतर सामुग्री पूर्ण वेळेवर दिली होती का? दिली नसेल तर कारण काय?
०४. स्पेक कंपनीचे सर्वेक्षण चालू करायच्या अगोदरची मनपाची वॉर्ड वॉईज मालमत्ता किती होती? सर्वेक्षण झाल्यानंतर आजची सर्वेक्षण संख्या किती होती?
०५. सर्वेक्षणामध्ये ज्या मालमत्ता जास्तीच्या मिळाल्या त्या मालमत्तेचे किती पैसे जास्तीचे मिळणार आहेत?
०६. जास्तीचे मालमत्तेची वसूली वर्क ऑर्डर प्रमाणे २००६ व २००७ या वर्षीचे डिमांड वाटप झाली आहे काय? (वॉर्ड वॉईज माहिती) झाली नसल्यास कारण काय?
०७. सर्वेक्षण पूर्ण झाल्यावर बिल छपाई, बिल वाटप,सर्वेक्षणाचे सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट वॉर्ड वॉईज, वॉर्ड वॉईज नकाशे कोणी करायचे होते? ते काम पूर्ण झाले आहे का? झाले नसल्यास कारण काय?घर नंबर असलेली प्लेट्स लावण्याचे काम पूर्ण झाले काय?

०८. स्पेकला सर्वेक्षणाचे काम करतांना मुदतवाढ देण्यात आली होती का? दिली असता कारण काय? मुदतवाढीस जबाबदार कोण?

०९. आज रोजी पर्यंत स्पेक कंपनीचे बिल अदा करण्यात आले आहे काय? (वॉर्ड वॉईज माहिती) जे बिल बाकी आहेत आज रोजी पर्यंत झोन अधिकाऱ्यांना का प्राप्त झाले नाही?

१०. स्पेक कंपनीस आज रोजी पर्यंत कामाच्या मोबदल्यात मनपातर्फे किती बिल अदा करण्यात आले आहे? जे बिल अदा करण्यात आले आहे किती वेळेस धनादेश देण्यात आले आहे? प्रत्येक धनादेश किंवा बिल अदा करतांना कोणत्या स्वरूपाचे काम पूर्ण झाले आहे? त्या प्रत्येक बिलाचा तपशिल.

११. स्पेक कंपनी सर्वेक्षण करतांना मनपाची मुख्य इमारत, झोन ऑफीसची जागा, फोन,लाईट बिल, स्टेशनरीचे कर्मचारी व अधिकाऱ्यांचे वापर करण्यात आले आहे काय? वापर केल्यास वर्क ऑर्डरमध्ये कोणत्या अटी क्रमांकावर आहे? अटींची सत्यप्रत द्यावी.

१२. २००६-२००७ या वर्षी किती बिल वाटप झाले आहेत? झोन वॉईज तपशिल जे बिल देण्यात आले आहेत त्यात स्पेक कंपनीचे नविन सर्वेक्षण प्रमाणे बिल किती?

१३. खाजगी तत्वावर मालमत्तेचे सर्वेक्षणाची मंजूरी घेतांना सर्वसाधारण सभेसमोर, स्थायी समिती समोर जो विषय प्रशासनाने ठेवला होता व सर्वसाधारण सभेने व स्थायी समितीने चर्चा करून त्या विषयाला ठराव रूपात मंजूरी दिली आहे त्या विषयाची,ठरावाची, चर्चेचे विवरण काय होते?

१४. स्पेक कंपनीचे करारनामा करत असतांना दिलेली बँक गॅरंटी, बँकेत/ मनपात ठेवलेली डिपॉजीट किती होते? आज रोजी पर्यंत डिपॉजीट किंवा बँक गॅरंटीमध्ये परतावा करण्यात आला आहे का? परतावा परत करत असतांना कामाच्या पूर्ततेबाबत विचारणा केली आहे का?

१५. खाजगी तत्वावर सर्वेक्षणाचे काम करण्याची निविदा काढल्यानंतर किती टेंडर प्राप्त झाले होते? स्पेक कंपनीचे त्या वेळेसचे दर काय होते व कामाचे स्वरूप काय होते?

१६. सर्वेक्षणाचे काम करतांना स्पेक कंपनी किती कर्मचारी वर्ग लावणार होते? त्या कर्मचाऱ्यांची शैक्षणिक पात्रता, अनुभवाची अट काय होती? सदरील कर्मचाऱ्यांची नावे आणि पदनाम यांच्यासह शैक्षणिक पात्रतेची यादी त्यांनी नियुक्ती बाबत समक्ष असलेल्या कर्मचाऱ्यांच्या पूराव्यासह दिलेला अहवाल.

**<u>श्री.संजय जोशी, स.पालिका सदस्य</u>**

**<u>प्रश्न क्र.७ :</u>**

**०१** औरंगाबाद मनपामध्ये भरण्यात येणाऱ्या शहर अभियंता पदाबाबत खालीलप्रमाणे माहिती द्यावी.

**अ)** शहर अभियंता हे पद आज स्थितीला कोणत्या संदर्भामध्ये मोडते?

**ब)** शहर अभियंता हे पद एकाकी पद आहे काय?

**क)** शहर अभियंता या पदास आरक्षण लागु आहे काय?

**ड)** या पदाच्या भरतीसाठी सेवा भरती नियमामध्ये काय तरतुदी आहेत, तसेच मेरीट कम सिनियारिटी लागु आहे काय?

**इ)** मा.उच्च न्यायालय औरंगाबाद यांच्या निर्णयानुसार औरंगाबाद मनपामध्ये जेष्ठता सुची तयार करण्यात आली आहे हे खरे आहे काय, व त्यानुसारच कार्यकारी अभियंता संवर्गाची पदे भरण्यात आली असल्यास त्यानुसार तयार केलेली जेष्ठता सुचीची प्रत देण्यात यावी.

**ई)** सन २००२,२००३,२००४,२००५,२००६,२००७ या वर्षाच्या कार्यकारी अभियंता संवर्गाच्या जेष्ठता सुची नियमाप्रमाणे तयार केल्या असतील, त्या सर्वांच्या वर्षनिहाय प्रती देण्यात याव्यात.

**फ)** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ नुसार महानगरपालिकेने पिट पर्सन ने शहर अभियंता हे पद भरावे असे नमुद आहे. येथे पिट पर्सन म्हणजे सिनियारीटी कम मेरीट नुसार पिट पर्सन होतो हे खरे आहे काय?

**<u>श्री.प्रशांत देसरडा, स.पालिका सदस्य</u>**

**<u>प्रश्न क्र.८ :</u>**

**०१** मनपा औरंगाबाद मधील कार्यकारी अभियंता या पदाबद्दल कृपया खालील माहिती देण्यात यावी.

**अ)** मा.उच्च न्यायालय औरंगाबाद यांनी उप अभियंता संवर्गाची जेष्ठता सुची तयार करण्याबाबत आदेश दिले होते त्यानुसार तयार करण्यात आलेल्या जेष्ठता सुची नुसार पदवीधर व पदविका धारक जेष्ठ अभियंता कोण?

**ब)** मनपा मध्ये आज स्थितीला किती कार्यकारी अभियंता कार्यरत आहेत व त्यांच्या पदोन्नतीच्या वेळी त्यांची शैक्षणीक अर्हता काय होती? त्यावेळी दिलेल्या पदोन्नतीनुसार जेष्ठ कार्यकारी अभियंता कोण?

**क)** पदवीधर उप अभियंता संवर्गातुन कार्यकारी अभियंता संवर्गात पदोन्नती झालेल्या कार्यकारी अभियंता यांची जेष्ठतेनुसार नावे द्यावीत.

**ड)** पदविका धारक उप अभियंता संवर्गातून कार्यकारी अभियंता संवर्गात पदोन्नती झालेल्या कार्यकारी अभियंता यांची जेष्ठतेनुसार नावे द्यावीत.

**<u>श्री.सुरजितसिंग सबरवाल, स.पालिका सदस्य</u>**

**<u>प्रश्न क्र.९ :</u>**

**प्र.०१.** औरंगाबाद मनपामध्ये भरण्यात येणाऱ्या शहर अभियंता पदाबाबत कृपया खालील प्रमाणे माहिती द्यावी.

१) दिनांक ०१.०१.२००७ ची कार्यकारी अभियंता संवर्गाची जेष्ठता सुची अंतिम करण्यात आली आहे काय? नसल्यास---

२) दिनांक ०१.०१.२००७ ची कार्यकारी अभियंता संवर्गाची जेष्ठता सुची अंतिम न करता त्या संवर्गातील जेष्ठ कार्यकारी अभियंता कोण आहे, हे कोणत्या नियमानुसार ठरविण्यात येते. त्या नियमासह खुलासा करावा.

३) पदविका धारक उप अभियंता संवर्गातून कार्यकारी अभियंता संवर्गात पदोन्नती झालेल्या कार्यकारी अभियंता यांनी प्राप्त पदविका नंतरची शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्यास ती शैक्षणिक अर्हता पुढील पदोन्नतीसाठी/जेष्ठतेसाठी कोणत्या शासकीय निर्णयानुसार गृहीत धरण्यात येते. याचा खुलासा शासन निर्णयाच्या प्रतीसह देण्यात यावा हि विनंती.

**<u>श्री.रविंद्र गांगे, स.पालिका सदस्य</u>**

**<u>प्रश्न क्र.१० :</u>**

शारदाश्रम जयहिंद कॉलनी येथील रिकाम्या जागेवर रिलायन्सचे टॉवर उभारण्यात येत आहे. सदरील जागा कोणाच्या मालकीची आहे? ज्या बिल्डींगवर टॉवर उभारण्यात येत आहे. त्याची बांधकाम परवानगी किती? लाली टॉवरला बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे काय? लाली टॉवर २०X३० जागा ही कोणाच्या मालकीची आहे?

सदरील जागा मनपाच्या मालकीची असल्यास प्रशासकीय विभागाने पुढील कार्यवाही का केली नाही? लाली टॉवरची बांधकाम परवानगी कोणाच्या नावाने आहे? कंप्लीशन सर्टीफिकेट घेण्यात आले आहे काय? पार्कींगसाठी किती जागा सोडली? ती नियमानुसार आहे काय?

**श्री.सतिष कटकटे, स.पालिका सदस्य**

**प्रश्न क्र.११ :**

०१. प्रभाग क्र.५९ मधील अमरप्रित, गौतमनगर रोडवर दुध डेअरी एमएसईबी च्या बाजुला पेव्हींग ब्लॉक बसविण्याचे काम कोणाच्या आदेशान्वये करण्यात येत आहे? सदरील कामासाठी कोणत्या लेखाशिर्षका अंतर्गत खर्च करण्यात येत आहे? सदरील कामाचा एकुण खर्च किती? व काम कोणत्या विभागामार्फत करण्यात येत आहे?

अमरप्रित ते दिल्लीगेट रस्ता रूंदीकरण आहे काय? या रूंदीकरणात सदरील पेव्हींग ब्लॉक बसविण्यात येत असलेला भाग बाधित होतो काय? असल्यास करण्यात येत असलेल्या खर्चास जबाबदार कोण? कोणाकडून वसूल करणार?

०२. लक्ष्मणचावडी ते सिल्लेखाना रोडचे काम चालु आहे. सदर काम चालू असतांना वॉटर लाईन, ड्रेनेज लाईन रेन वॉटरच्या लाईनखाली दबलेली आहे काय? वॉटर लाईन, ड्रेनेज लाईन करीता अर्थसंकल्पात तरतुद आहे काय? असल्यास किती तरतुद आहे?

वॉटर लाईन व ड्रेनेज लाईनच्या कामाचे टेंडर काढण्यात आले आहे काय? असल्यास काम कोण करणार आहे? रोडचे काम केव्हापासून सुरू झाले? कामाची मुदत कोणत्या तारखेपर्यंत आहे?

**श्री.सतिष कटकटे, स.पालिका सदस्य**

**प्रश्न क्र.१२ :**

०१. महानगरपालिकेच्या अस्थापनेवर एकुण किती मजुर (कायमस्वरूपी) कार्यरत आहेत? दै.वेतनावर किती मजुर कार्यरत आहेत?

०२. मजुर म्हणून नियुक्ती देण्यात आलेल्या पैकी किती मजुर मुख्य कार्यालयातील (प्रशासकीय इमारत टप्पा १ व २) विविध कार्यालयात काम करीत आहेत? केव्हा पासून?

०३. मजुर म्हणून घेण्यात आलेल्या या कर्मचाऱ्याकडून वार्ड कार्यालयात सफाईचे काम का करून घेण्यात येत नाही? वार्डात सफाईचे कामासाठी मजुर कमी असतांना या लोकांना वार्डात सफाईसाठी पाठविण्यास प्रशासनास काय अडचण आहे?

०४. ज्यांची नियुक्ती मजुर म्हणून केली आहे. असे मजूर क्लर्क किंवा शिपाई किंवा इतर कोणत्याही पदावर नियुक्ती किंवा नेमणूक करता येते का? करता येत असेल तर कोणत्या नियमाखाली करता येते?

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**<u>सर्वसाधारण सभा</u>**
**<u>पुरवणी विषय पत्रिका</u>**

**दिनांक :- १६.१२.२००७**

(मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ चे अनुसूचि 'ड' चे प्रकरण -२ आणि नियम -१ (ज) अन्वये)

गुरूवार दिनांक २०.१२.२००७ रोजी आयोजित करण्यात आलेल्या औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेसाठी पुरवणी विषय पत्रिका पाठवित आहोत.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद

**<u>स.सदस्यांचे प्रस्ताव</u>**

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## सर्वसाधारण सभा

## कार्यक्रम पत्रिका क्रमांक - (०३)

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची "ड" चे प्रकरण -२ मधील नियम क्र.१(एच) आणि (आय) अन्वये

**दिनांक :- १८.१२.२००७**

मा.महापौर सौ.विजया किशोर रहाटकर यांनी गुरूवार दिनांक २०.१२.२००७ रोजी सकाळी ११.३० वाजता औरंगाबाद महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिका प्रशासकीय इमारतीतील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे आयोजीत केली आहे.

प्रायोजीत सभेत निम्ननिर्दीष्ट विषय पत्रिका निर्णयाधिन आहे.

**विषय क्र.१६ :**

दिनांक १०.१०.२००७, ११.१०.२००७ आणि दि.२२.१०.२००७ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**विषय क्र.१७ :**

शहरातून विशेष आरोग्य सेवा व वैद्यकीय सेवा देण्यासाठी शहरातील खाजगी वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या तज्ञ डॉक्टरांची पदे मानद विशेष वैद्यकीय तज्ञ (ऑनररी) म्हणून पदनिर्मीती करणे बाबत.

**विषय क्र. १८ :**

सिडकोच्या सर्व्हे नं.२३,२४ मौजे गारखेडा लगत असलेल्या जयभवानीनगर व हनुमाननगर या वसाहतीतील नाल्याचे बांधकामाच्या अंदाजपत्रकास मान्यता देणे.

**विषय क्र. १९ :**

वार्ड क्र.३५ अंतर्गत बारापुल्ला, गरमपाणी व कोहीनुर कॉलनी भागातील रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामाचे अंदाजपत्रकास मान्यता देणे.

**विषय क्र. २० :**

जकात कराचा हिस्सा छावणी परिषदेस देण्यासाठी मुं.प्रां.मनपा अधि. १९४९ चे कलम -३२ (४) मधील तरतूदीप्रमाणे करारनामा करणे संबंधी.

**विषय क्र.२१ :**

वार्ड क्र.४७ मधील एन-६ सेक्टर एफ व ई-१ येथील अंतर्गत रस्त्यावर पेव्हर ब्लॉक बसविण्याच्या कामाचे अंदाजपत्रकास मान्यता देणे.

**विषय क्र.२२ :**

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय/रूग्णालयाच्या परिसरात हायमास्ट उभारणेच्या अंदाजपत्रकास मान्यता देणे.

**विषय क्र. २३ :**

शहराबाहेर भटक्या कुत्र्यांसाठी कोंडवाडा (डॉग शेल्डर हाऊस) बांधणे संबंधी.

**स.सदस्यांचे प्रस्ताव**

**विषय क्र. २४ :**

मनपाचे कर आकारणी विभाग पूर्ववत सुरू करणे बाबत.

सुचक : श्री.संजय जगताप अनुमोदक : श्री.शेख इब्राहीम शेख इमाम

**विषय क्र. २५ :**

प्र.क्र.८४ मधील कल्पतरू हौ.सोसायटी येथील उद्यानास संत गाडगे बाबा नाव देणे संबंधी.

सुचक : श्री.शशांक दामोधर विसपुते अनुमोदक : श्री.सिताराम सुरे, श्री.संजय रिडलॉन

**विषय क्र. २६ :**

वार्ड क्र.९० एकनाथ नगर या वार्डातील चिंतामणी कॉलनी येथील म.न.पा.च्या विहीरीच्या बाजूला असलेल्या समांतर गड्डयामध्ये पडून मयत झालेल्या मुलाच्या पाल्यास आर्थिक मदत देणे संबंधी.

सुचक: श्री.हिम्मतराव साळुबा दाभाडे अनुमोदक:श्री.अ.साजेद अ.सत्तार,श्री.के.व्ही.मोरे,श्री.कैलास गायकवाड

**विषय क्र. २७ :**

मस्जीदीच्या हौदात पडुन मयत झालेल्या मयुर या मुलाच्या पाल्यास मनपाकडून आर्थिक मदत देणे संबंधी.

सुचक : श्री.सलीम खान यासीन खान अनुमोदक : श्री.संजय जगताप, श्री.सतीष कटकटे

**विषय क्र. २८ :**

मौजे हर्सुल येथील सर्व्हे नं.१८, १५४ चा भाग,१५५ चा भाग व १५६ मधील ४ हेक्टर ३० आर जमिनीचे गुंठेवारी अंतर्गत नियमितीकरण करणे संबंधी.

सुचक : श्री.सिताराम इसराम सुरे, श्री.संतोष खेंडके पाटील, श्री.मधुकर सावंत,श्री.पुनमचंद बमणे, श्री.मोहन मेघावाले

अनुमोदक : श्री.भाऊसाहेब ताठे, श्री.महेश माळवतकर, श्री.भागवत कराड, श्री.काशिनाथ कोकाटे सौ.रजनीताई जोशी, सौ.कला बोरामणीकर

**विषय क्र. २९ :**

वार्ड क्र.४२, येथील ०१. पीरगैब साहाब दर्गा ते कटकट गेट पर्यंत रस्त्यास किंवा ०२.कटकट गेट ते रोशन गेट पर्यंत या दोन्ही पैकी एका रस्त्याला स्व.अल्लमा खमर एकबाल यांचे नाव देणे संबंधी.

सुचक : श्री.मुजीब आलम शाह खान

अनुमोदक : श्रीमती नजमा बेगम युनूस कुरैशी, श्री.हाजी शेरखान अ.रहेमान, श्रीमती शमशाद बेगम शेख हफीज, श्री.कैसर खान, श्री.शेख इब्राहीम शेख इमाम, श्रीमती खान मेहरून्नीसा हमीद खान, श्रीमती अजरा जबीन मसूद खान

**विषय क्र. ३० :**

औरंगपुरा येथील महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळ्याची उंची वाढविणे त्या पुतळयाच्या बाजूला सावित्रीबाई फुले यांचा पुतळा उभारणे संबंधी.

सुचक : श्रीमती मिराताई रामराव शिंदे, श्री.भगवान घडमोडे अनुमोदक : श्री.संजय केनेकर

**विषय क्र. ३१ :**

वार्ड क्र.६९ जवाहर कॉलनी मधील कामासाठी अर्थसंकल्पातील पान क्र.W-१७९ अ.क्र.१८ वरील तरतुदीचे इतर कामासाठी लेखाशिर्ष बदलणे.

सुचक : डॉ.आशा बिनवडे अनुमोदक : श्री.काशिनाथ कोकाटे

**विषय क्र. ३२ :**

प्रभाग क्र.३० करीता अर्थसंकल्पात पा.क्र.६९,७३ अ.क्र.०७ व ०८ वर असलेल्या कामाचे इतर कामासाठी लेखाशिर्ष बदलणे संबंधी.

सुचक : सौ.शोभा मिटकर अनुमोदक : श्री.संतोष जेजुरकर

**विषय क्र. ३३ :**

प्रभाग क्र.३९ करीता अर्थसंकल्पात पा.क्र.२०० अ.क्र.१९ वर असलेल्या तरतूदीचे इतर कामासाठी लेखाशिर्ष बदलणे संबंधी.

सुचक : सौ.सिध्द विणा अनुमोदक : श्री.संतोष जेजुरकर

**विषय क्र. ३४ :**

मनपाच्या रस्ता रूंदीकरण प्रस्तावात जे दुकानदार, मालक अथवा भाडेकरू रस्ता रूंदी करणाने पूर्णत: विस्तापीत झाले आहेत. त्या दुकानदारांना प्राधान्याने मनपाच्या मालकीचे दुकाने देणे करीता स्थानिक वृत्तपत्रात जाहीर प्रगटन देवून एक महिन्यासाठी योजना राबविणे बाबत.

सुचक : श्री.मधुकर सावंत

अनुमोदक : श्री.महेश माळवतकर, श्री.रवि कावडे, श्री.भगवान घडमोडे, श्री.त्र्यंबक तुपे, श्री.पुनम बमणे, श्री.प्रकाश अत्तरदे, श्री.सिताराम सुरे, डॉ.भागवत कराड

**विषय क्र. ३५ :**

मो.सौजन्यनगर, महुनगर व न्यु बालाजी नगर येथे जलवाहिनी टाकणेच्या सुधारीत अंदाजपत्रकास मान्यता देणे संबंधी.

सुचक : श्री.मधुकर सावंत

अनुमोदक : श्री.त्र्यंबक तुपे, श्री.भगवान घडमोडे, डॉ.भागवत कराड, श्री.पुनम बमणे, श्री.प्रकाश अत्तरदे, श्री.सिताराम सुरे

## पुरवणी विषय

**विषय क्र. ३६ :**

वार्ड क्र.७३ सर्वे क्रं.६८,६९,७० एन दोन संत तुकोबा नगर मधील म.न.पा.चे सभागृहाला प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे असे नाव देणे बाबत.

सुचक : श्री.दामोधर माधवराव शिंदे अनुमोदक : श्री.बाबासाहेब डांगे, श्री.नारायण कुचे

**विषय क्र. ३७ :**

वॉर्ड क्र.१२ करीता अर्थसंकल्पात पा.क्र.W-२१७ अ.क्र.१,W-२२४ अ.क्र.४ व W-२३० अ.क्र.३ वर असलेल्या तरतूदीचे इतर कामासाठी लेखाशिर्ष बदलणे संबंधी.

सुचक : श्री.संजय जगताप अनुमोदक : श्री.सय्यद खुसरो

**विषय क्र. ३८ :**

मनपाच्या वतीने प्रबोधनकार कै.केशव सिताराम ठाकरे यांना त्यांचे जयंती/पुण्यतिथीच्या दिवशी अभिवादन करणे संबंधी.

सुचक : श्री.संतोष सुधाकर जेजुरकर अनुमोदक : श्री.भाऊसाहेब वाघ, श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे

**विषय क्र. ३९ :**

वार्ड क्र.७८ चिकलठाणा करीता अर्थसंकल्पात असलेल्या तरतूदीचे इतर कामासाठी लेखाशिर्ष बदलणे संबंधी.

सुचक : श्री.रवि साहेबरावजी कावडे अनुमोदक : श्री.भाऊसाहेब वाघ

**विषय क्र. ४० :**

वार्ड क्र.८० मधील अंबिकानगर या ठिकाणी कुत्रा चावल्यामुळे मयत झालेल्या योगेश अशोक मुनीमाने या मुलाच्या आईला मनपातर्फे आर्थिक मदत करणे बाबत.

सुचक : श्री.नारायण कुचे, श्री.बापू घडमोडे, श्री.दामूअण्णा शिंदे, सौ.पुष्पाताई शिंदे

अनुमोदक : श्री.त्र्यंबक तुपे, श्री.भाऊसाहेब वाघ, श्री.अ.साजेद अ.सत्तार

**विषय क्र.४१ :**

प्रभाग क्र.२३ करीता अर्थसंकल्पात वार्ड इ अंतर्गत अ.क्र.२५ पा.क्र.W-१५० वरील तरतूदीचे इतर कामासाठी लेखाशिर्ष बदलणे संबंधी.

सुचक : श्रीमती मिराताई रामराव शिंदे अनुमोदक : श्री.नारायण कुचे

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक २०.१२.२००७ रोजी आयोजीत सर्वसाधारण सभेतील प्रश्नोत्तरे

**सौ.कला सुरेश बोरामणीकर, स.पालिका सदस्या**

**प्रश्न क्र.५ :**

प्रभाग क्र.६१ गेल्या वर्षातील अर्थसंकल्पातील प्रशासनातर्फे ८० लक्ष रू.चे काम निराला बाजार, सावरकर पुतळा सौंदर्यीकरण हे काम हाती घेण्यात आले होते. परंतु सदरील काम हे तिन महिन्यापासून बंद आहे त्याबाबत खालील माहिती देण्यात यावी.

**अतिरिक्त शहर अभियंता**

१. सदरील काम कोणत्या ठेकेदारास देण्यात आले ?

**उत्तर :**

सदरील काम श्री.एम.ए.सिद्दीकी, गुत्तेदार यांना देण्यात आले आहे.

२. अद्याप पर्यंत सदर कामावर किती खर्च झाला आहे ?

**उत्तर :**

सदर कामावर अद्यापपर्यंत २३.६० लक्ष खर्च झालेला आहे.

३. सदरील काम अत्यंत निकृष्ठ होत असताना प्रशासनाने कुठलीही कार्यवाही का केली नाही

**उत्तर :**

सदरील कामे या कामाच्या निविदेतील अटी,शर्ती व स्पेसिफिकेशन नुसार होत आहेत.

४. सदरील काम तिन महिन्यापासून बंद का आहे ?

**उत्तर :**

सदरील कामातील डांबरीकरणाचे काम करावयाचे आहे. पावसाळा असल्यामुळे तीन महिन्यांपासून सदर काम बंद होते. डांबरीकरणाचे काम त्वरीत सुरू करण्यात येत आहे.

५. सदरील कामासाठी जी ८० लक्षची तरतुद ठेवण्यात आली आहे त्यात कोणते कोणते काम हाती घेण्यात येणार आहेत ?

**उत्तर :**

सदरील कामासाठी ठेवण्यात आलेल्या रक्कम रू.८० लक्षच्या तरतूदीत रस्त्याचे साईड पंख्याचे खडीकरण करणे, डांबरीकरण करणे, पाईप लाईन टाकणे, फुटपाथ बांधणे व रस्ता दुभाजक बांधून सौंदर्यीकरण करणे इ.कामे हाती घेण्यात येणार आहे.

करीता माहितीस्तव.

**श्री.प्रशांत देसरडा, स.पालिका सदस्य**

**प्रश्न क्र.६ :**

०१. स्पेक कंपनीचे सर्वेक्षण करावयाचे काम कोणत्या स्वरूपाचे होते? त्याची तपशिलवार माहिती व सदरील काम किती दिवसाच्या आत करायचे होते? तपशिलवार माहिती देतांना कामाची आज रोजी पर्यंतचा कामाचा उल्लेख करावा.

**उपायुक्त (सिडको) तथा कर निर्धारक व संकलक**

**उत्तर :**

स्पेक कंपनीला महानगरपालिका हद्दीतील मालमत्तांचे सर्वेक्षण करून त्याचे संगणकीकरण करणे, घर क्रमांक देणे,कर आकारणी, वार्डाचे व घराचे नकाशे तयार करणे, जुन्या मिळकतीस

नविन सर्वेक्षणाप्रमाणे लिंकिग करणे,नोटीस तयार करणे,डिमांड बिल तयार करणे, वाटप करणे,डेटा बेस माहिती तयार करणे,सर्व वार्डात संगणक बसविणे, महानगरपालिकेच्या मालमत्ता कराच्या अभिलेखाचे संगणकीकरण करणे,तसेच महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांस प्रशिक्षण देणे इ.कामे करणे.
सदरील काम हे करारनाम्या प्रमाणे सहा महिनेच्या आत करावयाचे होते.
आजपर्यंत केलेल्या कामाबाबत स्पेक कं.चा अहवालाची प्रत सोबत जोडली आहे.

०२. स्पेक कंपनीला वर्क ऑर्डर (करारनामा) कोणत्या तारखेस केला होता?

<u>उत्तर :</u>

स्पेक कंपनीचा करारनामाम दि.२६.०२.०४ रोजी केला होता.

०३. स्पेक कंपनीस लागणारे मनपाचे रजिष्टर, जागा,कर्मचारी व इतर सामुग्री पूर्ण वेळेवर दिली होती का? दिली नसेल तर कारण काय?

<u>उत्तर :</u>

स्पेक कंपनीला लागणारे महापालिकेचे जुने मालमत्ता कराचे रजिष्टर,बंचेस, सर्वेक्षण बंचेस इ. रेकॉर्ड, तसेच सर्व महानगरपालिकेचे रेकॉर्ड देण्यात आला.

०४. स्पेक कंपनीचे सर्वेक्षण चालू करायच्या अगोदरची मनपाची वॉर्ड वॉईज मालमत्ता किती होती? सर्वेक्षण झाल्यानंतर आजची सर्वेक्षण संख्या किती होती?

<u>उत्तर :</u>

स्पेक कंपनीने सर्वेक्षण चालू करायच्या अगोदर महापालिकेची वार्ड निहाय पध्दत नव्हती, विभागीय कार्यालय होते. त्यांची मालमत्ता पुढील प्रमाणे होती.

**<u>विभागीय कार्यालयातील (पुर्वीचे झोन कार्यालय) नोंदी नुसार मालमत्तांची संख्या</u>**

| विभाग क्र. | मिळकतींची संख्या |
|---|---|
| १ | १५८२० |
| २ | ८२८५ |
| ३ | ६९९३ |
| ४ | ३१६८२ |
| ५ | १०३५३ |
| ६ | ८८६४ |
| ७ | २५०० (म्हाडा क्षेत्रातील मालमत्ता) |
| ८ | १३१६० |
| **एकुण** | **९७,६५७** |

०५. सर्वेक्षणामध्ये ज्या मालमत्ता जास्तीच्या मिळाल्या त्या मालमत्तेचे किती पैसे जास्तीचे मिळणार आहेत?

<u>उत्तर :</u>

स्पेकच्या सर्वेक्षणामध्ये जास्तीचे मिळालेल्या मिळकती, त्यांचे डिमांड अजून निश्चित करणेत आलेले नाही. त्यामुळे निश्चित रक्कम सांगता येणार नाही.

०६. जास्तीचे मालमत्तेची वसूली वर्क ऑर्डर प्रमाणे २००६ व २००७ या वर्षीचे डिमांड वाटप झाली आहे काय? (वॉर्ड वॉईज माहिती) झाली नसल्यास कारण काय?

<u>उत्तर :</u>

वार्ड ब,इ,फ मध्ये खालील प्रमाणे स्पेक कंपनीचे बिलाचे वाटप झालेले आहे.

| वार्ड | ब | | ई | | फ | |
|---|---|---|---|---|---|---|
| वाटप झालेल्या बिलांची संख्या | प्राप्त | वाटप | प्राप्त | वाटप | प्राप्त | वाटप |
| | २२५०८ | १४७२१ | ५१८० | ३७७१ | १३४९ | १२१९ |

०७. सर्वेक्षण पूर्ण झाल्यावर बिल छपाई, बिल वाटप,सर्वेक्षणाचे सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट वॉर्ड वॉईज, वॉर्ड वॉईज नकाशे कोणी करायचे होते? ते काम पूर्ण झाले आहे का? झाले नसल्यास कारण काय?घर नंबर असलेली प्लेट्स लावण्याचे काम पूर्ण झाले काय?

**उत्तर :**

सर्वेक्षण पूर्ण झाल्यावर सर्वेक्षणाचे बिल वाटप व सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट,वार्ड निहाय नकाशे इ.काम स्पेकने पूर्ण करायचे होते.

सदर कामे अद्याप पूर्ण झालेली नाही.

०८. स्पेकला सर्वेक्षणाचे काम करतांना मुदतवाढ देण्यात आली होती का? दिली असता कारण काय? मुदतवाढीस जबाबदार कोण?

**उत्तर :**

स्पेकला काम करतांना वेंळोवेळी मुदतवाढ देणेत आली आहे. मालमत्ता संगणकीकरण पुर्ण व्हावे म्हणून मुदतवाढ देणेत आली.

०९. आज रोजी पर्यंत स्पेक कंपनीचे बिल अदा करण्यात आले आहे काय? (वॉर्ड वॉईज माहिती) जे बिल बाकी आहेत आज रोजी पर्यंत झोन अधिकाऱ्यांना का प्राप्त झाले नाही?

**उत्तर :**

डिमांड बिलाची वार्ड निहाय माहिती पुढील प्रमाणे

**सन २००६-२००७ ची बिले व सिडको सन ०६-०७ व ०७-०८ ची मागणी बिले.**

| **वार्ड** | **ब** | **इ** | **फ** | **एकुण** |
|---|---|---|---|---|
| स्पेकने अदा केलेली बिले | २२५०८ | ५१८० | १३४९ | **२९,०३७** |

सन ०७-०८ वर्षाकरीता अ,क,ड वार्डात स्पेक मार्फत स्पेक मार्फत बिले देणेत आलेली नाही.

१०. स्पेक कंपनीस आज रोजी पर्यंत कामाच्या मोबदल्यात मनपातर्फे किती बिल अदा करण्यात आले आहे? जे बिल अदा करण्यात आले आहे किती वेळेस धनादेश देण्यात आले आहे? प्रत्येक धनादेश किंवा बिल अदा करतांना कोणत्या स्वरूपाचे काम पूर्ण झाले आहे? त्या प्रत्येक बिलाचा तपशिल.

**उत्तर :**

स्पेक कंपनीस रक्कमेची देयके निविदेतील अट क्र.६ अन्वये टप्प्यांनुसार देण्यात आलेले आहे. त्या अटीची Xerox प्रत सोबत देत आहे, माहिती पुढील प्रमाणे

**देयक**

| **हप्ते** | **रक्कम** | **दिनांक** |
|---|---|---|
| प्रथम | १५,००,००० | १५/१२/०५ |
| व्दितीय | १०,००,००० | २७/०२/०६ |
| तृतीय | १०,००,००० | १३/०३/०६ |
| चौथा हप्ता | २५,००,००० | ६/१०/०६ |
| पाचवा हप्ता | १३,२४,२८० | ४/०१/०७ |
| सहावा हप्ता | २५,००,००० | १२/०१/०७ |
| सातवा हप्ता | २०,४८,२३९ | १६/८/०७ |

११. स्पेक कंपनी सर्वेक्षण करतांना मनपाची मुख्य इमारत, झोन ऑफीसची जागा, फोन,लाईट बिल, स्टेशनरी,कर्मचारी व अधिकाऱ्यांचे वापर करण्यात आले आहे काय? वापर केल्यास वर्क ऑर्डरमध्ये कोणत्या अटी क्रमांकावर आहे? अटींची सत्यप्रत द्यावी.

**उत्तर :**

स्पेक कंपनीला रेकॉर्ड सुरक्षिततेच्या दृष्टीने महानगरपालिका मुख्य कार्यालयात ऑफिस करता जागा देणेत आली आहे. फोन फक्त इंटर कॉल देणेत आला होता. स्टेशनरी, कर्मचारी व अधिकारींचे वापर करण्यात आले नाही.

१२. २००६-२००७ या वर्षी किती बिल वाटप झाले आहेत? झोन वॉईज तपशिल जे बिल देण्यात आले आहेत त्यात स्पेक कंपनीचे नविन सर्वेक्षण प्रमाणे बिल किती?

**उत्तर :**

सन २००६-०७ या वर्षी खालील प्रमाणे स्पेक कंपनीने तयार केलेली बिले वार्ड निहाय खालील प्रमाणे आहेत.

| वार्ड | ब | इ | फ | एकुण |
|---|---|---|---|---|
| तयार केलेल्या बिलांची संख्या | २२५०८ | ५१८० | १३४९ | **२९,०३७** |

वार्ड अ,क,ड मध्ये स्पेक कंपनी कडून बिले तयार करून वाटप करणेत आले नाही.

१३. खाजगी तत्वावर मालमत्तेचे सर्वेक्षणाची मंजूरी घेतांना सर्वसाधारण सभेसमोर, स्थायी समिती समोर जो विषय प्रशासनाने ठेवला होता व सर्वसाधारण सभेने व स्थायी समितीने चर्चा करून त्या विषयाला ठराव रूपात मंजूरी दिली आहे त्या विषयाची,ठरावाची, चर्चेचे विवरण काय होते?

**उत्तर :**

ठरावाची प्रत सोबत देणेत येत आहे.

१४. स्पेक कंपनीचे करारनामा करत असतांना दिलेली बँक गॅरंटी, बँकेत/ मनपात ठेवलेली डिपॉजीट किती होते? आज रोजी पर्यंत डिपॉजीट किंवा बँक गॅरंटीमध्ये परतावा करण्यात आला आहे का? परतावा परत करत असतांना कामाच्या पूर्ततेबाबत विचारणा केली आहे का?

**उत्तर :**

रू.१५,३०,००० बँक गॅरंटी आहे, परतावा करणेत आला नाही.

१५. खाजगी तत्वावर सर्वेक्षणाचे काम करण्याची निविदा काढल्यानंतर किती टेंडर प्राप्त झाले होते? स्पेक कंपनीचे त्या वेळेसचे दर काय होते व कामाचे स्वरूप काय होते?

**उत्तर :**

खाजगी तत्वावर सर्वेक्षण काम पूर्ण करण्याची निविदा एकुण ४ प्राप्त झाल्या, त्यापैकी दोन निविदा उघडण्यास प्राप्त होत्या त्यात स्पेक कंपनीचे दर रू. १५३/- प्रति मालमत्ता होते. कामाचे स्वरूप :- मालमत्तांचे सर्वेक्षण करणे, संगणकीकरण करणे,लिकिंग करणे, १० संगणक वार्ड कार्यालयात देणे, वार्डाचे नकाशे व मालमत्तांचे नकाशे काढणे, नंबर प्लेट लावणे, महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे. सॉफ्टवेअर तयार करणे इ.कामाचे स्वरूप होते.

१६. सर्वेक्षणाचे काम करतांना स्पेक कंपनी किती कर्मचारी वर्ग लावणार होते? त्या कर्मचाऱ्यांची शैक्षणिक पात्रता, अनुभवाची अट काय होती? सदरील कर्मचाऱ्यांची नावे आणि पदनाम यांच्यासह शैक्षणिक पात्रतेची यादी त्यांनी नियुक्ती बाबत समक्ष असलेल्या कर्मचाऱ्यांच्या पूराव्यासह दिलेला अहवाल.

**उत्तर :**

कामाचे आवश्यकतेनुसार कर्मचारीवर्ग लावणार होते, स्पेक कंपनीने दिलेली कर्मचाऱ्यांची यादी सोबत देणेत येत आहे.

**श्री.संजय जोशी, स.पालिका सदस्य**

**प्रश्न क्र.७ :**

**०१** औरंगाबाद मनपामध्ये भरण्यात येणाऱ्या शहर अभियंता पदाबाबत खालीलप्रमाणे माहिती द्यावी.

**अ)** शहर अभियंता हे पद आज स्थितीला कोणत्या संदर्भामध्ये मोडते?

**ब)** शहर अभियंता हे पद एकाकी पद आहे काय?

**क)** शहर अभियंता या पदास आरक्षण लागु आहे काय?

**ड)** या पदाच्या भरतीसाठी सेवा भरती नियमामध्ये काय तरतुदी आहेत, तसेच मेरीट कम सिनियारिटी लागु आहे काय?

**इ)** मा.उच्च न्यायालय औरंगाबाद यांच्या निर्णयानुसार औरंगाबाद मनपामध्ये जेष्ठता सुची तयार करण्यात आली आहे हे खरे आहे काय, व त्यानुसारच कार्यकारी अभियंता संवर्गाची पदे भरण्यात आली असल्यास त्यानुसार तयार केलेली जेष्ठता सुचीची प्रत देण्यात यावी.

**ई)** सन २००२,२००३,२००४,२००५,२००६,२००७ या वर्षाच्या कार्यकारी अभियंता संवर्गाच्या जेष्ठता सुची नियमाप्रमाणे तयार केल्या असतील, त्या सर्वांच्या वर्षनिहाय प्रती देण्यात याव्यात.

**फ)** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ नुसार महानगरपालिकेने पिट पर्सन ने शहर अभियंता हे पद भरावे असे नमुद आहे. येथे पिट पर्सन म्हणजे सिनियारीटी कम मेरीट नुसार पिट पर्सन होतो हे खरे आहे काय?.

**<u>उत्तर :</u>** अप्राप्त

**<u>श्री.प्रशांत देसरडा, स.पालिका सदस्य</u>**

**<u>प्रश्न क्र.८ :</u>**

**०२** मनपा औरंगाबाद मधील कार्यकारी अभियंता या पदाबद्दल कृपया खालील माहिती देण्यात यावी.

**अ)** मा.उच्च न्यायालय औरंगाबाद यांनी उप अभियंता संवर्गाची जेष्ठता सुची तयार करण्याबाबत आदेश दिले होते त्यानुसार तयार करण्यात आलेल्या जेष्ठता सुची नुसार पदवीधर व पदविका धारक जेष्ठ अभियंता कोण?

**ब)** मनपा मध्ये आज स्थितीला किती कार्यकारी अभियंता कार्यरत आहेत व त्यांच्या पदोन्नतीच्या वेळी त्यांची शैक्षणीक अर्हता काय होती? त्यावेळी दिलेल्या पदोन्नतीनुसार जेष्ठ कार्यकारी अभियंता कोण?

**क)** पदवीधर उप अभियंता संवर्गातुन कार्यकारी अभियंता संवर्गात पदोन्नती झालेल्या कार्यकारी अभियंता यांची जेष्ठतेनुसार नावे द्यावीत.

**ड)** पदविका धारक उप अभियंता संवर्गातून कार्यकारी अभियंता संवर्गात पदोन्नती झालेल्या कार्यकारी अभियंता यांची जेष्ठतेनुसार नावे द्यावीत.

**<u>उत्तर :</u>** अप्राप्त

**<u>श्री.सुरजितसिंग सबरवाल, स.पालिका सदस्य</u>**

**<u>प्रश्न क्र.९ :</u>**

**प्र.०१.** औरंगाबाद मनपामध्ये भरण्यात येणाऱ्या शहर अभियंता पदाबाबत कृपया खालील प्रमाणे माहिती द्यावी.

१) दिनांक ०१.०१.२००७ ची कार्यकारी अभियंता संवर्गाची जेष्ठता सुची अंतिम करण्यात आली आहे काय? नसल्यास---

२) दिनांक ०१.०१.२००७ ची कार्यकारी अभियंता संवर्गाची जेष्ठता सुची अंतिम न करता त्या संवर्गातील जेष्ठ कार्यकारी अभियंता कोण आहे, हे कोणत्या नियमानुसार ठरविण्यात येते. त्या नियमासह खुलासा करावा.

३) पदविकाधारक उपअभियंता संवर्गातून कार्यकारी अभियंता संवर्गात पदोन्नती झालेल्या कार्यकारी अभियंता यांनी प्राप्त पदविका नंतरची शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्यास ती शैक्षणिक अर्हता पुढील पदोन्नतीसाठी/जेष्ठतेसाठी कोणत्या शासकीय निर्णयानुसार गृहीत धरण्यात येते. याचा खुलासा शासन निर्णयाच्या प्रतीसह देण्यात यावा हि विनंती.

**<u>उत्तर :</u>** अप्राप्त

**<u>श्री.रविंद्र गांगे, स.पालिका सदस्य</u>**

**<u>प्रश्न क्र.१० :</u>**

शारदाश्रम जयहिंद कॉलनी येथील रिकाम्या जागेवर रिलायन्सचेटॉवर उभारण्यात येत आहे. सदरील जागा कोणाच्या मालकीची आहे? ज्या बिल्डींगवर टॉवर उभारण्यात येत आहे. त्याची

बांधकाम परवानगी किती? लाली टॉवरला बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे काय? लाली टॉवर २०X३० जागा ही कोणाच्या मालकीची आहे?

सदरील जागा मनपाच्या मालकीची असल्यास प्रशासकीय विभागाने पुढील कार्यवाही का केली नाही? लाली टॉवरची बांधकाम परवानगी कोणाच्या नावाने आहे? कंप्लीशन सर्टीफिकेट घेण्यात आले आहे काय? पार्कींगसाठी किती जागा सोडली? ती नियमानुसार आहे काय?

**उत्तर :** अप्राप्त

**श्री.सतिष कटकटे, स.पालिका सदस्य**

**प्रश्न क्र.११ :**

१. प्रभाग क्र.५९ मधील अमरप्रित, गौतमनगर रोडवर दुध डेअरी एमएसईबी च्या बाजुला पेव्हींग ब्लॉक बसविण्याचे काम कोणाच्या आदेशान्वये करण्यात येत आहे? सदरील कामासाठी कोणत्या लेखाशिर्षका अंतर्गत खर्च करण्यात येत आहे? सदरील कामाचा एकुण खर्च किती? व काम कोणत्या विभागामार्फत करण्यात येत आहे?

अमरप्रित ते दिल्लीगेट रस्ता रूंदीकरण आहे काय? या रूंदीकरणात सदरील पेव्हींग ब्लॉक बसविण्यात येत असलेला भाग बाधित होतो काय? असल्यास करण्यात येत असलेल्या खर्चास जबाबदार कोण? कोणाकडून वसूल करणार?

**अतिरिक्त शहर अभियंता**

**उत्तर :**

नगररचना विभागाशी संबंधीत आहे.

०२.लक्ष्मणचावडी ते सिल्लेखाना रोडचे काम चालु आहे.

**अ)** सदर काम चालू असतांना वॉटर लाईन,ड्रेनेज लाईन रेन वॉटरच्या लाईनखाली दबलेली आहे काय?

**उत्तर :**

काम चालू असतांना वॉटर लाईन व ड्रेनेज रेन वॉटर पाईपच्या खाली दबू नये याची दक्षता घेतलेली आहे. तथापी ज्या भागात ड्रेनेज लाईन रेन वॉटरच्या पाईपमध्ये बाधीत होत आहे. ती स्थलांतरीत करणेचे काम हाती घेण्यात येत आहे.

**ब)** वॉटर लाईन,ड्रेनेज लाईन करीता अर्थसंकल्पात तरतुद आहे काय? असल्यास किती तरतुद आहे?

**उत्तर :**

तरतुद नाही,तथापी वॉटर लाईन स्थलांतरीत करणेचे कामाचे अंदाजपत्रक कार्यकारी अभियंता पा.पु. यांचे मार्फत मंजुरीच्या स्तरावर आहे. जलवाहिनी स्थलांतरीत करणेचे कामाची अंदाजित रक्कम रू.१७ लक्ष एवढी आहे.

**क)**वॉटर लाईन व ड्रेनेज लाईनच्या कामाचे टेंडर काढण्यात आले आहे काय? असल्यास काम कोण करणार आहे?

**उत्तर :**

जलवाहिनीचे कामाचे अंदाजपत्रक मंजुरीनंतर निविदा प्रक्रिया सुरू करण्यात येईल ड्रेनेज लाईन स्थलांतरीत करणे, नवीन टाकणेचे काम मुळ कामाच्या निविदेमध्ये ठेकेदारामार्फत करण्याचे आदेश प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांना देण्यात आलेले आहे.

**ड)** रोडचे काम केव्हापासून सुरू झाले? कामाची मुदत कोणत्या तारखेपर्यंत आहे?

**उत्तर :**

रोडचे कामासाठी ७.१२.२००६ रोजी कार्यादेश देण्यात आलेले होते. प्रत्यक्षात कामास सुरूवात ही मार्चच्या शेवटच्या आठवडयात झालेली आहे. कामाची मुदत १२ महिने असून

दि.६.१२.२००७ रोजी मुदत संपलेली आहे. प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांनी दि.३१.०३.२००८ पर्यंत मुदत वाढवून देणेची शिफारस केलेली आहे.

**कार्यकारी अभियंता ड्रेनेज,विद्युत,इमारती व उद्याने**

प्रश्न क्र.२ चा खुलासा असा की, लक्ष्मण चावडी ते सिल्लेखाना रोडचे काम चालू असून सदरील रस्त्याच्या कामामध्ये अस्तित्वात असलेली ड्रेनेज लाईन दबलेली आहे. सदरील रस्त्यामधील ड्रेनेज लाईन रस्त्याच्या कडेला स्थलांतरीत करणेस्तव अंदाजपत्रक र.रू.२७,८३,७००/- चे तयार करण्यात आलेले आहे. सदरील कामाकरीता अर्थसंकल्पात आर्थिक तरतुद उपलब्ध नाही.

आर्थिक तरतुद उपलब्धतेसह अंदाजपत्रक मंजुरीस्तव जा.क्र./मनपा/ड्रेनेज/२८५७/०७ दिनांक १४.०८.२००७ अन्वये मा.कार्यकारी अभियंता (ड्रेविइवउ) व तेथून संचिका जा.क्र.१३३२ दिनांक १७.०८.२००७ अन्वये मा.शहर अभियंता यांच्याकडे सादर करण्यात आलेले आहे. अद्याप अंदाजपत्रकास मुंजरी प्राप्त झालेली नाही. त्यामुळे पुढील निविदा कार्यवाही करता आलेली नाही.

करीता आपल्या माहितीस्तव.

**श्री.सतिष कटकटे, स.पालिका सदस्य**

**प्रश्न क्र.१२ :**

०१. महानगरपालिकेच्या अस्थापनेवर एकुण किती मजुर (कायमस्वरूपी) कार्यरत आहेत? दै.वेतनावर किती मजुर कार्यरत आहेत?

**सहाय्यक आयुक्त-२**

**उत्तर :**

महानगरपालिकेच्या अस्थापनेवर एकुण १८७४ मजुर कायमस्वरूपी कार्यरत आहेत व दैनिक वेतनावर एकुण ३० कार्यरत आहेत.

०२. मजुर म्हणून नियुक्ती देण्यात आलेल्या पैकी किती मजुर मुख्य कार्यालयातील (प्रशासकीय इमारत टप्पा १ व २) विविध कार्यालयात काम करीत आहेत? केव्हा पासून?

**उत्तर :**

६० मजुर.

०३. मजुर म्हणून घेण्यात आलेल्या या कर्मचाऱ्याकडून वार्ड कार्यालयात सफाईचे काम का करून घेण्यात येत नाही? वार्डात सफाईचे कामासाठी मजुर कमी असतांना या लोकांना वार्डात सफाईसाठी पाठविण्यास प्रशासनास काय अडचण आहे?

**उत्तर :**

काही नाही.

०४. ज्यांची नियुक्ती मजुर म्हणून केली आहे. असे मजूर क्लर्क किंवा शिपाई किंवा इतर कोणत्याही पदावर नियुक्ती किंवा नेमणूक करता येते का? करता येत असेल तर कोणत्या नियमाखाली करता येते?

**उत्तर :**

महानगरपालिका सेवा भरती नियमानुसार किमान १० वर्षाचा अनुभव असणाऱ्या मनपा चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांमधून जेष्ठतेनुसार कार्यक्षमतेनुसार पदोन्नतीव्दारे नाईक/दरोगा/चोपदार/मुकादम/जवान या पदावर नियुक्ती देण्यांत येते.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद